जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

उल्हासनगर महापालिकेच्या २२ कोटींच्या टेंडरवरून राजकीय वादंग : स्थायी समितीतही शिवसेना-भाजप आमनेसामने

उल्हासनगर/वृत्तसंस्था- : उल्हासनगर महानगरपालिकेच्या २२ कोटी रुपयांच्या नगरोत्थान विकासकामांच्या टेंडरवरून सुरू झालेला राजकीय वाद आता स्थायी समितीपर्यंत पोहोचला आहे. टेंडर प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला असतानाच, स्थायी समितीच्या बैठकीत भाजपच्या आठ सदस्यांनी या विषयाला तीव्र विरोध केल्याने शिवसेना आणि भाजपमध्ये थेट संघर्ष उफाळून आला. अखेर स्थायी समितीत दोन्ही बाजूंचे मतदान समसमान झाल्यानंतर सभापती कुलवंतसिंह सोहता यांनी निर्णायक मताधिकार वापरून हा विषय मंजूर केला. मात्र, या घडामोडीमुळे स्थायी समितीतील शिवसेना-भाजपमधील सलोखा संपुष्टात आल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

महापालिकेच्या या टेंडरवरून भाजपचे प्रवक्ते प्रदीप रामचंदानी यांनी उपमहापौर अमर लुंड यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेऊन प्रशासनावर ☞(पान २ वर)

तुमची पंतप्रधान होण्याची वेळ कधीच येणार नाही

अमित शाह यांचा राहुल गांधींना खोचक टोला

चंदीगड /वृत्तसंस्था-: केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. दिल्लीतील रामलीला मैदानावर 'इंडिया' आघाडीच्या 'व्होट बचाओ, देश बचाओ' रॅलीदरम्यान शाह यांनी राहुल गांधींच्या पंतप्रधान होण्याच्या स्वप्नावर खोचक टोला लगावला. 'तुम्हाला जर पंतप्रधान व्हायचे असेल, तर आयुष्यभर बनावट संसदेतच राहावं लागेल; तुमची पंतप्रधान होण्याची वेळ कधीच येणार नाही,' अशा शब्दांत अमित शाह यांनी राहुल गांधींना सुनावले. चंदीगढ येथील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले.

राहुल गांधी यांच्या दुकानात फक्त विषच मिळते. १९८४ च्या शीखविरोधी दंगलीच्या



वर्धापनदिनी दिल्लीत रॅली काढून 'इंडी' आघाडीने या दंगलीतील पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या जुन्या वेदनादायी आठवणींवर राहुल गांधी यांनी मीठ चोळले आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीच्या रामलीला मैदानावर काढण्यात आलेल्या रॅलीवर कडाडून टीका केली.

चंदीगडमध्ये विकास प्रकल्पांच्या शिलान्यास समारंभादरम्यान शहा बोलत होते. १ नोव्हेंबर रोजी राजधानीत असा 'जल्लोष' (जलसा) आयोजित करून काँग्रेसने आपण असंवेदनशील असल्याचे दाखवून दिले, असा आरोप शहा यांनी केला. निवडणूक आयोगाविरुद्ध विरोधकांच्या 'मॉक पार्लमेंट' (प्रतीकात्मक संसद) वर भाष्य करताना शहा यांनी राहुल गांधी फक्त 'मॉक पार्लमेंट'मध्येच पंतप्रधान होऊ शकतात, असा उपरोधिक टोलाही लगावला.

राजीव गांधींच्या वादग्रस्त वक्तव्याचा उल्लेख

दंगलींनंतर तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी 'जेव्हा एखादे मोठे झाड कोसळते, तेव्हा जमीन थरथरणारच', असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. राजीव गांधी यांचे हे वक्तव्य मी

१९८४ च्या दंगलीवरून शहांचा काँग्रेसवर संताप

१९८४ च्या शीखविरोधी दंगलीचा उल्लेख करत अमित शहा यांनी काँग्रेसवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. १ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्लीच्या रस्त्यांवर हजारो निष्पाप शिखांची निर्घृण हत्या केली गेली. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, लोकांना जिवंत जाळण्यात आले, अबोध बाळे अनाथ झाली, महिला विधवा झाल्या आणि घरांची राख झाली. शिखांचा नरसंहार झाला, त्याच दिवशी राहुल गांधी यांनी रॅली आयोजित करून शिखांचा अपमान केला, असे शहा म्हणाले.

आयुष्यात कधीही विसरू शकत नाही. हजारो निरपराधांच्या हत्येनंतर अशी असंवेदनशील टिप्पणी फक्त काँग्रेसचे नेतृत्वच करू शकते. देशाने राजकीय पक्षाने प्रायोजित केलेली अशी दंगल यापूर्वी कधीही पाहिली नव्हती आणि भविष्यात पाहणार नाही, असेही शहा म्हणाले.

२०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने १९८४ च्या दंगलीची प्रकरणे पुन्हा उघडली, पीडितांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची भरपाई दिली आणि दोषी काँग्रेस नेत्यांना तुरुंगात पाठवले, असेही शहा यांनी आवर्जून सांगितले.

ज्ञानेश कुमारांना CEC पदावरून हटवले जाईल

मोदी-शहांविरोधात लढणार; राहुल गांधींचा निर्धार

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- '२०२४ च्या निवडणुकीनंतर, १३.५ कोटी (१३५ दशलक्ष) मतदारांची नावे मतदार यादीतून काढून टाकण्यात आली. दर सातपैकी एका मतदाराला म्हणजेच एकूण मतदारसंख्येच्या १५% लोकांना यादीतून वगळण्यात आले. २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी केवळ ३३ होती. याचा अर्थ असा की, २०२४ ची निवडणूक बेकायदेशीर होती. हे मी स्वतःहून म्हणत नाहीये; तर निवडणूक आयोगाची स्वतःची आकडेवारीच हे दर्शवते,' अशा शब्दांमध्ये लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आज रामलीला मैदानावर आयोजित सभेत केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. दिल्लीत 'इंडिया' आघाडीच्या मोर्चानंतर रामलीला मैदानावर आयोजित सभेत ते बोलत होते.



निवडणुकांमध्ये मते चोरली गेली आहेत.मी बोलतो ते शेवटी खरे ठरते ज्याप्रमाणे कोविड-१९ बद्दल मी केलेले भाष्य अचूक ठरले होते,' असा दावाही त्यांनी केला.

ज्ञानेश कुमारांनंतर मोदी व शहा यांच्यावर कारवाई केली जाईल

एकेकाळी अमित शहा यांनी दावा केला होता की नरेंद्र मोदी 'कुठेही जाणार नाहीत,' परंतु वास्तव अगदी वेगळे आहे. आता नरेंद्र मोदी यांनी कोठे जायचे ठरवले तरी त्यांना कोठेही जाऊ दिले जाणार नाही. ज्ञानेश कुमार यांचा विषय हाताळल्यानंतर आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सरकारला जाब विचारणार आहोत. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा, हे लक्षात ठेवा: तुम्ही कुठेही जाऊ शकत नाही,' असे त्यांनी जाहीर केले. 'ज्ञानेश कुमार यांच्यावरील कारवाईनंतर मोदी आणि शहा यांच्यावरही कारवाईसाठी लढणार, असा निर्धारही राहुल गांधींनी केला.

' आज या मोर्चाला उपस्थित असणाऱ्यांना देशाला एक संदेश द्यायचा होता. तो संदेश तुम्ही मोदी आणि शहा यांच्यापर्यंत पोहोचवला आहे. हा ☞(पान २ वर)

दुष्काळात एक रुपयाही भरू नका!

बच्चू कडूंनी हातोड्याने तोडले फायनान्स कंपनीचे कुलूप

यवतमाळ/प्रतिनिधी : दुष्काळामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबे आर्थिक संकटात असताना कर्जवसुलीसाठी घरांना कुलूप लावण्याच्या फायनान्स कंपन्यांच्या कारवाईविरोधात शिवसेनेचे विदर्भ नेते, आमदार बच्चू कडू आक्रमक भूमिका घेतली. आज रविवारी आर्णी तालुक्यातील देऊरवाडी (बुटले) येथे फायनान्स कंपनीने कर्जवसुलीसाठी घराला लावलेले कुलूप त्यांनी स्वतः हातोड्याने तोडले. तसेच कुटुंबीयांना पुन्हा घरात प्रवेश मिळवून दिला. सक्तीच्या वसुलीविरोधात आगामी अधिवेशनात कायदा करण्यासाठी सरकारला भाग पाडू, असा इशाराही त्यांनी दिला.

पोलिसांच्या बंदोबस्तात घराला टाळे

दुष्काळामुळे हाताला काम नाही, उत्पन्नाचे साधन नाही. अशा परिस्थितीत कर्जवसुलीसाठी घराला कुलूप लावून कुटुंबाला बेघर करणे कितपत योग्य आहे, असा सवाल त्यांनी केला. देऊरवाडी येथील रवि संजय पत्रे (२८)



यांनी तीन वर्षांपूर्वी घरबांधणीसाठी एका फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते. कंपनीने ५ लाख ९० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले असले, तरी प्रत्यक्षात २ लाख ७१ हजार रुपये मिळाल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. त्यापैकी सहा ते सात हप्त्यांपोटी सुमारे ३० हजार रुपये भरल्याची माहिती रवि यांचे वडील संजय पत्रे यांनी दिली. यंदाच्या दुष्काळामुळे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याने पत्रे कुटुंबीय मजुरीसाठी पुणे येथे गेले होते. त्यामुळे गावातील घराला कुलूप होते. दरम्यान, ३० सप्टेंबर २०२६ रोजी फायनान्स कंपनीचे प्रतिनिधी पोलीस बंदोबस्तात गावात आले. त्यांनी कुटुंबीयांचे कुलूप काढून कंपनीचे कुलूप लावत घर सीलबंद केल्याचा आरोप आहे. प्रहारचे जिल्हाध्यक्ष नितीन चौधरी, तालुकाध्यक्ष रवि जाधव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामस्थांशी संवाद साधताना आमदार बच्चू कडू यांनी फायनान्स कंपन्यांच्या सक्तीच्या वसुलीला सामूहिक विरोध करण्याचे आवाहन केले. महाराष्ट्रात ज्या ठिकाणी फायनान्स कंपन्यांनी घरांना कुलूप लावले आहे, तेथे ती कुलूपे तोडण्याची मोहीम राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले. सक्तीच्या वसुलीविरोधात आगामी अधिवेशनात सरकारला कायदा करण्यास भाग पाडू, असेही त्यांनी सांगितले. 'दुष्काळात फायनान्स कंपन्यांचा एक खडकूही भरू नका!' असे आवाहनही कडू यांनी यावेळी गावकऱ्यांना केले.

आत्महत्याग्रस्त ☞(पान २ वर)

दिवाळीपूर्वी महागाईचा झटका! एलपीजी सिलिंडर महागला; सीएनजीच्या दरातही वाढ

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिवाळीच्या तोंडावरच सर्वसामान्य नागरिक आणि व्यावसायिकांना महागाईचा फटका बसला आहे. आजपासून (१ नोव्हेंबर) व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ करण्यात आली आहे. तसेच मुंबईत सीएनजीच्या दरातही प्रतिकिलो १ रूपयांची वाढ झाली आहे.

व्यावसायिक सिलिंडरच्या दरांत गेल्या काही महिन्यांतही वाढ झाली होती. आता १ नोव्हेंबरपासून व्यावसायिक सिलिंडर १० रुपयांनी महागला असून मुंबईत व्यावसायिक सिलिंडर २ हजार ७७४ रुपयांवर पोहचला आहे. दिल्लीत १९ किलोच्या कमर्शियल सिलिंडरची किंमत २,८१० रुपयांवरून वाढवून २,८२० रुपये करण्यात आली आहे. मात्र, दिलासादायक बाब म्हणजे १४.२ किलो वजनाच्या घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर अद्याप स्थिर ठेवण्यात आले आहेत. घरगुती वापराच्या सिलिंडरची किंमत ९४२ रुपयांवर कायम आहे. यापूर्वी १ ऑक्टोबर रोजीही दिल्लीत कमर्शियल सिलिंडरच्या किमतीत ६२.५० रुपयांची वाढ झाली होती.



मुंबईत सीएनजीच्या दरात वाढ

सीएनजीच्या दरात प्रतिकिलो १ रुपयाने वाढ झाली असून सीएनजीचा नवा दर प्रतिकिलो ९० रुपये झाला आहे. मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे नैसर्गिक वायूच्या किमतीत वाढ झाल्याचे सांगितले जात आहे.

देशभरातील प्रमुख शहरांमधील नवीन दर

■ **चोशई:** येथे कमर्शियल सिलिंडरची किंमत २,९८३ रुपयांवरून वाढून २,९९४.५० रुपये झाली आहे. म्हणजेच, ११.५० रुपयांची वाढ झाली आहे. घरगुती सिलिंडरचे दर ९५७.५० रुपयांवर स्थिर आहेत.

■ **मुंबई:** मुंबईत कमर्शियल सिलिंडरची किंमत २,७६४ रुपये, तर घरगुती सिलिंडरची किंमत ९४१.५० रुपये आहे.

■ **अहमदाबाद:** येथे कमर्शियल सिलिंडरची किंमत २,८३१.५० रुपयांवरून वाढून २,८४२ रुपये झाली आहे. म्हणजेच, १०.५० रुपयांची वाढ झाली आहे. घरगुती सिलिंडरची किंमत ९४९ रुपयांवर स्थिर आहे.

■ **शिलांग आणि पटना:** शिलांगमध्ये घरगुती सिलिंडरची किंमत १,००७.५० रुपये, तर कमर्शियल सिलिंडरची किंमत ३,०९१ रुपये झाली आहे. तसेच, बिहारमधील पटनामध्ये कमर्शियल सिलिंडरची किंमत ३,१३२ रुपये, तर घरगुती सिलिंडरची किंमत १,०४० रुपयांवर स्थिर आहे.

लखनऊ:☞(पान २ वर)

व्होट चोरीचा आरोप करणाऱ्यांकडून संविधानाची चोरी

भाजपची ठाणे, नांदेड येथे लोकशाही बचाव पदयात्रा

ठाणे मुंबई/प्रतिनिधी :: काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांची खरी लढाई ही भारत आणि संविधानासोबत आहे. याचा इतिहास पाहिला तर, १९७५ मध्ये दिवंगत इंदिरा गांधी यांनी भ्रष्ट मार्गाने निवडणूक जिंकली होती, तेव्हा न्यायालयाने त्यांची निवडणूक रद्द ठरवली होती. आज आम्हाला लोकशाहीचे धडे देणाऱ्या काँग्रेसने इंदिरा गांधींच्या कार्यकाळात काय झाले, याचा विचार केला पाहिजे. त्यावेळी संविधानाची मोडतोड करत न्यायालय आणि लोकशाहीला संपवण्याचे काम काँग्रेसने केले. आज व?होट चोरीचा आरोप करणाऱ्या याच लोकांनी प्रत्यक्षात संविधान चोरी केली आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. ठाण्यात



भाजपच्या लोकशाही बचाव पदयात्रेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी असे म्हटले आहे. महाराष्ट्रात ठाणे आणि नांदेड येथे भाजपच्या वतीने रविवारी (दि. १) लोकशाही बचाव पदयात्रा काढण्यात आली होती. नांदेड येथे भाजप नेते अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत राज कॉर्नर येथून पदयात्रेला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून रॅली महानगर पक्ष कार्यालयापर्यंत पोहोचली. ठाण्यातील पदयात्रेत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आता इंदिरा गांधींचे नातू तेच जुने राजकारण घेऊन पुन्हा मैदानात उतरले आहेत. राहुल गांधी कायम परदेशात फिरत असतात, ते कशासाठी जातात? भारताला नेहमी पाण्यात पाहण्याचे काम चीन करत असतो. मग राहुल गांधींच्या पक्षाला आणि त्यांच्या ट्रस्टला चीनकडून डोनेशन का मिळत आहे? चीनच्या पैशावर भारतामध्ये अराजकता पसरवण्याकरिताच काँग्रेस रस्त्यावर उतरली आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानाने निर्माण केलेल्या सर्वोच्च न्यायालयावर हे लोक मोर्चे नेत आहेत, हीच खरी अराजकता आहे. सुप्रीम कोर्टावर मोर्चे काढले जात असताना 'संविधान वाचवा' असे म्हणणारे गप्प का आहेत? यांना भारताची लोकशाही आणि संविधान नको आहे, त्यांना देशात अराजकता निर्माण करायची आहे. जनतेने त्यांचे हे षड्?यंत्र समजून घेतले पाहिजे. चीनची 'लाल☞(पान २ वर)

लॉरेन्स बिष्णोई टोळीकडून नागपुरात

१२ सराफांना जीवे मारण्याची धमकी

नागपूर/प्रतिनिधी : चित्रपट अभिनेता सलमान खाननंतर टायगर श्रॉफ वर गोळीबार करणाऱ्या कुख्यात लॉरेन्स बिष्णोई टोळीच्या नावाने शहरातील १२ सराफा व्यावसायिकांना लाखोंची खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. सराफा व्यावसायिकांना गेल्या काही तासांच्या अंतरात एका पाठोपाठ एक टपालाद्वारे मिळालेल्या या धमकीच्या पत्रानंतर रविवारी हा प्रकार उघडकीस आला. इतवारी येथील सराफा ओळ आणि बजाजनगरातील काही सराफा व्यावसायिकांनाही काही तासांच्या अंतरात एका मागे एक धमकीच्या आशयाचे पत्र मिळाले. वहिच्या कागदावर हस्ताक्षरात लिहिलेली ही पत्रे टपालाद्वारे सराफा व्यापाऱ्यांना पाठवण्यात आहेत. लॉरेन्स



बिष्णोई टोळीचा सदस्य असल्याचा दावा करत धमकी देणाऱ्याने सराफा व्यावसायिकांना दहा लाखांच्या खंडणीची मागणी केली आहे. यात धमकी देणाऱ्याने व्यापाऱ्यांना तीन दिवसांची मुदत दिली आहे. या काळात पैशांची व्यवस्था केली नाही तर आप्तेष्टांसह त्याची किंमत मोजावी लागेल, तुम्ही कलियुगातले कौरव आहात. जसा टायगर श्रॉफवर गोळीबार केला तसात तुमच्यावरही करेल. मी आतापर्यंत चार खून केले आहेत. पोलीसांना मदत मागाल तर परिणाम चांगले होणार नाहीत, अशा आशयाचा मजकूरही धमकी देणाऱ्याने हस्ताक्षरात लिहिला आहे. नागपूर जिल्हा सराफा व्यापारी संघटनेच्या वतीने अध्यक्ष राजेश रोकडे यांनी तडकाफडकी या संदर्भात पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्याशी संपर्क साधत त्यांना धमकीच्या पत्राची प्रत सादर केली. सराफा असोसिएशनने पोलीस आयुक्तांना निवेदन सादर करत सुरक्षेचीही मागणी केली. प्रतापनगर पोलीस हद्दीतील रहिवासी एका बाप- लेकीला कुख्यात गुंड लॉरेन्स बिष्णोई टोळीने अलिकडे खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी दिली होती. सेवानिवृत्त शिक्षकाची☞(पान २ वर)

जिवंत उंदराला दोरीने बांधून जाळले, चार तरुणांना अटक

झाशी/वृत्तसंस्था-: उत्तर प्रदेशातील झाशी शहरातून प्राण्यांवरील क्रौर्याची एक मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. येथे चार तरुणांनी एका जिवंत उंदराला दोरीने बांधून जाळून मारल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई केली आहे. झाशी शहरातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ओरछा गेट परिसरातील ही घटना घडली आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या ४७ सेकंदांच्या या व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे की, आरोपी एका उंदराला दोरीने



बांधून आणतात. त्यानंतर त्याला एका दरवाजाला बांधले जाते आणि त्याच्यावर तेल टाकून त्याला जिवंत पेटवून दिले जाते. उंदीर आगीत तडफडत असताना आरोपी मात्र त्याचे व्हिडिओ बनवत होते. व्हिडिओ व्हायरल होताच झाशी पोलिसांनी☞(पान २ वर)

संशयाचे भूत अन् रक्तरंजित थरार!

पत्नीवर कुऱ्हाडीने वार करून पतीने केली हत्या

अकोला /प्रतिनिधी: वाशीम जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील जऊळका येथे कौटुंबिक वादातून पतीने पत्नीची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. चारित्र्याच्या संशयातून पतीने झोपेत असलेल्या पत्नीच्या मानेवर कुऱ्हाडीने वार करून हत्या केली. सकाळी मुलगी आईच्या खोलीत गेल्यानंतर हा रक्तरंजित थरार उघड झाला. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दिनेश जोंधळे (वय ४५) असे आरोपी पतीचे नाव असून, शारदा जोंधळे (वय ४२) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण वाशीम जिल्हा हादरला आहे.



व्यसनाधीन पतीचा पत्नीच्या चारित्र्यावर होता संशय

मिळालेल्या माहितीनुसार, पती हा व्यसनाधीन असून, पत्नीच्या चारित्र्यावर सातत्याने संशय घेत होता. याच☞(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

सेलडोहजवळ ट्रक पलटी; तेलामुळे रस्ता निसरडा

समृद्धी महामार्ग परिसरातील अपघाताने वाहतुकीचा खोळंबा

वाहनांच्या लांबच लांब रांगा



सेलू : तालुक्यातील सेलडोहजवळ समृद्धी महामार्ग परिसरात शनिवारी (३१ ऑक्टोबर) सायंकाळी गुजरात पासिंगचा ट्रक पलटी झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या अपघातात ट्रकच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, ट्रकमधील ऑइल रस्त्यावर सांडल्याने वाहतुकीचा प्रश्न अधिक गंभीर बनला.

GJ12 BV9451 क्रमांकाचा हा ट्रक अचानक पलटी होऊन रस्त्यावर आडवा पडला. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला. त्यातच ट्रकमधील ऑइल रस्त्यावर पसरल्याने रस्ता निसरडा झाला असून, इतर वाहनांचेही अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. परिणामी वाहनचालकांना मार्गक्रमण करताना मोठी कसरत करावी लागली. अपघातामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतुकीचा बराच काळ खोळंबा झाला.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाल्याची प्राथमिक माहिती नाही. मात्र, ट्रक नेमका कोणत्या कारणाने पलटी झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

समृद्धी महामार्ग परिसरात अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून सुरक्षित अंतर राखणे आवश्यक आहे. विशेषतः अपघातानंतर रस्त्यावर तेल किंवा अन्य पदार्थ सांडल्यास तातडीने स्वच्छता करून वाहतूक सुरक्षित करणे गरजेचे आहे.

१ व १० वरील उर्वरित

उल्हासनगर महापालिकेच्या २२

गंभीर आरोप केले होते. आर्थिक निविदा उघडण्याच्या काही तास आधीच 'एम.सी. चंदनानी' या कंपनीला टेंडर मिळणार असल्याचा दावा रामचंदानी यांनी केला होता आणि प्रत्यक्षात त्याच कंपनीला टेंडर मिळाले. निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा तसेच एका विशिष्ट कंत्राटदाराला झुकते माप दिल्याचा थेट आरोपही त्यांनी यावेळी केला होता. या प्रकरणामुळे आता राजकीय घडामोडींनाही चांगलाच वेग आला आहे. प्रदीप रामचंदानी यांचे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी सलोख्याचे संबंध असून, त्यांच्या माध्यमातूनच भाजपच्या स्थायी समितीतील आठ सदस्यांना संबंधित टेंडरच्या विषयाला विरोध करण्याचे निर्देश देण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यानुसार या आठ सदस्यांनी विरोधाची भूमिका घेतल्यामुळे स्थायी समितीत सत्ताधारी शिवसेना आणि भाजप यांच्यात समसमान मतदान झाले.

तुमची पंतप्रधान होण्याची

सरकारने १९८४ च्या दंगलीची प्रकरणे पुन्हा उघडली, पीडितांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची भरपाई दिली आणि दोषी काँग्रेस नेत्यांना तुरुंगात पाठवले, असेही शहा यांनी आवर्जून सांगितले.

ज्ञानेश कुमारांना CEC

केवळ एका पक्षाचा किंवा त्यांच्या नेत्यांचा आवाज नाही; तर हा एक असा संकल्प आहे की, आम्ही या देशात लोकशाही नष्ट होऊ देणार नाही. आम्ही राज्यघटनेचा विनाश होऊ देणार नाही. तुमच्याकडे कितीही पैसा किंवा सत्ता असली, तरी तुम्ही राज्यघटनेच्या
वर नाही आहात,' असेही राहुल गांधींनी सुनावले.

देशावर दोन-तीन व्यक्तींच्या मालकी नको

भारतही एक असे ठिकाण असावे जिथे प्रत्येकाला समान संधी मिळेल. एखादा शेतकरी कठोर परिश्रम करत असेल, तर त्याला त्याच्या पिकाचा पूर्ण लाभ मिळाला पाहिजे; आणि जर एखादा विद्यार्थी १८ तास अभ्यास करत असेल, तर त्याला रोजगार मिळायला हवा. त्यांनी व्यक्त केले की, त्यांना असा देश नको आहे जो केवळ दोन-तीन व्यक्तींच्या मालकीचा बनून राहील. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याची मागणी करत राहुल गांधी म्हणाले की, त्यांना पदावरून दूर करणे हे देशाला पुन्हा योग्य मार्गावर आणण्याच्या दिशेने पहिले पाऊल असेल.

दुष्काळात एक रुपयाही

शेतकऱ्याच्या कुटुंबियांना दिला धीर आर्णी तालुक्यातील बेलोरा (वन) येथील माजी सरपंच रवींद्र देवराव मनवर यांनी फायनान्सच्या कर्जाच्या तणावातून आत्महत्या केल्याची घटना घडली होती. रविवारी त्यांच्या तेराव्याच्या विधीला आमदार बच्चू कडू यांनी गावात भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. मनवर यांच्यावर चार वित्तीय संस्थांकडून किमान पाच कर्जे असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. कर्जवसुलीसाठी फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी वारंवार घरी येत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या सततच्या तगाद्याला कंटाळून रवींद्र यांनी आत्महत्या केल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. आमदार कडू यांनी त्यांच्या पत्नीची आणि दोन दिव्यांग मुलांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

पाच हजार रुपयांत दिवाळी कशी साजरी करायची?

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीसाठी देण्यात येणाऱ्या पाच हजार रुपयांच्या मदतीवरही नाराजी व्यक्त केली. पाच हजार रुपयांत दिवाळीची व्यवस्थित तयारीही होऊ शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना किमान १० ते १५ हजार रुपये दिवाळी अनुदान द्यावे. तसेच दुष्काळी मदत म्हणून प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये देण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

दिवाळीपूर्वी महागाईचा झटका!

बिहारमधील पटनामध्ये कमर्शियल सिलिंडरची किंमत ३,१३२ रुपये, तर घरगुती सिलिंडरची किंमत १,०४० रुपयांवर स्थिर आहे. लखनऊ: उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमध्ये घरगुती सिलिंडरची किंमत ९७९.५० रुपयांवर कायम आहे. मात्र, कमर्शियल सिलिंडरची किंमत वाढून २,९४२ रुपये झाली आहे..

व्होट चोरीचा आरोप

व्यवस्था' भारतात आणण्यासाठीच हा सर्व घाट घातला जात आहे. आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ संविधान वाचवण्यासाठी रस्त्यावरही उतरू शकतो. फडणवीस म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत भाषण करताना सांगितले होते की, या संविधानात सर्वात महत्त्वाचे काही असेल तर ते भारतीय नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार आहेत. मात्र, याच काँग्रेसने १९७६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी दिलेले मूलभूत अधिकार गोठवून टाकले होते आणि मूलभूत अधिकारांसाठी कोणालाही सुप्रीम कोर्टात जाता येणार नाही, अशी दडपशाही चालवली होती. पुढे १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर हे अधिकार देशवासीयांना पुन्हा परत देण्यात आले.

लॉरेन्स बिष्णोई टोळीकडून

मुलगी कॅनडा येथे स्थायिक झाली आहे. तिच्या ई मेलवर बिष्णोई टोळीने संदेश पाठवून धमकी दिली होती.

कोण आहे लॉरेन्स बिष्णोईष्ठ..

पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला खलिस्तानी दहशतवादी सुखदूल सिंग हत्या आणि महाराष्ट्राचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर लॉरेन्स बिश्नोई टोळी पोलीस आणि तपास यंत्रणांच्या रडारवर आली. या टोळीने आतापर्यंत चित्रपट अभिनेता सलमान खान आणि टायगर श्रॉफवर अलिकडेच झालेल्या गोळीबाराची जबाबदारी स्विकारली आहे. खुनाच्या अनेक गुन्ह्यांत सहभागी असलेला लॉरेन्स बिष्णोई सध्या गुजरातच्या अहमदाबाद येथील साबरमती कारागृहात कैद आहे. तिहार जेलधून त्याची साबरमती कारागृहात रवानगी करण्यात आल्या नंतर एनआयएकडून त्याची अनेक प्रकरणांत चौकशी सुरू आहे.

जिवंत उंदराला दोरीने बांधून

या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. पोलिसांनी तातडीने तपास सुरू करून व्हिडिओत दिसणाऱ्या आरोपींची ओळख पटवली.

चार आरोपींना अटक, गुन्हा दाखल

पोलिसांनी या प्रकरणी शहर कोतवालीमध्ये चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जुनैद कुरेशी, जीशान कुरेशी, आसिफ कुरेशी आणि शफीक अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या चारही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईबाबत माहिती देताना शहर पोलीस अधिकारी (सीओ) प्रिया सिंह यांनी सांगितले, 'सोशल मीडियाच्या माध्यमातून एक व्हिडिओ पोलिसांच्या निदर्शनास आला होता, ज्यामध्ये एका जिवंत उंदरावर ज्वलनशील पदार्थ टाकून त्याला जाळण्यात आले होते. या व्हिडिओची तात्काळ दखल घेत गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित आरोपींना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.' पोलिसांनी आरोपींविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

संशयाचे भूत अन्

कारणावरून दोघांमध्ये वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे. शनिवारी रात्री पती-पत्नी नेहमीप्रमाणे झोपण्यासाठी खोलीत गेले होते. त्यांच्यात पुन्हा वाद झाला. दरम्यान, पहाटे ४ ते ५ वाजण्याच्या सुमारास पतीने झोपेत असलेल्या पत्नीच्या मानेवर कुऱ्हाडीने जबर वार केले. या प्राणघातक हल्ल्यात पत्नीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेनंतर आरोपी पती घटनास्थळावरून पसार झाला होता. या दोघांनाही तीन अपत्य असून दोन मुली विवाहित आहेत, तर मुलगा १५ वर्षांचा असून तो शिक्षण घेतो. दिनेशचे वृद्ध आई वडील हे समोरच एका छोट्या घरात स्वतंत्र राहतात. घटनेच्या रात्री या दाम्पत्याचा एक मुलगा आणि मुलगी तिथे झोपण्यासाठी गेले होते.

थारोळ्यात पडलेला आईचा मृतदेह पाहताच मुलीचा आक्रोश

रविवारी सकाळी मुलगी आईच्या खोलीत गेली असता, रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आईचा मृतदेह पाहून तीने एकच आक्रोश केला. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. जऊळका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेचा पंचनामा केला. पोलिसांनी पसार झालेल्या आरोपीचा शोध घेऊन त्याला मालेगाव शहरातून ताब्यात घेत अटक केली. त्याच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडब्ल्यूडीच्या कंत्राटदारांना आता

पालिकेत विविध पायाभूत विकासाच्या कामांसाठी कंत्राटदारांना मनपाकडे स्वतंत्रपणे नोंदणी करणे अनिवार्य होते. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे राज्य शासनमान्य वैध नोंदणी असलेल्या कंत्राटदारांची पात्रता, तांत्रिक क्षमता आणि आर्थिक स्थितीची पडताळणी आधीच झालेली असते. त्यामुळे त्यांना पुन्हा मनपाच्या स्वतंत्र नोंदणी प्रक्रियेतून जावे लागणे ही बाब अत्यंत अनावश्यक आणि वेळखाऊ ठरत होती. हीच अडचण लक्षात घेऊन डीपीसी सदस्य सुनील खराटे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभेत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समक्ष हा प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी पालकमंत्री बावनकुळे यांनी मनपा आयुक्तांना त्या संदर्भात खास निर्देश देऊन निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. तसेच मनपा आयुक्तांकडेही वारंवार पाठपुरावा केला होता.

सुनील खराटे यांच्या मागणीची दखल घेत आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी पत्र काढले आहे. या पत्रानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदारांना आता मनपाकडे स्वतंत्र नोंदणी न करताही निविदा प्रक्रियेत पात्र ठरता येणार आहे.मात्र, यासाठी पीडब्लूडी च्या कंत्राटदारांना संबंधित वर्गनिहाय मनपात प्रसिद्ध होणाऱ्या निविदा प्रक्रियेत भाग घेण्याकरिता अनुज्ञेय असलेले नोंदणी शुल्क, जीएसटी सह व इतर आवश्यक कागदपत्रे अमरावती महानगरपालिकेमध्ये जमा करावी लागतील. ही औपचारिकता पूर्ण केल्यानंतर कंत्राटदार शासनाच्या व मनपाच्या लेखाशीर्ष अंतर्गत मंजूर असलेल्या दोन्ही निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यास पात्र राहतील, असे या पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

मोटर सायकलवरील इसमाला

झालेल्या अपघातात बाबाराव यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हे कॉ निरंजन उकंडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतक बाबाराव यांचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे शवविच्छेदनाकरिता रवाना केला व अपघातातील कार व चालक यांना मोर्शी पोलिसांनी ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

चारा लागवडीमुळे पशुपालकांना

याठिकाणी वैरण बियाणांची लागवड केली आहे. लागवड करण्यात आलेल्या उत्कृष्ट बियाण्यामुळे कापणी केल्यानंतरही चारा उपलब्ध पाण्यानुसार पुन्हा येणारा आहे. यावेळी जिल्हाधिकारी येरेकर यांनी पशुपालकांना वैरण बियाणे संचाचे वाटप केले. तसेच भागातील चाऱ्याची सद्यस्थिती जाणून घेतली. वाघोलीचे सरपंच अक्षय तायवाडे यांनी चाऱ्याचे यशस्वीपणे संगोपन करून पशुसाठी चारा उपलब्ध करण्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच जिल्हाधिकारी येरेकर यांनी अप्पर वर्धा धरणातून उपलब्ध झालेली दापोडी येथील ४ हेक्टर जमिनीवरील वैरण बियाणे लागवडीस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. सदरील ठिकाणी होणाऱ्या चारा पिकांचे संरक्षणासाठी उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या.मोर्शी तालुक्यातील तीन ठिकाणावर व्हीबी जी राम जी अंतर्गत बारा हेक्टर गाळपेर जमिनीवर चारा लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. यातून सुमारे तीनशे मॅट्रिक टन चारा उत्पादन होणार आहे. चारा लागवडीसाठी डॉ. प्रवीण सारडे, मिलिंद राऊत, पोहराचे वैरण विकास अधिकारी चंद्रशेखर गिरी यांनी पुढाकार घेतला आहे.

मंदिरांच्या शेती नुकसानीची

शासनाला अधिकृत निवेदन सादर करण्यात आले होते. त्यानंतरही ठिकठिकाणी अनेक तालुका व जिल्हा पातळीवरून अशीच निवेदने देण्यात आली, या विषयाचा सातत्याने पाठपुरावा मंत्रालयापर्यंत सुरू असून, शासनाने मंदिरांच्या शेतीच्या नुकसानीचा गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी पत्रकार परिषदेत समितीच्यावतीने करण्यात आली.

मंदिरांची शेती ही केवळ उत्पन्नाचे साधन नसून मंदिरांच्या दैनंदिन व्यवस्थापनाचा, धार्मिक उपक्रमांचा आणि सामाजिक कार्याचा महत्त्वाचा आर्थिक आधार आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांप्रमाणेच मंदिरांनाही योग्य नुकसानभरपाई मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्र देवस्थान समितीचे मंदिर जोडो अभियानाला पाच महिने पूर्ण झाले असून या अभियानांतर्गत हजारो मंदिरे जोडल्या गेली, हे अभियान सातत्याने जलद गतीने पुढे चालेल, मंदिरांच्या न्याय व हक्कासाठी लवकरच ठीक ठिकाणी जनआंदोलन केले जाईल हा इशारा सुद्धा पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आला.

या विषयाला व्यापक जनसमर्थन मिळावे आणि राज्यातील सर्व मंदिरांचे प्रश्न एकत्रितपणे शासनापर्यंत पोहोचावेत, यासाठी महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने दिवाळीनंतर लवकरच संपूर्ण महाराष्ट्रातील मंदिर विश्वस्तांची भव्य राज्यस्तरीय विश्वस्त महापरिषद आयोजित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील मंदिरांच्या हितासाठी महाराष्ट्र देवस्थान समितीचा हा लढा सातत्याने सुरू राहील. अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये देण्यात आली. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र देवस्थान समितीचे संघटक निलेश टवलारे, कैलास पनपालिया, अध्यक्ष नागेश्वर महादेव मंदिर, धामंत्री, आशिष मारूडकर, सचिव श्री.पिंगळादेवी संस्थान, ओमप्रकाश परतानी अध्यक्ष श्री. माहारूद्र मारोती संस्थान, जहागिरपूर, धनराज वेलनकर, श्री. रघुनाथ महाराज संस्थान, अनिल साहू, अध्यक्ष, श्री. तपोनेश्वर मंदिर, श्रीकृष्ण माहोरे, रूक्मिणी जन्मभूमी विदर्भ पीठ, कौडण्यपूर, विजयजी करडे, रविंद्रजी भोयर, नरेशजी दिघडे, विनोद वानखडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सात गुन्ह्यांचा आरोपी काळूवर

अतुल वर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एमपीडीए सेलचे सहायक पोलीस निरीक्षक इम्रान नायकवडे, पोलीस उपनिरीक्षक अजय मिश्रा व पोलीस अंमलदार चेतन कराडे यांनी या प्रकरणाचा गोपनीय प्रस्ताव तयार केला.

या प्रस्तावाला पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी ३१ ऑक्टोबर रोजी मंजुरी देत स्थानबद्धतेचे आदेश पारित केले. आदेशानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक रिता उईके यांच्यासह गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलीस हवालदार मंगेश लोखंडे, रंजित गावंडे तसेच वलगाव पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकातील पोलीस हवालदार इशाय खांडे, पोलीस अंमलदार सोमिनाथ घोलप, अझहर शेख व किरण पाठे यांनी संयुक्तरीत्या कारवाई केली.

पथकाने काळू याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. स्थानबद्धतेचा आदेश बजावल्यानंतर ३१ ऑक्टोबर रोजी त्याची अमरावती मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील गुन्हेगारांची माहिती संकलित करून त्यांच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये प्रभावी कारवाई करण्याची मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

रवी नगर येथे पिसाळलेल्या वळूचा

नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते भूषण अरविंदराव पाटणे यांनीही घटनास्थळी उपस्थित राहून बचावकार्यामध्ये सहकार्य केले. तसेच पशुविभागाचे निरीक्षक पंकज कल्याणकर, प्रफुल्ल लोखंडे, तोकीर भाई, प्रधान, विजय आणि इतर कर्मचाऱ्यांनी या कार्यवाहीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत तक्रार प्राप्त होताच तातडीने घटनास्थळी पोहोचून प्रश्न मार्गी लावल्याबद्दल नगरसेविका प्रियंका पाटणे व पशुविभागाच्या पथकाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

एटीएममध्ये लोखंडी पट्टी लावून

एटीएममध्ये संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती मिळाली. बँकेच्या निगराणी यंत्रणेत काही संशयित एटीएम मशीनमध्ये छेडछाड करताना आढळून आले होते. ही माहिती मिळताच अँटी गुंडा स्क्वॉड, एपीआय मिलिंद हिवरे आणि बीट मार्शलच्या पथकांनी तातडीने संबंधित एटीएम केंद्रांकडे धाव घेतली. पोलिसांनी मशीनची तपासणी करून रोकड बाहेर येण्याच्या स्लॉटमध्ये लावलेल्या लोखंडी पट्ट्या हटविल्या. त्यामुळे ग्राहकांच्या खात्यातून वजा होणारी रक्कम चोरट्यांच्या हाती जाण्यापासून वाचली. प्राथमिक तपासात शहरातील तीन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील आठ एटीएम चोरट्यांनी लक्ष्य केल्याचे समोर आले आहे. काही एटीएममध्ये लोखंडी पट्टी लावताना संशयितांच्या हालचाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्या आहेत. त्यामुळे या प्रकारामागे एखादी संघटित टोळी सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडून संबंधित एटीएम केंद्रांसह परिसरातील रस्त्यांवरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.

दरम्यान, रविवारी शहरातील दहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एटीएम केंद्रांची पोलिस अधिकारी, कर्मचारी आणि बँक कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे तपासणी केली. एटीएममधील रोकड वितरण यंत्रणा तसेच सुरक्षाव्यवस्थेची पाहणी करण्यात आली. या प्रकारातील संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी चार स्वतंत्र पथके तैनात केली असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी भव्य

बांधिलकीतून सुरू झालेल्या या उपक्रमाने महाराष्ट्रात सामूहिक विवाह सोहळ्यांना नवी दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

याच सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत, सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक ताण लक्षात घेऊन ट्रस्टने सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. आर्थिक अडचणींमुळे मुला-मुलींचे विवाह करण्यास अडचणींचा सामना करणाऱ्या पालकांना दिलासा देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

वधू- वरांसाठी विविध सुविधा-

या सामूहिक विवाह सोहळ्यात प्रत्येक जोडप्याचा विवाह धार्मिक विधी व पारंपरिक पद्धतीनुसार संपन्न होणार आहे. प्रत्येक जोडप्यासाठी स्वतंत्र पंडितांची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच वधू-वरांना कपडे, मंगळसूत्र, ओढणी, दुपट्टा, जॅकेट, चप्पल व बूट आदी साहित्य देण्यात येणार आहे. विवाह सोहळ्यास उपस्थित राहणाऱ्या पाहुण्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. प्रत्येक जोडप्यासोबत वधूपक्षातील पाच आणि वरपक्षातील पाच, अशा एकूण दहा व्यक्तींसाठी बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. या सुविधांमुळे वधू-वरांच्या कुटुंबीयांना विवाह सोहळ्यात सहभागी होता येणार असून, विवाह सन्मानपूर्वक पार पाडण्यास मदत होणार आहे.

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे-

या सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पात्र वधू-वरांनी नोंदणी करताना खालील कागदपत्रे सादर करावीत :

१. वधू व वर यांचे आधारकार्ड, २. आवश्यक प्रतिज्ञापत्र, ३. ग्रामपंचायतीचा दाखला, ४. पोलीस पाटील यांचा दाखला, ५. सातबारा उतारा (७/१२).

इच्छुक पात्र वधू-वरांनी आवश्यक कागदपत्रांसह आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात संपर्क साधून अधिकृत नोंदणी करावी. नोंदणीची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२७ असून, इच्छुकांनी विहित मुदतीत नोंदणी करून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सामाजिक बांधिलकीचा महत्त्वपूर्ण उपक्रम-

सामूहिक विवाह सोहळा हा केवळ विवाहाचा कार्यक्रम नसून, आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा आणि समाजात एकता, बंधुता व सहकार्याची भावना दृढ करणारा सामाजिक उपक्रम आहे. या उपक्रमात पात्र वधू-वरांनी सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन स्व. सूर्यकांता देवी रामचंद्रजी पोटे पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने व विवाह समितीचे बबनराव आवारे, संतोषराव काळपांडे, विवेक हाडोळे, भारतराव खांडे, दत्ताभाऊ कुचे,नितीन कडू ,संजयराव काळे, सुदाम पंडागरे,पंजाबराव पवार ,लक्ष्मीकांत तायडे ,विजय गवळीकर, सतिशराव राउत ,अनिल मलमकर ,ज्ञानेश वणवे , घनश्याम पेठे, रविंद्र अंबलकार , शशिकांत कोकाटे,विजय उभाड, ज्ञानदीप येवले ,आशिष धाडे, दिलीपराव निंभोरकर,बबनराव लायदे ,राम खंडारे, दिलीपभाऊ निंभोरकर, प्रकाश पुंड , डी. निकम , अक्षय पोटे, श्रेयस पोटे पाटील, श्रुती पोटे पाटील,संदीप जाधव, आकाश कदम, रामदेव जोशी, अमोल काळे, सुरेश पठारे, रोहित देशमुख यांच्या वतीने करण्यात आले आहे तसेच नोंदणी करिता संपर्क ७४९९०२२३१३,
७४९९०३६१५३ करावे,असे आवाहनही करण्यात आले.

अडगाव बु. येथे जलसंधारणाची कामे

. आणि काम सुरू करण्याचे आदेश तातडीने देण्यात यावेत, अशी मागणी कल्याणी जगदीश दिवटे यांनी केली आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी अमरावती, खासदार बळवंतराव वानखडे, खासदार अमर काळे, आमदार प्रताप अडसड व मा आमदार विरेंद्र जगताप आणि तहसीलदार नांदगाव खंडेश्वर यांना देण्यात आल्या आहेत.

खंडारे परिवाराच्या बुद्ध पूजा व

संजय खोडके यांनी यावेळी केले. या मंगलमय प्रसंगी त्यांनी खंडारे परिवाराला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला चंद्रशेखर खंडारे, नम्रता खंडारे , उन्नती खंडारे , सम्यक खंडारे आदींसह बौद्ध अनुयायी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

शेतात गेलेल्या बैलास

अमोल कोल्हे यांनी खल्लार पोलिसांत दाखल केली. त्या तक्रारीवरुन खल्लार पोलीस ठाण्यात आरोपी गोपाल अटाळकर विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरगुती स्वयंपाकासाठी उत्साही व कल्पक व्यक्ती पाहिजेत

अमरावती येथे ४ ते ५ व्यक्तींच्या कुटुंबासाठी Personal Cook / Home Chef पाहिजे.
अनुभव : अनुभव असलेल्या तसेच स्वयंपाकाची आवड व कौशल्य असलेल्या नवीन उमेदवारांचाही विचार केला जाईल.
विशेष अट : मुलाखतीसाठी येताना स्वतः तयार केलेला एक आरोग्यदायी व नाविन्यपूर्ण पदार्थ सोबत आणावा.
वेतन : कौशल्ये व कामाच्या स्वरूपानुसार परस्पर चर्चेने ठरविले जाईल.
संपर्क: ८६०५४२३७१२

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२७२/२०२५
चंद्रकला अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२६.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Chandrakala Prakashrao Bramhne, Age 53 Yrs. Occu.: Household
2. Shubham Prakashrao Bramhne, Age 31 Yrs. Occu.: Govt. Job.
3. Rupali Prakashrao Bramhne, Age 29 Yrs. Occu.: Job
All R/o Jalka Shahapur, Po.Shendola Bk. Tq.Dist.Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Prakash Sakharamji Bramhne हे दिनांक **03.08.2026** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Chandrakala Prakashrao Bramhne+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Chandrakala Prakashrao Bramhne+2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस
विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

ईतर कि.फौ.अर्ज क्रमांक ४४/२०२६ ने.ता.२१.११.२०२६

अर्जदार : धृपदा रामकृष्ण पारिसे,
वय ७९ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.वार्ड नं.०३, गणोजादेवी, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार: मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
रा.ग्रामपंचायत गणोजादेवी, ता.भातकुली, जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने न्यायालयामध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३अ) प्रमाणे यातील अर्जदार धृपदा रामकृष्ण पारिसे, यांनी कौसल्याबाई संभाजी उर्फ मारोतराव कुरवाडे यांच्या मृत्यूची नोंद दिनांक १५.०९.२००७ रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.न्यायालय यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक २१.११.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.न्यायालय योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१.१०.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.)क्र.२७८/२०२६ ने.ता.०५.१२.२०२६

अर्जदार : १. सौरभ प्रकाश निमकर
२. सुनिता प्रकाश निमकर
दोन्ही रा.वार्ड नं.२, टाकळी बु,
ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **प्रकाश शालिकराम निमकर** यांचा मृत्यू दि.**२६.०७.२०२६** रोजी देशमुख मेडिकल कॉलेज, अमरावती, ता. जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा असून अर्जदार नं.२ ही पत्नी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३१ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.सलामशाह गफ्फरशाह**, पत्ता रायपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२८ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/1547 जुना मालमत्ता क्र. २८०००३२६ नझुल शिट क्र.६सी प्लॉट नं.२६८, २६७ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **मसुदाबी हुसेनखॉं** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री.सलामशाह गफ्फरखाह नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **३०.१०.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस - अतउल्ला शाह यांचे घर
पश्चिमेस - सत्तार शाह यांचे घर
दक्षिणेस - रामचंद्र बाकडे यांचे घर
उत्तरेस - मेन रोड

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

दोन लाखांचे कर्ज फेडले, तरी नऊ लाखांच्या वसुलीचा कथित प्रयत्न!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

घेतलेले दोन लाख रुपयांचे कर्ज व्याजासह परत केल्यानंतरही कोरे धनादेश परत न करता त्यांचा वापर करून नऊ लाख रुपयांची वसुली करण्याचा प्रयत्न झाल्याची तक्रार रिसोड शहरात समोर आली आहे. या प्रकरणाची संबंधित विभागाने सुमारे नऊ महिने चौकशी केल्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी रिसोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईमुळे शहरातील कथित अवैध सावकारीच्या व्यवहारांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, मूळचे शेलु खडसे येथील रहिवासी असलेले व सध्या रिसोड शहरातील व्यंकटेश नगर परिसरात राहणारे हॉटेल व्यावसायिक गोपाळ विठोबा खडसे यांनी व्यवसाय व इतर गरजांसाठी सचिन गणराज गांजरे यांच्याकडून दोन लाख रुपये व्याजाने घेतले होते. संबंधित रक्कम व्याजासह परत केल्यानंतरही आपले दोन कोरे धनादेश परत करण्यात आले नसल्याचा आरोप खडसे यांनी तक्रारीत केला आहे.



कोऱ्या धनादेशांवर नऊ लाखांची रक्कम भरल्याचा आरोप

तक्रारीनुसार, परत न केलेल्या दोन कोऱ्या धनादेशांपैकी एका धनादेशावर पाच लाख रुपये, तर दुसऱ्या धनादेशावर चार लाख रुपये अशी एकूण नऊ लाख रुपयांची रक्कम नमूद करून न्यायालयीन कारवाईसाठी धनादेश सादर करण्यात आल्याचा आरोप आहे. दोन लाख रुपयांचे कर्ज व्याजासह फेडल्यानंतरही एवढ्या मोठ्या रकमेची मागणी झाल्याने या व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी तक्रारदाराने केली होती. पैसे न दिल्यास धनादेशाच्या आधारे कायदेशीर कारवाई करण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

रिसोडमध्ये अवैध सावकारीचा प्रकार; नऊ महिन्यांच्या चौकशीनंतर गुन्हा दाखल, कोरे धनादेश व महत्त्वाच्या कागदपत्रांची तपासणी

नऊ महिन्यांच्या चौकशीनंतर कारवाई

या प्रकरणी तक्रारदाराने ५ जानेवारी २०२६ रोजी संबंधित विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक गजानन रामेश्वर फाटे व संबंधित पथकाने चौकशी सुरू केली. सुमारे नऊ महिने विविध कागदपत्रांची तपासणी आणि आरोपांची पडताळणी करण्यात आली. चौकशीदरम्यान शिवाजी चौक परिसरातील संबंधित व्यक्तीच्या निवासस्थानी झडती घेण्यात आली. या वेळी कोरे धनादेश, खरेदी-विक्रीची कागदपत्रे, कोरे स्टॅम्प, करारनामे, इसार चिठ्ठ्या, इसार पावत्या, धनादेश पुस्तिका व इतर महत्त्वाची कागदपत्रे आढळल्याची माहिती समोर आली आहे.संबंधित विभागाच्या चौकशीनंतर सहाय्यक निबंधक गजानन रामेश्वर फाटे यांच्या तक्रारीवरून २३ ऑक्टोबर रोजी रिसोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक जाधव करीत आहेत.

या घटनेमुळे खासगी सावकारीच्या व्यवहारांमध्ये कर्जदारांकडून घेतल्या जाणाऱ्या धनादेशांचा व इतर कागदपत्रांचा गैरवापर होतो का, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आर्थिक अडचणीमुळे खासगी व्यक्तींकडून कर्ज घेणाऱ्या नागरिकांची कर्जफेडीनंतरही आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे. रिसोड शहरासह तालुक्यातील संशयित अवैध सावकारीच्या व्यवहारांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

खासगी सावकाराकडून कर्ज घेतले असल्यास सहाय्यक निबंधक कार्यालयाशी संपर्क साधा!

रिसोड शहर व तालुक्यात खासगी सावकारीच्या व्यवहारातून कोणाची आर्थिक पिळवणूक होत असल्यास किंवा कर्जाची परतफेड करूनही धनादेश, स्टॅम्प अथवा इतर कागदपत्रांचा गैरवापर होत असल्याची तक्रार असल्यास संबंधित नागरिकांनी सहकारी संस्थांच्या सहाय्यक निबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहकारी संस्था सहाय्यक निबंधक रामेश्वर फाटे यांनी केले आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्याभारती शाळेत भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची १५१ वी जयंती तसेच भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची ४२ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी व पर्यवेक्षक विजय गोटे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या देशाच्या एकात्मतेसाठी दिलेल्या योगदानाचे तसेच इंदिरा गांधी यांच्या देशाच्या विकासातील कार्याचे स्मरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना या महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्याची माहिती देऊन त्यांचे विचार व आदर्श आत्मसात करण्याचे आवाहन शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यप्रमुख पद्मिनी खराटे यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

चारित्र्याच्या संशयातून पतीने झोपलेल्या जागीच पत्नीला संपविले

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



तालुक्यातील जऊळका येथे एक अमानुष प्रकार उघडकीस आला आहे. इथं एका व्यक्तीने आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केली आहे. चारित्र्याच्या संशयातून पतीने झोपलेल्या जागीच पत्नीला संपवलं आहे. कुऱ्हाडीचे घाव घालून ही हत्या केली आहे. सकाळी मुलगी आईच्या रुममध्ये गेली असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी जऊळका पोलिसांनी आरोपी पतीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दिनेश जोंधळे असं आरोपी पतीचं नाव असून शारदा जोंधळे असे हत्या झालेल्या पत्नीचं नाव आहे. दिनेश जोंधळे हा व्यसनाधीन असून तो पत्नीवर नेहमी चारित्र्याचा संशय घ्यायचा. यावरून दोघांमध्ये सातत्याने वाद होत होता. शनिवारी रात्री दोघेही झोपायला गेले होते. दरम्यान, संशयाचं भूत संचारलेल्या दिनेशने पत्नी झोपेत असताना पहाटे ४ ते ५ वाजेच्या दरम्यान तिच्या मानेवर कुऱ्हाडीने वार केले.

हा हल्ला इतका भयंकर होता की, तिचा झोपेतच मृत्यू झाला. कुऱ्हाडीने वार केल्या नंतर आरोपी दिनेश जोंधळे हा पसार झाला होता. या दोघांनाही तीन मुलं असून दोन मुली विवाहित आहेत. तर मुलगा १५ वर्षांचा असून तो शिक्षण घेतो. दिनेशचे वृद्ध आई वडील हे दिनेश जोंधळे च्या घरासमोर असलेल्या एका छोट्या घरात स्वतंत्र राहतात. घटनेच्या रात्री या दाम्पत्याचा एक मुलगा आणि मुलगी तिथे झोपण्यासाठी गेले होते. यासंधीचा फायदा घेऊन आरोपीने आपल्या पत्नीची हत्या केल्याने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

माहेश्वरी महिला मंडळाचा कोजागिरी उत्सव

अकोला : माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने स्थानिक माहेश्वरी भवनात कोजागिरी उत्सव संपन्न झाला. या कार्यक्रमात ओंकारेश्वर ग्रुप आणि महाकालेश्वर ग्रुपच्या सखींनी भगवान श्रीकृष्णाच्या महारासाचे मनमोहक सादरीकरण केले. गोपींच्या विरह व महारासा मुळे परिसरात वृंदावनचाच महारास साकार झाल्यासारखे वाटत होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला पारंपरिक लोकसंस्कृतीचे प्रतीक असलेल्या भुलाबाईचे स्वागत व पूजन करण्यात आले. मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी भुलाबाईचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. या प्रसंगी ज्योती हेडा यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

उत्सवात ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात वाढदिवस साजरा करणाऱ्या महिलांचे बेलाची रोपे भेट देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर स्मिता अटल यांच्या संचालनाखाली महारासाची सुरुवात झाली. ओंकारेश्वर आणि महाकालेश्वर ग्रुपच्या सखींनी आपल्या उत्क्रांती सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

पाटील महाविद्यालयात पाणी वाचवा जीवन वाचवा जनजागृती कार्यक्रम संपन्न



■ प्रतिनिधी | रिसोड ■

दि. स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दुष्काळी परिस्थिती असल्याने पाण्याचे महत्व व जलसंधारण जनजागृती विषयी डॉ.रमेश विष्णू मोरे यांचे 'जलसंधारणाचे महत्त्व' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.आपल्या मार्गदर्शनातून डॉ.मोरे यांनी 'पाणी हेच जीवन' आहे असे सांगून जलसंधारणाच्या माध्यमातून दुष्काळावर मात करता येत असल्याचे मत प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ.गायकवाड यांनी पाण्याची शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने या कार्यात स्वयंस्फुर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन केले.रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.केशव कोकाटे यांनी प्रास्ताविकामधून जलसंधारणासाठी लोकसहभाग वाढवणे गरजेचे आहे.त्यामुळेच पाण्याची बचत, संवर्धन होत असल्याचे मत व्यक्त केले. त्यानंतर महाविद्यालयामध्ये पाणी वाचविण्याचे फलक विद्यार्थ्यांनी जागोजागी लावले.सूत्रसंचालन कु.श्रेया देशमुख,आभार प्रदर्शन कु. प्रियांशु तिडके यांनी केले. या प्रसंगी स्वयंसेवक-सेविका प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद बहुसंख्येने उपस्थित होते.

लवकरच नवीन बस स्थानकाचे लोकार्पण - आ. शाम खोडे

वाशिम आगारात पाच नवीन ई बसचा शुभारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■



वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार शाम खोडे यांच्या प्रयत्नातून वाशीम आगारात नवीन पाच शिवाई ई बस प्राप्त झाली ,त्यांचा शुभारंभ उद्घाटन आमदार शाम खोडे यांच्या हस्ते शनिवार ३१ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमाला अमरावती विभाग शिक्षक आमदार ॲड .किरणराव सरनाईक, नगराध्यक्ष अनिल केंदळे, भाजपा नेते सुरेश मापारी, भाजपा शहर अध्यक्ष मनीष मंत्री, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, समाजसेवीमाजी प्राचार्य अरुणराव सरनाईक, बादशहा धामणे, दत्ताभाऊ गोटे,कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक भोयर, सरपंच गंगावणे,सुनील तापडिया, रामा इंगळे, रामा ठेंगडे, राजू कलवार, जगदीश देशमुख. राम बोरा. शब्बीर भाई, अली भाई,शंकर वानखेडे, बस स्थानक व्यवस्थापक कर्मचारी वृंद, भाजपा पदाधिकारी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. यावेळी आगारातफे सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला तदनंतर गाडीमध्ये दोन्ही आमदार मान्यवर यांनी शहराचा फेरफटका मारत प्रवास केला. लवकरच नवीन बस स्थानकाचे लोकार्पण. आमदार खोडे. वाशिम बस स्थानकात नवीन बस स्थानक तयार झालेली आहे त्याची पाहणी करून लवकरच सदर बस स्थानकाचे लोकार्पण करण्यात येणार आहे वाशिम बस स्थानक जिल्हा स्थानावर असून आज घडीला हे लहान असल्यामुळे आपण संबंधितांना सहा नवीन प्लॅटफॉर्म तयार करण्याचे सांगितलेले आहे लवकरच नवीन सहा प्लॅटफॉर्म सुद्धा प्रवाशांच्या सेवेसाठी तयार करण्यात येणार आहे आत्तापर्यंत ३५ नवीन ई बस, शिवाई बसेस वाशिम मंगरूळपीर मतदार संघामध्ये आपल्या पुढाकाराने उपलब्ध झाल्या असून आणखी नवीन वीस ई शिवाई बसेस उपलब्ध होणार असल्याची माहिती यावेळी भाजपा आमदार शाम खोडे यांनी यावेळी दिली.

पेनटाकळी धरणाचे पाणी पैनगंगा नदीत सोडा

रिसोड बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर यांची जलसंपदामंत्र्यांकडे आक्रमक मागणी!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील दुष्काळी व गंभीर परिस्थितीमुळे रब्बी हंगामात काढणीस आलेली शेकडो हेक्टरवरील पिके पाण्याअभावी अक्षरशः वाळू लागली आहेत. या भीषण संकटात सापडलेल्या पिकांना तातडीने जीवदान मिळावे, तसेच मेहकर, रिसोड आणि वाशिम तालुक्यातील लाखो नागरिक व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न एप्रिल-मे महिन्यापर्यंत सोडवला जावा, यासाठी मेहकर तालुक्यातील 'पेनटाकळी मध्यम प्रकल्पाचे' पाणी पैनगंगा नदीपात्रात सोडण्यात यावे, अशी आक्रमक व महत्त्वाची मागणी रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर यांनी थेट जलसंपदामंत्री मा. श्री. गिरीशजी महाजन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



हळद व तूर पिके धोक्यात : सध्याच्या पीक परिस्थितीचा आढावा घेतल्यास, खरीप हंगामात मोठ्या कष्टाने पेरलेली आणि आता रब्बीत काढणीस आलेली पिके पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे धोक्यात आली आहेत. मेहकर, रिसोड आणि वाशिम तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्रावरील नगदी पिकांमध्ये मोडणारी हळद, तूर यांसह इतर पिके जळून जाण्याच्या मार्गावर आहेत. या पिकांना वाचवण्यासाठी पेनटाकळी धरणातून किमान दोन आवर्तने पैनगंगा नदी पात्रात सोडणे काळाची गरज बनली आहे, असे सभापती विष्णुपंत भुतेकर यांनी नमूद केले आहे.

७२ टक्क्यांहून अधिक जलसाठा उपलब्ध, पण... : मिळालेल्या माहितीनुसार, पेनटाकळी धरणात ऑक्टोबर अखेर तब्बल ७२.१६ टक्के म्हणजेच ४३,२८० द.ल.घ.मी. इतका मजबूत पाणीसाठा शिल्लक आहे. असे असतानाही, प्रशासकीय दिरंगाई व लालफितीच्या कारभारामुळे पैनगंगा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे (को.प.) बंधारे व बॅरेज अद्याप पूर्णपणे भरल्या गेलेले नाहीत. हे सर्व बंधारे तातडीने भरून घेतल्यास या भागातील लाखो नागरिकांचा आणि मुक्या जनावरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आगामी उन्हाळ्याच्या दिवसांत (एप्रिल ते मे) सुटू शकतो.

तातडीने आदेश काढण्याची मागणी : या अत्यंत महत्त्वाच्या व गंभीर विषयाची दखल घेऊन, पैनगंगा नदी पात्रात पाणी सोडण्यासाठी संबंधित यंत्रणेला आणि अधिकाऱ्यांना तातडीने आदेशित करावे, अशी विनंती सभापती विष्णुपंत भुतेकर यांनी जलसंपदामंत्र्यांकडे केली आहे. आता यावर शासन आणि प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण वाशिम जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

जे.डी.चवरे विद्यामंदिर शाळेत रंगली आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर आणि विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी जे.डी.चवरे विद्यामंदिर कारंजा (लाड) येथे आकाश कंदील निर्मिती उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभागी होत स्वतःच्या हाताने आकर्षक आणि रंगीबेरंगी आकाश कंदील तयार केले. आवडीचे शिकायला मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळत होता. कागद,काट्या, जिलेटिन पेपर,क्राफ्ट पेपर आणि विविध शोभेच्या साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सुंदर आकाश कंदील तयार केले. या कार्यशाळेत शाळेचे मुख्याध्यापक श्री.श्रीनिवास जोशी सर आणि शाळेचे पर्यवेक्षक श्री. कैलास सोनुले सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आकाश कंदील बनवण्याच्या सोप्या पद्धती आणि सजावट कशी करावी याबाबतचे तंत्र श्री.अनिरुद्ध बिजवे(कलाशिक्षक) यांनी विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकाश कंदील शाळेत प्रदर्शित करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनातील योगदानाची दखल; सीआरपीएफचे उपनिरीक्षक अयुब खान पठाण यांचा सन्मान!

■ प्रतिनिधी | वाशिम ■



स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक सेवेत गेल्या १२ वर्षांहून अधिक काळ सातत्याने योगदान देणारे केंद्रीय राखीव पोलीस दलाचे (सीआरपीएफ) उपनिरीक्षक अयुब खान पठाण यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सीआरपीएफच्या १९५ व्या वाहिनीचे कमांडंट अनिल कुमार सिंग यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

उपनिरीक्षक अयुब खान पठाण हे सध्या छत्तीसगड राज्यातील नक्षलग्रस्त दंतेवाडा जिल्ह्यात कार्यरत आहेत. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत शासकीय कर्तव्य बजावत असतानाही त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्यातून कर्तव्यनिष्ठा, सामाजिक जाणीव आणि जनसेवेप्रती असलेले समर्पण अधोरेखित होत आहे.

दरम्यान, १ ते ३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत त्यांनी वाशिम शहरासह हिवरा रोहिला येथे विविध सामाजिक उपक्रम राबविले. गेल्या १२ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या त्यांच्या स्वच्छता अभियानामुळे आणि पर्यावरण संवर्धनाच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचत आहे. भारत सरकारच्या 'स्वच्छ भारत अभियान' या उपक्रमाची उद्दिष्टे प्रत्यक्ष कृतीतून साकार करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरत आहेत.

या कार्याची दखल घेत कमांडंट अनिल कुमार सिंग यांनी उपनिरीक्षक अयुब खान पठाण यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. यावेळी उपकमांडंट राज कुमार, उपकमांडंट संजीव कुमार यादव, बटालियनचे सुभेदार मेजर मुकेश कुमार यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


'समाजसेवाही राष्ट्रसेवेचाच भाग'

देशाची सुरक्षा करणे हे वर्दीधारी जवानांचे कर्तव्य असले, तरी समाजाची स्वच्छता राखणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि जनकल्याणासाठी योगदान देणे हेदेखील खऱ्या राष्ट्रसेवेचे अविभाज्य अंग आहे, हा संदेश उपनिरीक्षक अयुब खान पठाण यांच्या कार्यातून अधोरेखित होत आहे. त्यांच्या या योगदानामुळे सीआरपीएफ दलाची प्रतिष्ठा वाढण्यासोबतच इतर कर्मचाऱ्यांनाही सामाजिक कार्यासाठी प्रेरणा मिळत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

'लोकशाही बचाव'चा ढोंगी नॅरेटिव्ह उघडा पाडा!

राहुल गांधी आणि काँग्रेसवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा घणाघात



ठाणे- 'लोकतंत्र बचाव, अराजकता हटाव'च्या नावाखाली काँग्रेस, इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडी पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात फेक नॅरेटिव्ह पसरवत आहेत. १९७५ मध्ये आणीबाणी होती; तेव्हा नेते तुरुंगात, आणि माध्यमांवर बंदी होती. आज विरोधक जंतरमंतरवर आंदोलन करतात, मोर्चे काढतात, पंतप्रधानांच्या घरासमोर आंदोलन करतात आणि तरी लोकशाही धोक्यात असल्याचा दावा करतात', असा घणाघात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. ठाणे शहर भाजपच्या 'लोकतंत्र बचाव, अराजकता हटाव' आंदोलनात बोलताना शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग आणि घटनात्मक संस्थांवर संशय निर्माण करण्यावरून काँग्रेसला सुनावले. 'न्यायव्यवस्थेवर दबाव आणणे, न्यायाधीशांच्या राजीनाम्याची मागणी करणे हा बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा अपमान आहे,' असे ते म्हणाले.

राहुल गांधींच्या 'व्होट चोरी'च्या आरोपांवरही शिंदेंनी पलटवार केला. 'आरोप करा, पण पुरावे द्या. तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, हिमाचलमध्ये काँग्रेसची सरकारे आली, तीही व्होट चोरीने आली का? ईव्हीएमवर निवडून आलेल्या खासदारांनी राजीनामा देऊन व्होट चोरी सिद्ध करावी,' असे आव्हान त्यांनी दिले. २०१९ मध्ये जनतेने शिवसेना-भाजपला दिलेला जनादेश काँग्रेससोबत सत्ता स्थापून बदलण्यात आला, 'खरी व्होट चोरी तेव्हा झाली,' असा टोलाही त्यांनी उबाठाला लगावला. कोविड काळात मुंबई मनपामध्ये खुलेआम नोट चोरी करणारे आज व्होट चोरीची भाषा करेल लागले असल्याची घाणघाती टीका शिंदे यांनी केली. २०१४ पूर्वीचा भारत आणि आजचा 'नया भारत' यांची तुलना करत शिंदे यांनी पाकिस्तानविरोधातील कारवाई, ऑपरेशन सिंदूर, दहशतवादाविरोधातील कठोर भूमिका, नक्षलवादावरील कारवाई, राम मंदिर आणि कलम ३७० हटवण्याचा उल्लेख केला. 'बाळासाहेब ठाकरे असते तर मोदी-अमित शाह यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली असती,' असे ते म्हणाले.



राम पूर्णेकरांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीसांची भेट, बंद दाराआड चर्चा

ठाणे- गेल्या महिनाभरापासून चर्चेत असलेल्या प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणात राम पूर्णेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ठाण्यात भेट घेतली. राम पूर्णेकर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली. 'पूर्णेकर हत्या प्रकरणात योग्य न्याय मिळणार, मारेकरी यांना सरकार पाठीशी घालणार नाही', असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्णेकर कुटुंबीयांना दिले असल्याची माहिती समोर आली आहे. प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणात आतापर्यंत एसआयटी पथक खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा यांच्या वतीने पाच आरोपींना अटक केली आहे. आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये



आहेत. 'कापूरबावडी पोलीस ठाण्यामध्ये पुरवणी जबाबामधे शिंदे गटाच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांची नावे असून मुख्य आरोपी म्हणून आता पर्यंत एसआयटी पथकाने अटक का नाही केली'? असा सवाल राम पूर्णेकर यांनी मुख्यमंत्री यांच्या समोर उपस्थित केला आहे.

सरकार आणि ज्ञानेश कुमार लोकशाहीचे शत्रू

मुंबई- मतचोरीविरोधात विरोधक आक्रमक झाले असून शनिवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात 'जनमहाभियोग' एकमताने मंजूर करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर दिल्लीत महामार्च आयोजित केला तत्पूर्वी माध्यमांशी बोलताना शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकार आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर सडकून टीका केली. हे सरकार आणि सरकारने नेमलेले ज्ञानेश कुमार लोकशाहीचे शत्रू असल्याचे संजय राऊत म्हणाले. ते दिल्लीत

संजय राऊत यांचा हल्लाबोल



बोलत होते. संजय राऊत म्हणाले, काल दिल्लीत मॉक पार्लमेंट झाले. लोकसभेच्या माजी अध्यक्षा मीरा कुमार या मॉक पार्लमेंटच्या स्पीकर होत्या. इतर प्रमुख नेते त्यात सहभागी झाले आणि एकमताने ज्ञानेश कुमार यांच्या हकालपट्टीचा ठराव मंजूर झाला. ज्ञानेश कुमार यांना पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. हे सरकार आणि सरकारने नेमलेले मुख्य निवडणूक आयुक्त लोकशाहीचे शत्रू असून निर्लज्जपणाचा कळस असल्याने खुर्चीला चिकटून बसले आहेत. त्यांना धक्का द्यावा लागेल. आज देशाची राजधानी दिल्लीतील रामलीला मैदानावर संपूर्ण हिंदुस्थानातून लोक येत आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या खुर्चीला धक्का देण्यासाठी रामलीला मैदानावर इंडिया आघाडीचा महामार्च होईल. सरकारवर दबाव टाकण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम सातत्याने सुरू राहतील.

'अजित पवारांच्या निधनामुळे यंदा दिवाळी साजरी करणार नाही'

दुष्काळी दौऱ्यावर असलेल्या शरद पवारांनी दिली माहिती

मुंबई- राज्यात दुष्काळ जाहीर झाला असून राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार सातत्याने महाराष्ट्रभर पाहणी दौरे करत आहेत. आज ते पंढरपुरातील गावांमध्ये शेतकऱ्यांना भेटण्याकरता गेले आहेत. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. शरद पवारांनी केंद्र सरकारकडे मदतीचं आवाहन केले असून त्यांनी या जिल्ह्यातील दुष्काळाचे भीषण वास्तव समोर आणले.तसेच, यंदा पवार कुटुंबीय दिवाळी साजरी करणार नसल्याचंही त्यांनी आज जाहीर केलं.

सोलापूरमध्ये १३९ गावं बाधित आहेत. इथे १३५ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. ४० विहिरी आहेत. २१ इंधन विहिरी आहेत. माढामध्ये ११० टँकर आहेत. शेजारच्या जिल्ह्यात अशीच परिस्थिती आहे. या दुष्काळग्रस्त पट्ट्यात मदतीची गरज आहे. धीर देण्याची गरज आहे. मला खात्री आहे की राज्य सरकारने जर केंद्र सरकारला हे पटवून दिलं तर भरीव मदत मिळेल. पाण्याची




दिवसेंदिवस मागणी वाढत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. खडकवासला आणि इतर धरणातील पाणी काळजीपूर्वक वापरलं पाहिजे. आजपासून जवळपास जूनपर्यंत काळजी घ्यावी लागणार आहे. पाण्याच्या साठ्यावर लक्ष दिलं पाहिजे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

दरम्यान, याचवर्षी जानेवारी महिन्यात अजित पवार यांचं निधन झालं. त्यांच्या अकस्मित निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. त्यामुळे पवार कुटुंबीय अजूनही दुःखी असून यावेळी दिवाळी साजरी करणार नसल्याचं शरद पवारांनी स्पष्ट केलं. त्यांना यंदाच्या दिवाळीबाबत विचारण्यात आलं होतं. त्यावर ते म्हणाले, 'यंदा आमच्याकडे दिवाळी नाही. यावेळी आम्ही दिवाळी साजरी करणार नाही. यंदा पहिल्यांदाच अजित पवारांविना दिवाळीचा सण येतोय. त्यामुळे, कुटुंबीयांना मोठे दुःख असल्याने यंदा पवार कुटुंबीय दिवाळी साजरी करणार नाही.' पवार कुटुंबीयांकडून साजरी केली जाणार दिवाळी हा राज्याच्या राजकारणात चर्चेचा आणि आकर्षणाचा विषय असतो. दरवर्षी बारामतीच्या गोविंदबागेत दिवाळी पाडवा साजरा केला जातो. यासाठी राज्यभरातून कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेतेमंडळी शरद पवारांच्या भेटीसाठी येत असतात. मात्र, अजित पवारांच्या अकाली निधनामुळे यंदा या परंपरेला खंड पडणार आहे.

४९० रेक धावले अन् कोळशाचा साठा वाढला

पुणे- कोळसा वाहतूक करणाऱ्या रेल्वे रेकची संख्या वाढल्याने कोळशावर आधारित देशांतर्गत वीज केंद्रांमधील साठा १७४ लाख टनांवरून १८१ लाख टनांवर पोहोचला. त्यामुळे गंभीर टंचाई असलेल्या केंद्रांची संख्याही १०० वरून ८५ पर्यंत कमी झाली. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (सीईए) ही आकडेवारी प्रसिद्ध केली.

कोळसा खाणी असलेल्या भागातच पडलेला पाऊस आणि वाहतुकीतील अडथळ्यांमुळे इंधन पातळी गंभीर झालेल्या केंद्रांची संख्या वाढली होती. या महिन्यात गेल्या बुधवारी (२१ ऑक्टोबर) देशातील १९१ मधील १०० औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांवरील कोळसा साठा चिंताजनक पातळीवर असल्याचे नोंदविण्यात



आले होते. आता कोळसा वाहून नेणाऱ्या रेल्वे रेकची संख्या वाढविण्यात येत असून, ४९० हून अधिक रेल्वे रेक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ऑक्टोबरमध्ये कोळसा वाहतुकीसाठी सरासरी ४७२ रेक धावले.दरम्यान, वीजनिर्मिती केंद्रांपर्यंत कोळसा पोहोचविण्यासाठी पुरवठा साखळी सक्षम करण्यात येत असल्याचे केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी सांगितले होते.

महानिर्मिती प्रकल्पांची स्थिती थोडी बरी

काही दिवसांपूर्वी 'महानिर्मिती'च्या भुसावळ, चंद्रपूर, खापरखेडा, कोराडी, नाशिक, पारस, परळी या सातही प्रकल्पांमध्ये कोळशाचा साठा चिंताजनक पातळीवर होता. हे प्रकल्प सुमारे १० हजार २०० मेगावॅट क्षमतेने चालतात. या प्रकल्पांमध्ये कोळशाचा ३५.१३ लाख टन नियमन साठा असणे गरजेचे आहे. त्यातील खापरखेडा आणि पारस प्रकल्पांमधील कोळशाच्या साठ्यात शुक्रवारी (३० ऑक्टोबर) वाढ झाली असून, सातही प्रकल्पांमधील कोळशाचा साठा ५.६७ लाख टनांवर पोहोचला आहे. हा साठा गेल्या बुधवारी (२१ ऑक्टोबर) ५.५६ लाख टन इतका होता.

भाजपने कनॉट प्लेसमधील दुकाने बंद केली
व्यापाऱ्यांचे नुकसान कोण करत आहे?

नवी दिल्ली- दिल्लीतील इंडिया आघाडीच्या मेगा रॅलीवरून भाजप आणि काँग्रेसमध्ये जोरदार शाब्दिक चकमक सुरू आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपवर व्यापाऱ्यांचे नुकसान केल्याचा आरोप केला आहे. भाजपने दिल्लीतील कनॉट प्लेसमधील सर्व दुकाने जबरदस्तीने बंद केली आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान कोण करत आहे? असा सवाल राहुल गांधींनी केला.

राहुल गांधी म्हणाले, आम्ही सर्वांना सांगितले होते की, जेव्हा तुम्ही मोर्चा आणि मेगा रॅलीसाठी येथे याल, तेव्हा तुम्ही वस्तू खरेदी करून शॉपिंग करावी. पण जेव्हा आम्ही कनॉट प्लेसला पोहोचलो,

राहुल गांधी यांचा सवाल

तेव्हा आम्हाला कळले की भाजपने सर्व दुकाने जबरदस्तीने बंद केली आहेत. त्यामुळे, व्यापाऱ्यांचे नुकसान कोण आणि कसे करत आहे, हे तुम्हाला कळायला हवे, असे ते म्हणाले.शनिवारी रात्री उशिरा राहुल गांधींनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट करून, दिल्लीत येणाऱ्या लोकांना स्थानिक व्यापाऱ्यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले होते.

ते म्हणाले की, रॅली आणि मोर्चात सहभागी होण्यासाठी दिल्लीत येणाऱ्यांनी येथील दुकानांमधून वस्तू खरेदीही कराव्यात. ही दिवाळी, छठ आणि भाऊबीजची सणाची वेळ आहे. बाहेरून दिल्लीत येणारे लाखो लोक जर छोट्या दुकानांमधून वस्तू खरेदी केल्या, तर स्थानिक व्यापाऱ्यांना फायदा होईल. आपल्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, निषेध करा, मोर्चा काढा, रॅली काढा आणि थोडी खरेदीसुद्धा करा, व्यापाऱ्यांना फायदाच होईल, असे ते म्हणाले.

या रॅलीमुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होईल, अशा अफवा भाजप पसरवत असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला होता. त्यांनी दावा केला की, विरोधी पक्षाच्या रॅलीमुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होणार नाही, उलट दिल्लीत येणाऱ्या लोकांच्या खरेदीमुळे त्यांना फायदाच होईल.

मान्सूननंतर आता हिवाळ्यावरही 'एल निनो'चा प्रभाव?
नोव्हेंबरमध्येही उन्हाचा ताप वाढण्याचा अंदाज

मुंबई- ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्रातील बहुतांश भागात उन्हाच्या तीव्र झळांचा सामना नागरिकांना करावा लागला. दरम्यान, प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थितीची तीव्रता पुढील काही दिवसात वाढण्याची शक्यता असून हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, हिमालयाच्या लगतचे काही भाग वगळता देशाच्या बहुतांश भागात नोव्हेंबर महिन्यात कमाल तापमान सरासरीहून अधिक राहण्याची शक्यता आहे. यात सर्वाधिक फटका गुजरात आणि राजस्थान या राज्यांना बसण्याची शक्यता असून महाराष्ट्रातील काही भागांसह देशाच्या पश्चिम किनारपट्टीवरील प्रदेशांना उष्णतेचा तडाखा सहन करावा लागेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

यंदा देशातील बहुतांश भागात सरासरीहून कमी पावसाची नोंद झाली. तसेच मान्सूनने लवकरच माघार घेतल्याने अनेक भागात ऑक्टोबरच्या सुरुवातीपासून उकाड्यात वाढ झाली आहे. त्यामुळे हिवाळा ऋतू केव्हा सुरु होतो याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, महाराष्ट्रात सध्या किमान तापमानात चढ-उतार होत असला तरीही पुढील काही दिवसात किमान तापमानात १



ते २ अंश सेल्सिअसने वाढ होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. हवामान विभागाकडून नोव्हेंबर महिन्यासाठी हवामानाचे अंदाज शनिवारी प्रसिद्ध करण्यात आले असून यात देशाच्या बहुतांश प्रदेशात सरासरीहून अधिक कमाल तापमान राहील, अशी शक्यता व्यक्त केली आहे.

नोव्हेंबर -डिसेंबर महिन्यात 'एल निनो' तीव्र

हवामान विभागाने शनिवारी प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, विषुववृत्तीय प्रशांत महासागरात अत्यंत तीव्र 'एल निनो'स्थिती निर्माण झाली आहे. 'मॉन्सून मिशन कपल्ड फोरकास्ट सिस्टम' आणि जगभरातील विविध हवामान संस्थांनी प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, 'एल निनो' स्थितीची तीव्रता नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात कायम राहण्याचा अंदाज आहे.


राज्यात काही ठिकाणी दिलासा?

नोव्हेंबर महिन्यामध्ये देशातील बहुतांश भागांत किमान तापमान (रात्रीचे तापमान) सरासरीहून अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. मात्र, मध्य भारत आणि पूर्व भारतातील बहुतांश भागांमध्ये किमान तापमान सरासरीइतके किंवा त्याहून कमी राहण्याचा अंदाज आहे. यात मध्य प्रदेश, छत्तीसगड , महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड आणि बिहार आदी राज्यांमधील काही भागांचा समावेश आहे.राज्यात नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीपासून दिवसाचे तापमान अधिक असले तरीही रात्री किंवा पहाटेच्या वेळी काही भागात गारवा जाणवतो. तसेच साधारणपणे नोव्हेंबरच्या पंधरवड्यानंतर उत्तर भारतातून येणाऱ्या गार वाऱ्यांमुळे किमान तापमानात काहीशी घट होण्यास सुरुवात होते. त्यामुळे हा कालावधी राज्यात थंडी सुरु होण्याचा सरासरी कालावधी मानला जातो.

संक्षिप्त

मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला पुन्हा अडकले लग्नबंधनात

मुंबई- जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि पत्रकार निधी राजदान हे नुकतेच विवाहबंधनात अडकले आहेत. शनिवारी दोघांनीही सोशल मीडिया पोस्टद्वारे आपल्या विवाहाची घोषणा केली.ओमर अब्दुल्ला यांनी 'X' वर लग्नाचे फोटो शेअर करत त्याला 'काल एका नवीन प्रवासाची सुरुवात झाली' असे कॅप्शन दिले. यावर निधी राजदान यांनी 'इट्स डन ब्रो' अशी मिश्कील प्रतिक्रिया देत विवाहाच्या वृत्ताला दुजोरा दिला.मिळालेल्या माहितीनुसार, श्रीनगरमध्ये अत्यंत साध्या पद्धतीने आणि मोजक्या नातेवाइकांच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा पार पडला. या वेळी त्यांचे वडील व नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला, मॉली अब्दुल्ला, ओमर यांच्या तीन बहिणी आणि इतर जवळचे नातेवाईक उपस्थित होते. तसेच निधी राजदान यांचे वडील ज्येष्ठ पत्रकार एम. के. राजदान आणि आई सरला राजदान हेदेखील या सोहळ्याला उपस्थित होते.ओमर अब्दुल्ला यांचा यापूर्वी पायल अब्दुल्ला यांच्याशी विवाह झाला होता आणि त्यांना दोन मुले आहेत. दोघांमधील वैवाहिक वाद अनेक वर्षे वेगवेगळ्या न्यायालयांमध्ये सुरू होते. जुलै महिन्यात दोघांनीही परस्पर संमतीने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेत एकमेकांविरुद्ध दाखल केलेले सर्व खटले मागे घेण्याचे मान्य केले.



हनी सिंगच्या भाच्याचा भीषण अपघातात मृत्यू

मुंबई- प्रसिद्ध गायक आणि रॅपर यो यो हनी सिंग याचा भाचा विदित ओलक याचा भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. रविवारी पहाटे पंजाबमधील जालंधर येथे हा अपघात झाला. या दुर्घटनेत विदितसोबत त्याचा मित्र आरव तलवार याचाही मृत्यू झाला. दोघेही मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीवरून घरी परतत असताना त्यांच्या भरधाव कारची रस्त्यावर उभ्या असलेल्या महापालिकेच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला जोरदार धडक बसली.विदित ओलक हा हनी सिंगचा भाचा असून त्याचे वडील दिनेश ओलक हे पंजाबी संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध 'स्पीड रेकॉर्ड्स' कंपनीचे मालक आहेत. तर अपघातात मृत्युमुखी पडलेला आरव तलवार हा 'पॅपी स्वीट्स'च्या मालकाचा मुलगा होता. पोलीस लाइन्स परिसरातील उड्डाणपुलावर हा अपघात झाल्याचे वृत्त 'इंडिया टूडे'ने दिले आहे.



दिल्लीहून काठमांडूला जाणारे विमान लखनौला वळवले

नवी दिल्ली- दिल्लीहून काठमांडूला जाणारे एअर इंडियाचे विमान लखनौला वळवण्यात आले. रविवारी पहाटे १.१९ वाजता लखनौमधील चौधरी चरण सिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितपणे उतरले. काठमांडूमधील खराब हवामानामुळे विमान लखनौला वळवण्याचा निर्णय घेण्यात आला. विमानातील सर्व प्रवाशांना सुरक्षित उतरण्यात आले.अमर उजालाने दिलेल्या वृत्तानुसार, एअर इंडियाचे AI-२२३ हे विमान दिल्लीहून काठमांडूला चालले होते. मात्र नेपाळमधील हवामानाची खराब स्थिती पाहता विमान काठमांडूऐवजी लखनौला वळवण्याचा निर्णय घेण्यात आला. लखनौ विमानतळावर विमान उतरताच सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. यानंतर पहाटे ३.३१ वाजता विमान लखनौहून दिल्लीला रवाना झाले.

जपानमध्ये ६.० रिश्टर स्केल भूकंपाचा धक्का

नवी दिल्ली- जपानला रविवारी पहाटे पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का बसला आहे. पहाटे ३.४५ वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे हादरे बसले. या भूकंपाची तीव्रता ६.० रिश्टर स्केल इतकी होती. भूकंपाचे केंद्र जपानमधील शिमा शहराच्या दक्षिण-आग्नेय दिशेला ५८ किलोमीटर अंतरावर होते. या भूकंपात कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती नाही.यापूर्वी २५ ऑक्टोबर रोजी जपानमध्ये भूकंप झाला होता. या भूकंपाची तीव्रता ६.३ रिश्टर स्केल इतकी होती. बोनिन बेटे जपानच्या पॅसिफिक महासागर प्रदेशात वसलेली आहेत. जपान पॅसिफिक महासागराच्या अशा प्रदेशात आहे जिथे अनेक टेक्टॉनिक प्लेट्स एकत्र येतात. यामुळेच जपान आणि आसपासच्या परिसरात वारंवार भूकंप होतात.

दिवाळीच्या तोंडावर महागाईचा बॉम्ब फुटला; सीएनजीच्या दरात वाढ

मुंबई- महागाईने होरपळलेल्या जनतेला आणखी एक झटका बसला असून मुंबई महानगर प्रदेशात सीएनजीच्या दरामध्ये वाढ झाली आहे. महानगर गॅस लिमिटेडने सीएनजीच्या दरात प्रति किलो १ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या सात महिन्यातील ही सहावी दरवाढ असून या दरवाढीमुळे सीएनजीचा दर ८९ रुपयांवरून ९० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे. आखातात सुरू असलेल्या युद्धामुळे तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठ्यावर परिणाम झाला असून खर्चातही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे ही दरवाढ अनिवार्य असल्याचे महानगर गॅस लिमिटेडने म्हटले. दरम्यान, या दरवाढीचा घरगुती पाईप्सद्वारे मिळणाऱ्या स्वयंपाकाच्या गॅसच्या दरावर कोणताही परिणाम झालेला नाही. पीएनजीचे दर स्थिर आहेत. 'टाइम्स ऑफ इंडिया'ने याबाबत वृत्त दिले आहे. गेल्या एप्रिल महिन्यापासून सीएनजीच्या दरात झालेली ही सहावी दरवाढ आहे. यापूर्वी १ सप्टेंबर रोजी प्रति किलो २ रुपयांची वाढ करण्यात आली होती. याचा थेट परिणाम प्रवासी वाहतुकीवर झाला होता आणि ऑटो रिक्षाचे किमान भाडे २६ रुपयांवरून २७ रुपये करण्यात आले होते. त्यानंतर १ ऑक्टोबर रोजी पुन्हा १ रुपयाची वाढ झाली होती.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३५ ■ सोमवार, २ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

मल्टी मोडल लॉजिस्टिक्स पार्क प्रकल्पात स्थानिकांना रोजगारासाठी प्राधान्य - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

सिंदी रेल्वे येथे मल्टी मोडल लॉजिस्टिक्स पार्कचे भूमीपूजन

वर्धा जनमाध्यम : राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नॅशनल हायवे लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड या स्पेशल पर्पज व्हेईकलद्वारा उभारण्यात येत असलेल्या मल्टी मोडल लॉजिस्टिक पार्क प्रकल्पामुळे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या माध्यमातून थेट विदेशात निर्यातीला चालना मिळेल. सोबतच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल, असे प्रतिपादन केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

सिंदी रेल्वे येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नॅशनल हायवे लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड - एनएचएलएमएल या स्पेशल पर्पज व्हेईकल द्वारा AMARA TRANZ सोल्यूशन या कंपनी मार्फत प्रकल्प उभारण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. या प्रकल्पाचे आज भूमीपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, आमदार समिर कुणावार, जिल्हाधिकारी वान्मथी सी, माजी खासदार रामदास तडस, सिंदी रेल्वेच्या नगराध्यक्ष राणी कलोडे आदी उपस्थित होते.

विदर्भातील कापूस, रुई, सुत, संत्रा, भाजीपाला यासारख्या मालाला मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क प्रकल्पामुळे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या माध्यमातून थेट विदेशात निर्यातीला चालना मिळणार आहे. विदर्भातील मुंबई-कोलंबो – ढाका मार्गे जाणाऱ्या



वाहतुकीच्या वेळेत बचत होईल. या प्रकल्पातून पहिली मारोती कारची रॅक सुरु झाली आहे, असे नितीन गडकरी म्हणाले. सिंदी रेल्वे स्टेशनजवळ १५० एकर क्षेत्रात हा प्रकल्प नॅशनल हायवे लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड ही कंपनी जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणसह संयुक्तपणे विकसित करत आहे. सिंदी रेल्वे येथील ड्रायपोर्टच्या माध्यमातून विदर्भातील कापूस, कापसाची रुई, कपडा, संत्रा मुंबईला न जाता कलकत्त्याच्या हल्दीया मार्गे थेट बांग्लादेशला जातील. यामुळे प्रति कंटेनर दीड लाख रुपये असलेला वाहतूक खर्च हा एक लाख रुपयावर येईल. याचा विदर्भातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

राज्य व केंद्र शासनाच्या तरतुदीने नागपूर- वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर बांधल्या जाणाऱ्या मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्कला सिंदी रेल्वेच्या ड्रायपोर्टला जोडून येथे कोल्ड स्टोरेज, वेअर हाऊस या सुविधा निर्माण करून वर्धा आणि नागपूर शहरातील मोठमोठ्या उद्योगांचे केंद्रीकरण या ठिकाणी होणार आहे. त्याचप्रमाणे जे निर्यातक आहेत त्यांचे क्लस्टर येथे तयार करण्यात येईल. सिंदी येथे कस्टमचे देखील कार्यालय राहणार असल्यामुळे देश-विदेशातील कंटेनर या ठिकाणी येणार आहे.

शेतातील डिझेल इंजिन चोरणारे तिघे १२ तासांत जाळ्यात

सेलू पोलिसांची धडाकेबाज कारवाई; तीन चोरटे जेरबंद, ९० हजारांचा मुद्देमाल जप्त



सेलू / जनमाध्यम : शेतातील नाल्यावर बसवलेले डिझेल इंजिन चोरून नेणाऱ्या तीन आरोपींचा सेलू पोलिसांनी अवघ्या १२ तासांत छडा लावला. स्थानिक गुन्हे शाखेच्या धर्तीवर काम करणाऱ्या सेलू पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीचे डिझेल इंजिन आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

हरिनारायण शंकर कामडी (रा. सेलू) यांच्या चिंचोली शेतशिवारातील नाल्यावर लावलेले इंदिरा मार्शल कंपनीचे २० हजार रुपये किमतीचे डिझेल इंजिन २४ ते २५ ऑक्टोबरदरम्यान अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. याप्रकरणी त्यांनी ३१ ऑक्टोबर रोजी सेलू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी गुन्ह्याचा तपास सुरू केला असता डी.बी. पथकाला तीन संशयित मोटारसायकलवरून डिझेल इंजिन घेऊन सेलूकडे येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यामध्ये दामोधर अंकुश करनाके (२२, रा. कोलगाव), शिवम घनश्याम अवघडे (२२) आणि विवेक विनोद वाढवे (२०, दोघेही रा. वडगाव कला, ता. सेलू) यांचा समावेश आहे.

पोलिसी चौकशीत आरोपींनी डिझेल इंजिन चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या ताब्यातून २० हजार रुपये किमतीचे चोरीचे डिझेल इंजिन आणि गुन्ह्यात वापरलेली ७० हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच ३२ ए क्यू ७२२८) जप्त करण्यात आली. त्यामुळे चोरी गेलेल्या मुद्देमालासह गुन्ह्यात वापरलेले वाहनही पोलिसांच्या हाती लागले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महादीक यांच्या मार्गदर्शनाखाली सेलूचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, पोलीस उपनिरीक्षक उमेल उगले, डी.बी. पथकाचे अंमलदार अनिल केकतपुरे, रामकिसन इप्पर, गजानन कमठाने, विनायक गोडे आणि लोकेश पवनकर यांनी केली.

दिवाळीतही शहर अंधारात; प्रशासनाला जाग कधी येणार

दोन-अडीच वर्षांपासून पथदिवे बंद व्यापारी, भाविक आणि नागरिकांचा संताप

सेलू / जनमाध्यम : दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव मात्र सेलू शहरातील प्रमुख रस्त्यावरील आणि पुरातन शंकर मंदिर परिसरातील पथदिवे गेल्या दोन-अडीच वर्षांपासून बंद असल्याने नागरिकांना अंधारातच वावरावे लागत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरात रोषणाईची तयारी सुरू असताना महत्त्वाच्या ठिकाणचे पथदिवे सुरू करण्याची साधी तसदीही नगर प्रशासनाने घेतलेली नाही. त्यामुळे यंदाची दिवाळीही अंधारातच काढायची का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील मेडिकलसारख्या प्रमुख चौकात तसेच वर्दळीच्या मार्गावर असलेले पथदिवे बंद अवस्थेत आहेत. या परिसरात व्यापारी प्रतिष्ठाने, सार्वजनिक मूत्रालय आणि मंदिर असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र पुरेशा प्रकाशाअभावी महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अंधारामुळे अपघात अथवा अनुचित प्रकार घडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, या समस्येबाबत व्यापारी, भाविक आणि स्थानिक नागरिकांनी अनेकदा तोंडी तसेच निवेदनाद्वारे प्रशासनाकडे मागणी केली. सामाजिक कार्यकर्ते तथा व्यापारी महेश बोकडे यांनीही संबंधित दुकानदार आणि स्थानिक दुरुस्ती करणाऱ्या कर्मचाऱ्यांशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र संपर्क होऊ शकला नसल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या वारंवार तक्रारी करूनही पथदिव्यांची दुरुस्ती होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एकीकडे विकासकामांच्या घोषणा केल्या जातात, तर दुसरीकडे दोन-अडीच वर्षांपासून बंद असलेले पथदिवे सुरू करण्यासाठी प्रशासनाला वेळ मिळत नाही, ही बाब संतापजनक आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांपेक्षा इतर कामांनाच प्राधान्य दिले जात असल्याची टीका आता होत आहे. लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांना नागरिकांच्या या समस्येचे गांभीर्य कधी लक्षात येणार, असा सवालही उपस्थित होत आहे. दिवाळीपूर्वी तरी संबंधित प्रशासनाने जागे होऊन बंद पथदिवे तातडीने दुरुस्त करावेत किंवा नवीन दिवे बसवावेत, अशी मागणी व्यापारी, भाविक आणि नागरिकांनी



केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. प्रकाशाच्या सणात शहरातील महत्त्वाचे रस्ते अंधारात ठेवणाऱ्या प्रशासनाला आता तरी जाग येणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वर्ध्यात दुधाच्या नावाखाली ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ

श्री कृष्णा माई गोरस भंडारच्या दुधावर प्लास्टिकसदृश साय

दूध गरम करताच प्रकार उघड, व्हिडिओ समोर

वर्धा जनमाध्यम : वर्ध्यात ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे काय, असा प्रश्न उपस्थित करणारा धक्कादायक प्रकार कारला चौक परिसरातील श्री कृष्णा माई गोरस भंडारच्या दुधाबाबत समोर आला आहे. या केंद्रातून खरेदी केलेले दूध गरम करताच त्यावर प्लास्टिकसदृश साय तयार झाल्याचा दावा ग्राहकाने केला आहे. या प्रकाराचा व्हिडिओही समोर आला असून संबंधित ग्राहकाने अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे शहरातील दूध विक्रीच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



दूध हा प्रत्येक कुटुंबाच्या दैनंदिन आहाराचा अविभाज्य भाग आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण दुधाचे सेवन करतात. अशा पार्श्वभूमीवर दुधाच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण होणे ही साधी बाब नसून थेट सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर बाब आहे. ग्राहक शुद्ध दुधाच्या अपेक्षेने पैसे मोजतात. मात्र, त्याच दुधावर संशयास्पद स्वरूपाची साय तयार होत असेल तर ग्राहकांनी विश्वास ठेवायचा कुणावर, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

परवाना कोणाचा तपासणीचा धाक कुठे

श्री कृष्णा माई गोरस भंडारला दूध विक्रीचा अधिकृत परवाना आहे का विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुधाचे नियमित नमुने तपासले जातात का ग्राहकाच्या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासन संबंधित केंद्राची प्रत्यक्ष तपासणी करणार का दुधाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून त्यातील घटकांची शास्त्रीय तपासणी केली जाणार का दोष आढळल्यास संबंधित संचालकांवर कठोर कारवाई होणार का असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

प्रसिद्ध गो-संवर्धन गोरस भंडारचा संबंध नाही

दरम्यान, वर्ध्यातील प्रसिद्ध गो-संवर्धन गोरस भंडार या संस्थेचा कारला चौक परिसरातील श्री कृष्णा माई गोरस भंडारशी कोणताही संबंध नसल्याचे गो-संवर्धन गोरस भंडारचे व्यवस्थापक कडू यांनी दैनिक जनमाध्यमशी बोलताना स्पष्ट केले.

कापूस चोरांचे बिंग फुटले | तीन विधिसंघर्षित बालके जाळ्यात

३.१४ लाखांचा मुद्देमाल जप्त



वर्धा जनमाध्यम : शेतातील बंड्याचे कुलूप तोडून साठवून ठेवलेला कापूस चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात एका १९ वर्षीय मुख्य आरोपीसह तीन विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्यांच्याकडून १६२ किलो कापूस आणि चोरीसाठी वापरलेले टाटा एस पिकअप वाहन असा एकूण ३ लाख १४ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हिंगणघाट येथील संत तुकडोजी वॉर्डातील रहिवासी प्रवीण माणिकराव शिंदे यांच्या शेतातील वेचणी केलेला कापूस बंड्यात साठवून ठेवण्यात आला होता. २९ ते ३० ऑक्टोबर दरम्यान अज्ञात चोरट्यांनी बंड्याच्या दरवाजाचे कुलूप तोडून कापूस लंपास केला. याप्रकरणी ३० ऑक्टोबर रोजी हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७१२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) व ३३४(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. गोपनीय माहिती आणि तपासाच्या आधारे पोलिसांनी अथांग कवडुजी कांबळे (वय १९, रा. संत तुकडोजी वॉर्ड, हिंगणघाट) याच्यासह तीन विधिसंघर्षित बालकांचा शोध घेतला. चौघेही हिंगणघाटमध्ये मिळून आल्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी करण्यात आली.

सर्वायकल कॅन्सर मुक्त महाराष्ट्र अभियानात आता वर्धा जिल्ह्याचाही समावेश

जीविका फाउंडेशनच्या साथीने २५ हजाराहून अधिक मुलींना मिळणार मोफत लस

वर्धा जनमाध्यम : महिला आणि किशोरवयीन मुलींसाठी प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेच्या दिशेने महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या 'गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग मुक्त महाराष्ट्र' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा विस्तार वेगाने सुरू आहे. पुणे, सातारा, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पालघर जिल्ह्यानंतर आता वर्धा जिल्ह्याचाही या राज्यव्यापी अभियानात अधिकृत समावेश करण्यात आला आहे.

भारतामध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण चिंताजनक वेगाने वाढत आहे. दर ८ मिनिटांनी एका महिलेला या आजारामुळे जीव गमवावा लागत असून दररोज सुमारे २०० महिलांचा मृत्यू होत आहे. हा कर्करोग देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक आढळणारा कर्करोग आहे. मात्र दिलासादायक बाब म्हणजे वेळेवर तपासणी आणि एचपीव्ही लसीकरणाच्या माध्यमातून हा कर्करोग पूर्णपणे टाळता येऊ शकतो.

याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग मुक्त महाराष्ट्र अभियानाच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींच्या आरोग्याला प्राधान्य देत आहोत आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचेल याची खात्री करत आहोत.

आपल्या मुलींचे संरक्षण करणे हे आपले नैतिक आणि सामाजिक दायित्व आहे. कॉर्पोरेट घटकांनी सीएसआरच्या माध्यमातून या अभियानात सहभागी व्हावे आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाविरुद्धच्या आपल्या सामूहिक लढ्याला बळ द्यावे.

या अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये 'जीविका फाउंडेशन' (जीविका हेल्थकेअर) राज्याचा अंमलबजावणी भागीदार म्हणून काम करत आहे. शासनासोबत समन्वय साधून जनजागृती, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि समुदाय पातळीवर विश्वास निर्माण करण्यासाठी जीविका फाउंडेशन सक्रियपणे कार्यरत आहे. 'जीविका फाउंडेशन' या मोहिमेअंतर्गत १५ ते २० वयोगटातील मुलींना मोफत लस देऊन त्यांना सुरक्षा कवच प्रदान करणार आहे.

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात कारंजा या आकांक्षित तालुक्यापासून लसीकरणाची सुरुवात होईल आणि त्यानंतर आर्वी व वर्धा तालुक्यांमध्ये ही मोहीम राबवली जाईल. या पहिल्या टप्प्यात सुमारे ५,००० लाभार्थी मुलींना लस दिली जाईल. तर, दुसऱ्या टप्प्यात या तीनही तालुक्यांत १०० टक्के उद्दिष्ट गाठण्यासाठी आणखी २०,००० पेक्षा जास्त पात्र मुलींचे लसीकरण केले जाणार असून, त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात या मोहिमेचा विस्तार केला जाईल.

आष्टीच्या रस्त्यांवर अतिक्रमणराज नगरपंचायत प्रशासन सुस्त; नागरिकांचे हाल बेहाल

आष्टी शहीद जनमाध्यम : आष्टी शहरातील रस्त्यांवर अतिक्रमणांचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत असताना नगरपंचायत प्रशासन मात्र कुंभकर्णी झोपेत असल्याचे चित्र आहे. रस्ते नागरिकांच्या वाहतुकीसाठी की अतिक्रमणधारकांच्या ताब्यासाठी, असा संतप्त सवाल आता आष्टीकर विचारत आहेत. दररोजच्या वाहतूक कोंडीने नागरिक हैराण झाले असून, प्रशासनाला एखाद्या मोठ्या अपघाताची प्रतीक्षा आहे काय,

आष्टी-तळेगाव मार्गावरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई झाली; मग शहरातील मुख्य बाजारपेठ आणि वर्दळीच्या मार्गांवरील अतिक्रमणांवर कारवाईचा हात का आखडता घेतला जात आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते मोजणीत अतिक्रमणांचे सीमांकन होऊनही पुढील कारवाईचा पत्ता नाही.

बसस्थानक ते मेडिकल चौक आणि तहसील कार्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. अनेक ठिकाणी रस्ते इतके अरुंद झाले आहेत की, दोन मोठ्या वाहनांना समोरासमोरून जाणेही कठीण झाले आहे. अशा स्थितीत रुग्णवाहिकेला रस्ता मिळणार कसा? शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची

एकीकडे रस्त्यांची दुरवस्था, दुसरीकडे अतिक्रमणांचा कब्जा, अशा दुहेरी संकटात शहर अडकले आहे. नगरपंचायतीने तातडीने सर्वेक्षण करून अतिक्रमणे हटवावीत आणि मुख्य रस्ते मोकळे करावेत. अन्यथा दुर्घटनेनंतर जागे होणाऱ्या प्रशासनाला जबाबदार कोण धरणार, हा प्रश्न अनुत्तरितच राहील.

दिवाळीच्या गर्दीसाठी रेल्वेचा विशेष 'धडाका'

नागपूर-मुंबई, नागपूर-पुणे मार्गावर विशेष गाड्या; वर्धा स्थानकावरही थांबा

वर्धा जनमाध्यम : दिवाळी, लक्ष्मीपूजन आणि छठ सणानिमित्त रेल्वे प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने विशेष रेल्वे गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर-मुंबई आणि नागपूर-पुणे या महत्त्वाच्या मार्गांवर सुपरफास्ट विशेष रेल्वे धावणार आहेत. विशेष म्हणजे, या दोन्ही रेल्वे गाड्यांना वर्धा स्थानकावर थांबा देण्यात आल्याने जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. सणासुदीच्या काळात नियमित रेल्वे गाड्यांचे आरक्षण मिळविण्यासाठी प्रवाशांची मोठी धावपळ होते. ही गर्दी कमी करण्यासोबतच प्रवाशांना अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रेल्वे प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस-नागपूर विशेष- गाडी क्रमांक ०१०८९ लोकमान्य टिळक टर्मिनस-नागपूर सुपरफास्ट विशेष दर गुरुवारी आणि रविवारी रात्री ९.४५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १२.१० वाजता नागपूरला पोहोचेल. ही गाडी ५ ते १५ नोव्हेंबरदरम्यान चार फेऱ्या करणार आहे. परतीची गाडी क्रमांक ०१०९० नागपूर-लोकमान्य टिळक टर्मिनस दर शुक्रवारी आणि सोमवारी सायंकाळी ४.१० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ५.५० वाजता मुंबईला पोहोचेल. ही गाडी ६ ते १६ नोव्हेंबरदरम्यान चार फेऱ्या करणार आहे.

पुणे-नागपूर विशेष रेल्वे- गाडी क्रमांक ०१४४३ हडपसर-नागपूर सुपरफास्ट विशेष ७ आणि १४ नोव्हेंबर रोजी शनिवारी सायंकाळी ४.०५ वाजता हडपसरहून सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता नागपूरला पोहोचेल.

कार्यालय ग्रामपंचायत साटोडा, पं.स.वर्धा,जि.प.वर्धा.
जाहीर निविदा सुचना सन २०२६-२७

सर्व नोंदणीकृत कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत साटोडा येथे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर प्राकलनानुसार बांधकामाकरीता पंजीबध्द कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी द्वी-प्रतीत सिलबंद निविदा ग्रामपंचायत साटोडा येथे दिनांक ०६.११.२०२६ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सायं.५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. कोरी निविदा फॉर्मची किंमत ५००/- प्रसिध्दी दिनांकापासून कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

अ.क्र.	कामाचे नांव	योजनेचे नांव	तांत्रिक मान्यता क्रमांक	प्राकलन किंमत	कामाचा अवधी	अनामत रक्कम	निविदा सादर करण्याचा दिनांक	निविदा उघडणे
१.	विहीरीवर लोखंडी जाळी बसविणे		सामान्य निधी 26-27	110/D.E./	३,९७,०००	३ महिने	७९५०/-	
२.	मौजा आलोडी श्री.व्यवहारे ते भारतकर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे	सामान्य निधी	522/D.E./ 26-27	४,००,०००	३ महिने	८०००/-		
३.	मौजा आलोडी. श्री.साखरे ते वासेकर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे	सामान्य निधी	521/D.E. 26-27	५,००,०००	३ महिने	१००००	३०.१०.२०२६	शक्य असल्यास दिनांक ०७.११.२०२६
४.	मौजा आलोडी श्री.लोडेकर ते आगलावे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे	सामान्य निधी	524/D.E. 26-27	२,००,०००	३ महिने	४०००/-	ते ०६.११.२०२६	
५.	मौजा आलोडी श्री.आशिष साळवे ते यादव यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे.	सामान्य निधी	523/D.E. 26-27	३,००,०००	३ महिने	६०००/-		
६.	आवश्यक त्याठिकाणी सीसीटीव्ही बसविणे		सामान्य निधी	--- रक्कम ४,००,०००	अंदाजित	३ महिने	८०००/-	

वरील मंजूरकामाचे पेपर निविदेच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.

स्वा/-
प्रशासक
ग्रामपंचायत साटोडा

स्वा/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत साटोडा

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

भविष्यातील अनिश्चितता

जागतिक हवामान संघटनेच्या आकलनानुसार 'अल-निनो' फेब्रुवारी २०२७ पर्यंत टिकून राहण्याची शक्यताजवळपास शंभर टक्के आहे. प्रशांत महासागराच्या काही भागातील तापमान सामान्यापेक्षा २.६ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले आहे. 'निनो' ३.४ निर्देशांकानुसार मे ते जुलै २०२६ या काळात समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यापेक्षा सरासरी १.५ अंशांनी अधिक होते. जुलैअखेर ते ऑगस्टच्या मध्यापर्यंत हे तापमान सामान्यापेक्षा २.२ ते २.६ अंशांनी अधिक राहिले. समुद्राच्या काही अंतर्गत भागांमध्ये तापमान सामान्यापेक्षा आठ अंशांहून अधिक वाढल्याचेही निरीक्षण नोंदवले गेले आहे. ही आकडेवारी केवळ हवामानशास्त्रीय नोंद नाही. तिच्यामागे भविष्यातील अनिश्चिततेची मोठी सावली आहे. समुद्र तापतो तेव्हा संकट किनाऱ्यावरच थांबत नाहीं. समुद्र आणि वातावरण यांचे नाते अत्यंत गुंतागुंतीचे आहे. समुद्राच्या तापमानातील मोठे बदल जगभरातील वाऱ्यांची दिशा, पर्जन्यमान आणि तापमानाचे स्वरूप प्रभावित करू शकतात. त्यामुळे प्रशांत महासागरातील असामान्य उष्णता भारतातील शेतकऱ्याच्या शेतापर्यंत आणि शहरातील नागरिकाच्या घरापर्यंत पोहोचू शकते. याच कारणामुळे 'अल-निनो'च्या शक्य परिणामांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. कुठे अत्तिवृष्टी आणि पूर, तर कुठे पावसाची कमतरता आणि दुष्काळ; काही भागांमध्ये विक्रमी उष्णता, तर काही ठिकाणी पावसाच्या पद्धतीत मोठे बदल अशी परस्परविरोधी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अल-निनो आला की पाऊस कमी एवढे साधे समीकरण आता पुरेसे नाही. हवामान व्यवस्था अधिक गुंतागुंतीची होत चालली आहे. एका प्रदेशात दुष्काळ असताना दुसऱ्या प्रदेशात अतिवृष्टी होऊ शकते. त्यामुळे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील नियोजनही या बदलत्या वास्तवाशी सुसंगत असले पाहिजे. भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी मान्सूनचे महत्त्व आजही प्रचंड आहे. सिंचनाची साधने वाढली असली, तरी शेती अजूनही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सूनच्या स्वरूपातील कोणताही मोठा बदल थेट शेतकऱ्याच्या उत्पन्नावर परिणाम करू शकतो. भारतातील मान्सूनवर अल-निनोचा परिणाम होतो, हे दीर्घकाळच्या हवामान नोंदी आणि अभ्यासांमधून दिसून आले आहे; मात्र हा परिणाम देशभर एकसारखा होत नाही. उत्तर भारतात परिणाम तुलनेने अधिक दिसून येऊ शकतो, तर मध्य भारतात त्याचे स्वरूप वेगळे असू शकते. दक्षिण भारतातही परिणामाचे प्रमाण आणि स्वरूप वेगळे राहू शकते. त्यामुळे संपूर्ण भारतासाठी एकच हवामान अंदाज किंवा एकच धोरण आखणे पुरेसे ठरणार नाही. विशेषतः महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान आणि भौगोलिकदृष्ट्या विविध राज्यासाठी जिल्हानिहाय हवामान नियोजनाची गरज अधिक आहे. एखाद्या जिल्ह्यात पावसाचे दिवस कमी होऊन अल्पावधीत मुसळधार पाऊस पडत असेल, तर पारंपरिक पेरणी, पीकनियोजन आणि जलव्यवस्थापनाच्या पद्धती बदलाव्या लागतील. हवामानबदलाच्या युगातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे विरोधाभासी हवामान घटना. आता पाऊस कमी पडणे हीच समस्या राहिलेली नाही. कमी दिवसांमध्ये प्रचंड पाऊस पडणे हीदेखील तितकीच गंभीर समस्या आहे. उपलब्ध अभ्यासानुसार 'अल-निनो' च्या काळात काही दमट भागात अतिवृष्टीची शक्यता वाढू शकते, तर आधीच कोरड्या असलेल्या प्रदेशांमध्ये पावसाचे प्रमाण किंवा मुसळधार पावसाच्या घटनांमध्ये घट होऊ शकते. मध्य आणि दक्षिण-पश्चिम 'भारतासारख्या भागांमध्ये पाऊस कमी दिवसांमध्ये; पण अधिक तीव्रतेने पडण्याची शक्यता वेगळीच चिंता निर्माण करते. याचा अर्थ धरणे, जलाशय आणि नदी व्यवस्थापनाचे धोरणही बदलावे लागेल, अतिवृष्टीच्या वेळी पाणी साठवण्याची क्षमता आणि दुष्काळाच्या काळात ते उपलब्ध करून देण्याची व्यवस्था यात संतुलन साधावे लागेल. शहरांमध्ये पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी असलेली यंत्रणा सक्षम करावी लागेल, अन्यथा, एकाच वर्षी एका भागात पाणीटंचाई आणि दुसऱ्या भागात पूर अशी विचित्र परिस्थिती दिसू शकते. हवामानसंकटाच्या काळात शेतकऱ्याला नुकसानभरपाई देणे ही। सरकारची जबाबदारी आहे; परंतु त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे। नुकसान होऊ नये यासाठी आधीच माहिती उपलब्ध करून देणे. हवामान अंदाज हा केवळ मोबाइलवरील सूचना किंवा वृत्तवाहिनीवरील बातमी राहता कामा नये. तो शेतकऱ्याच्या निर्णयप्रक्रियेचा भाग झाला पाहिजे. 'अल-निनो मुळे पावसाच्या स्वरूपात बदल झाल्याचा परिणाम शेतीपुरता मर्यादित राहणार नाही. धान्य, डाळी, भाजीपाला, फळे यांचे उत्पादन घटले किंवा अस्थिर झाले, तर अन्नधान्याच्या किमती वाढू शकतात. आधीच महागाईचा सामना करणाच्या सामान्य नागरिकावर त्याचा अतिरिक्त भार पडू शकतो. पाणीटंचाई वाढल्यास ग्रामीण भागातील संघर्ष, शहरांकडे होणारे स्थलांतर आणि औद्योगिक क्षेत्राच्या पाणीवापराबाबतचे प्रश्नही तीव्र होऊ शकतात. त्यामुळे जलसंधारण, पाण्याचा पुनर्वापर, भूजल पुनर्भरण आणि पीकपद्धतीत बदल यांना आता पर्याय उरलेला नाही. असामान्य उष्णता ही आरोग्यासाठीही मोठी जोखीम आहे. त्यातून उष्माघात, निर्जलीकरण, हृदयविकार आणि उष्णतेशी संबंधित इतर समस्या वाढू शकतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, बाहेर काम करणारे कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग अधिक। असुरक्षित ठरतो. त्यामुळे हवामान अंदाजासोबत आरोग्य विभागाची कृती योजना तयार असणे आवश्यक आहे. येथे लक्षात घ्यायला हवे, की पूर्वसूचना मिळूनही पूर आला आणि जीवितहानी झाली, तर प्रश्न केवळ हवामानाचा राहत नाही, तर आपत्ती व्यवस्थापनाचा बनतो. दुष्काळाचा अंदाज असूनही पाणी नियोजन झाले नाही, तर ती केवळ निसर्गाची चूक राहत नाही; ती प्रशासनाचीही जबाबदारी ठरते. या पार्श्वभूमीवर सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'अर्ली वॉर्निंग'ला अर्ली ॲक्शन मध्ये रूपांतरित करणे. हवामान खात्याने इशारा दिला, सरकारने प्रसिद्धीपत्रक काढले आणि नागरिकांनी बातमी पाहिली ग्रामपंचायतीपर्यंत आणि ग्रामपंचायतीतून शेतकरी इतके पुरेसे नाही. हवामान अंदाज जिल्हा प्रशासनापर्यंत, तेथून व नागरिकांपर्यंत पोहोचला पाहिजे. पूरप्रवण भागात स्थलांतराची यंत्रणा, दुष्काळग्रस्त भागात पाण्याचे नियोजन, शेतकऱ्यांसाठी पीक सल्ला आणि आरोग्य विभागाची तयारी आधीच सुरू झाली पाहिजे.

चीनची निर्यातमुसंडी

चीनप्रमाणे उत्पादन क्षेत्रात भारताची ताकद नाही. या क्षेत्रात काही आग्नेय आशियाई व युरोपीय देशही भरघोस निर्यात करत आहेत. निर्यातप्रधान वस्तूंच्या क्षेत्रात चिनी मालाची टक्कर घेण्यात भारत कमी पडत आहे. त्यामुळे केवळ चीनला बोल लावण्यात समाधान न मानता, गुणवत्ता व किंमत याबाबतीत स्पर्धात्मकता वाढवणे हाच अंतिम उपाय आहे.

भारत आणि चीन या आशियाई देशांत सलोख्याचे संबंध असावेत, या हेतूने उभय देशांनी २९ एप्रिल १९५४ रोजी शांततामय सहजीवनासाठीचा 'पंचशील करार' केला. परंतु १९६२ मध्ये सीमावादावरून चीनने भारतावर आक्रमण करून पंचशील तत्त्वांची पायमल्ली केली. पुढे चीनचे तत्कालीन पंतप्रधान ली पेंग यांच्या निमंत्रणावरून डिसेंबर १९८८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी चीनचा दौरा केला. त्यापूर्वी १९७८ मध्ये तेव्हाचे जनता सरकारचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी चीनचा दौरा केला होता. पण त्याच वेळी चीनने व्हिएतनामविरुद्ध कारवाई सुरू केल्याने, वाजपेयींना परतावे लागले होते. राजीव यांच्या दौऱ्यानंतर लगेच उभय देशांतील संबंध सुधारण्यास वाव मिळाला.

१८व्या ब्रिक्स परिषदेसाठी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे यंदाच्या सप्टेंबरमध्येच नवी दिल्लीत आले होते. या दौऱ्यात कोणताही ऐतिहासिक व्यापारी करार झाला नाही. जिनपिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यापार तूट घटवणे, नवीकरणीय ऊर्जा व व्यावहरिक सहकार्य यावर चर्चा केली. जिनपिंग यांच्या सोबत ४०० अधिकारी व व्यावसायिकाचे शिष्टमंडळ आले होते. त्यामुळे भविष्यातील व्यावसायिक संवादाचे द्वार खुले झाले, असे मानण्यात आले. सौरऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स व पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी चीनमधून येणारी यंत्रसामग्री व घटकांवर असलेले सीमाशुल्क व इतर निर्बंध सुलभ होण्याची शक्यता अगदी गेल्याच महिन्यात वर्तवण्यात आली. परंतु आपल्या गुंतवणुकीवरील निर्बंध सैल व्हावेत असे चीनला वाटते; तर भारतीय माल चीनमध्ये धाडताना असलेली नियंत्रणे शिथिल व्हावीत, ही आपली इच्छा आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एक महत्त्वाचे विधान केले आहे. दोन्ही देशांतील राजनैतिक संबंध सुधारले असले तरी भारताची चीनबरोबरची व्यापारी तूट वाढत आहे. ती कमी होण्यासाठी चीनने भारताच्या निर्यातीवर लादलेली नियंत्रणे कमी केली पाहिजेत. भारतीय वस्तूंनी चीनच्या बाजारपेठेत अधिक शिरकाव करू नये, म्हणून चीनने बिगरशुल्क अडथळे उभे केले आहेत. जेनरिक औषधे, बीफ (गोमांस),



भाज्या आणि अन्य भारतीय उत्पादनांना चीनमध्ये प्रशस्त बाजारपेठ आहे. पण त्याबाबत नियंत्रणे खूप आहेत, असे सीतारामन यांनी म्हटले आहे. चालू वर्षातच चीनमधून भारताची आयात अधिक आणि निर्यात कमी झाल्यामुळे व्यापारी तूट १०० अब्ज डॉलरवर गेली आहे. खरे तर, भारतदेखील काउंटरव्हेलिंग ड्यूटीज किंवा बिगरशुल्क निर्बंध लादून चीनला प्रत्युत्तर देऊ शकतो. पण आपण हे टाळलेले आहे. चीनमध्ये भारतास समान स्तरावर स्पर्धा करू दिली जात नसल्याची टिप्पणी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही नुकतीच केली होती.

मोदी सरकार आल्यानंतर २०१४ मध्ये भारत आणि चीन यांच्यातील व्यापार ७१ अब्ज डॉलर इतका होता. तेव्हा व्यापारी तूट होती ४८ अब्ज डॉलर. त्यावेळी भारताने चीनला सुमारे १.२ अब्ज डॉलरची निर्यात कली. त्या वर्षी आपली चीनला केली जाणारी कापसाची जावक ५६ टक्क्यांनी घटली होती. त्या वर्षात चीनकडून ६० अब्ज डॉलरचा माल व सेवा यांची आपल्याकडे आवक झाली. परिणामी ४८ अब्ज डॉलरची तफावत आयातानिर्यात व्यापारातील निर्माण झाली. मनमोहनसिंग सरकारच्या अखेरच्या वर्षापेक्षा ही तूट ३४ टक्के जास्त होती. ती कमी करण्यासाठी मोदी सरकारने चीनच्या वाणिज्य खात्याच्या सहयोगाने एक पंचवार्षिक कार्यक्रम तयार केला होता. आयात-निर्यात व्यापार एकतर्फी नसावा, तो दोन्ही देशांच्या दृष्टीने संतुलित असावा, अशा निर्धार करण्यात आला होता. परंतु चीनने गंडवागंडवी केली. उदा. भारतातील कापूस आपल्या बाजारपेठेत मर्यादित प्रमाणातच यावा, अशी धोरणे चीनने अमलात आणली.

सन २०२४-२५ मध्ये व्यापारी तूट शंभर अब्ज डॉलरच्या आसपास होती आणि जानेवारी ते सप्टेंबर २०२६ पर्यंत ती सुमारे १०६ अब्ज डॉलर इतकी आहे. २०२६ मध्ये चीनमधून आपण मोबाइलचे सुटे भाग, लिथियम आयन बॅटऱ्या, सक्रिय औषधी घटक (एपीआय), इलेक्ट्रॉनिक घटक वगैरे मिळून १२५ अब्ज डॉलरची आयात केली आहे. तर आपण कोळंबी, लोहखनिज, रसायने वगैरेंची मिळून चीनला केवळ १९ अब्ज डॉलर्सची निर्यात करू शकलो आहोत.

मुळात जगातून होणाऱ्या एकूण वस्तूनिर्यातीत चीनचा वाटा १५ टक्के (पावणेचार लाख ट्रिलियन अमेरिकी डॉलर) आहे. जागतिक बाजारात भारताची निर्यात फक्त १.८ टक्के आहे. चीनचा जीडीपी २१ ट्रिलियन अमेरिकी डॉलर, तर भारताचा ३.९ ट्रिलियन डॉलर. म्हणजे कितीही गप्पा मारल्या, तरी चीनच्या समोर भारत अद्याप खूपच अशक्त आहे! या ताकदीच्या बळावर जिनपिंग हे अमेरिकेच्या डोळ्याला डोळा भिडवू शकतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जादा आयातशुल्क लावल्यास, चीनही त्यांना जशास तसे उत्तर देतो. युआन या चलनाचा विनिमयदर चीनचा व्यापारी लाभ होईल, अशा पद्धतीने ते ठरवतात. केवळ भाषणे ठोकणे, इव्हेंट करणे याऐवजी आर्थिक व व्यापारी धोरणांवर काम करण्यावर चीन लक्ष केंद्रित करतो. आपल्याकडे मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत'ची घोषणा करून चिनी ॲप्स व उत्पादनांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले होते. प्रत्यक्षात खेळण्यांपासून ते गणेशमूर्तीपर्यंत आणि फर्निचरपासून आकाशकंदील ते टीव्हीपर्यंत चीनमधून भारतात येणाऱ्या वस्तू बाजारपेठेत वाढीव प्रमाणात दिसू लागल्या आहेत. शिवाय भारतात सुटे भाग आले, तर इथे असेंब्ली-फिनिशिंग प्रक्रियेत रोजगार तरी निर्माण होत. परंतु चीनमधून थेट तयार उत्पादनच इथे येत आहे. 'यूपीए सरकार चीनपुढे नांगी टाकत होते,' अशी एनडीए सरकारची टीका असे. परंतु जिनपिंग यांच्यासमवेत झोपाळ्यावर बसूनही आपण ना सीमा सुरक्षित करू शकलो, ना बाजारपेठ.

चीनबरोबरच्या व्यापारी वाटाघाटीत आपण कमी पडत आहोत. अमेरिकेसारखे देश आज जगात व्यापाराचा भूराजकीय अस्त्र म्हणून वाढत्या प्रमाणात वापर करत आहेत. आज भारताची केवळ चीनबरोबरच्याच नव्हे, तर यूएई, सौदी अरेबिया अशा अनेक भागीदारांबरोबरच्या व्यापारतही तूट येत आहे. जगात जे देश परकीय व्यापारात शिलकीत आहेत, ते एकतर उत्पादित अथवा कमॉडिटी व्यापारातील प्रमुख निर्यातदार आहेत. भारत हा तेल वा खनिजांसारख्या कमॉडिटीजमध्ये जगाचा प्रमुख पुरवठादार नाही. तो शुद्धिकृत पेट्रोलियम उत्पादनांबाबतच आघाडीचा निर्यातदार आहे. चीनप्रमाणे उत्पादन क्षेत्रात भारताची ताकद नाही. या क्षेत्रात काही आग्नेय आशियाई व युरोपीय देशही भरघोस निर्यात करत आहेत. निर्यातप्रधान वस्तूंच्या क्षेत्रात चिनी मालाची टक्कर घेण्यात भारत कमी पडत आहे. त्यामुळे केवळ चीनला बोल लावण्यात समाधान न मानता, गुणवत्ता व किंमत याबाबतीत स्पर्धात्मकता वाढवणे हाच अंतिम उपाय आहे. भारताचा उत्पादनक्षेत्राचा जीडीपीतील वाटा १७ टक्के आहे. तो २५ टक्क्यांपर्यंत नेण्याच्या वल्गना आपण गेली दहा वर्ष करत आहोत. चीन न बोलता जे करायचे ते करतो. आपण मात्र फक्त बोलण्यातच आघाडीवर आहोत!(साभार म.टा)

-हेमंत देसाई

महागाईच्या झळा सोसत साजरी होणारी दिवाळी!



दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, मांगल्याचा आणि प्रकाशाचा सण! वर्षभरातील कष्ट, चिंता आणि दुःख विसरून चार क्षण आनंदात घालवण्याची संधी म्हणजे दिवाळी. दिवाळीच्या आगमनाने घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. घरांची साफसफाई, रंगरंगोटी, आकाशकंदील, पणत्यांची आरास, फराळाची तयारी, नवीन कपड्यांची खरेदी आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी यामुळे वातावरण आनंदमय होते. मात्र, यंदाच्या दिवाळीवरही महागाईचे सावट असल्याने सर्वसामान्यांच्या आनंदावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे महागाईच्या झळा सोसत दिवाळी साजरी करण्याची वेळ सामान्य नागरिकांवर आली आहे.

दिवाळी आली की बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने फुलून जातात. व्यापारी आकर्षक सजावट करतात, विविध वस्तूंवर सवलती जाहीर करतात. ऑनलाइन खरेदीचे पर्यायही उपलब्ध होतात. कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मिठाई, फराळाचे साहित्य, सजावटीच्या वस्तू अशा अनेक गोष्टींची खरेदी केली जाते. मोठमोठ्या मॉलमध्ये ग्राहकांची गर्दी दिसते. मात्र, या झगमगाटाच्या पलीकडे एक वेगळे वास्तव आहे. वाढत्या महागाईमुळे अनेक कुटुंबांना दिवाळीचा खर्च भागवताना आर्थिक तारेवरची कसरत करावी लागत आहे.

साखर, तेल, तूप, डाळी, रवा, मैदा, बेसन, सुकामेवा अशा फराळासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमती वाढल्या आहेत. फळे, भाजीपाला, किराणा माल, दूध आणि मिठाई महाग झाली आहे. त्यातच नवीन कपडे, घराची सजावट, भेटवस्तू आणि इतर वस्तूंच्या खरेदीचा खर्चही वाढला आहे. घराघरांत दिवाळीचे दिवे लावण्याची इच्छा आहे; मात्र तेलाचे दर परवडत नाहीत. मुलांना नवीन कपडे घ्यावेत असे वाटते; पण हातात पुरेसे पैसे नाहीत. फराळाचे पदार्थ तयार करण्याची इच्छा असते; पण साहित्याच्या वाढलेल्या किमती पाहून गृहिणीचे आर्थिक गणित बिघडते. ही परिस्थिती केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नसून शहरी भागातील मध्यमवर्गीय कुटुंबांनाही महागाईचा मोठा फटका बसत आहे.

विशेषतः रोजंदारीवर काम करणारे मजूर, बांधकाम कामगार, अल्पभूधारक शेतकरी, छोटे व्यावसायिक, खासगी क्षेत्रातील कमी वेतन मिळवणारे कर्मचारी आणि निवृत्तीवेतनावर अवलंबून असणारे ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी दिवाळीचा खर्च पेलणे कठीण झाले आहे. महिन्याचे घरभाडे, वीजबिल, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, प्रवास आणि किराणा यांचा खर्च भागवतानाच अनेकांची दमछाक होते. अशा परिस्थितीत दिवाळीच्या अतिरिक्त खर्चाची भर पडल्याने त्यांचे आर्थिक नियोजन कोलमडते. उत्पन्न मर्यादित असताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने सामान्य माणसाने जगायचे तरी कसे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

दिवाळी हा आनंदाचा सण आहे; दिखाव्याचा किंवा अवाजवी खर्चाचा नव्हे. मात्र, समाजात वाढत चाललेली दिखाऊ वृत्ती, महागड्या वस्तूंची खरेदी, प्रतिष्ठेसाठी केली जाणारी अनावश्यक उधळपट्टी यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो. इतरांच्या घरी महागड्या वस्तू आल्या म्हणून आपणही त्या खरेदी कराव्यात, अशी मानसिकता निर्माण होणे योग्य नाही. सण साजरा करताना आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. कर्ज काढून किंवा उधार पैसे घेऊन दिवाळी साजरी करण्यापेक्षा उपलब्ध उत्पन्नात आनंदाने सण साजरा करणे केव्हाही चांगले.

दुसरीकडे, सरकारनेही वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवणे, साठेबाजी आणि कृत्रिम भाववाढ रोखणे, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देणे तसेच सामान्य नागरिकांची क्रयशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ सणासुदीच्या काळात सवलती जाहीर करून महागाईचा प्रश्न सुटणार नाही. सर्वसामान्यांच्या उत्पन्नात वाढ होईल आणि जीवनावश्यक वस्तू परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतील, असे दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज आहे.

दिवाळीच्या दिव्यांनी प्रत्येकाचे घर उजळले पाहिजे आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलला पाहिजे. मात्र, महागाईमुळे काही घरांमध्ये दिवाळीचा आनंदही चिंतेच्या सावटाखाली हरवताना दिसतो. समाजातील गरीब आणि गरजू घटकांची दिवाळीही आनंददायी व्हावी,यासाठी सक्षम नागरिकांनी मदतीचा हात पुढे करायला हवा. दिवाळीचा खरा आनंद महागड्या खरेदीत किंवा रोषणाईत नसून माणुसकी, आपुलकी, प्रेम आणि समाधानात आहे. महागाईच्या काळात काटकसरीने, नियोजनपूर्वक आणि सामाजिक भान राखून दिवाळी साजरी करणे ही काळाची गरज आहे. दिवाळीचा प्रकाश केवळ श्रीमंतांच्या घरातच नव्हे,तर समाजातील शेवटच्या घटकाच्या घरातही पोहोचला, तरच दिवाळीचा खरा अर्थ सार्थ ठरेल!

श्याम ठाणेदार

दिवाळीच्या सुट्टीत जलदेवतेचे पावित्र्य जपण्याचा संकल्प करूया !

संवाद

पूर्वी नदीचे, विहिरीचे पाणी आणून दैनंदिन कार्य करावे लागत असे. आता घरोघरी पाणी सहज उपलब्ध झाले आहे. त्यामुळे त्याची किंमत किती, याची कल्पनाही कुणाला येत नाही. विकतचे पाणी घेऊनसुद्धा त्याचा योग्य विनियोग होत आहे, असे दिसत नाही. पण यंदाच्या पावसाची स्थिती बघता दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. आपले जीवन पंचमहाभूतांनी सामावलेले आहे. त्यांच्याविषयी आपल्या कृतीतून कृतज्ञता व्यक्त होणे आवश्यक आहे.भगवान मनु यांनी जलसंवर्धनासंदर्भात महत्त्वाचे नियम सांगितले आहेत, 'पाणी हे नारायणाचे रूप असल्याने त्याला पवित्र मानावे. नदी ही केवळ जलस्रोत नसून जीवनदायिनी आहे. त्यामुळे कोणत्याही नदीत घाण किंवा कचरा टाकू नये. नदीचे पावित्र्य जपणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. नदीत कपडे धुण्याऐवजी पाणी बाजूला घेऊन कपडे धुवावेत. अंगाला तेल लावून नदीत स्नान करू नये. तसेच नदीच्या पाण्यात चूळ भरून टाकू नये. या नियमांमागे जलदेवतेविषयी आदरभाव जपण्याची शिकवण आहे.'परंतु सध्याचे चित्र वेगळे आहे. जवळजवळ सगळ्याच नद्यांमध्ये कारखान्यांचे केमिकल मिश्रित पाणी, सांडपाणी मोठ्या प्रमाणात सोडले जाते. पर्यटनाच्या नावाखाली नदीत मोठ्या प्रमाणात कचरा गोळा होत आहे. पाण्याचा अपव्यय आणि जलस्रोतांची अस्वच्छता यांमुळे माणसांसह पशू-पक्ष्यांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत जलसंवर्धन ही केवळ आवश्यकता नसून काळाची हाक आहे.

प्रांजली ब्रम्हे
नागपूर

राज्य सरकार आर्थिक कर्जाच्या कात्रीत

राज्यातील दुष्काळाची व्याप्ती चिंताजनक आहे. अलीकडेच महाराष्ट्रातील ३५८ पैकी २६५ हून अधिक तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. खरीप हंगामाला मोठा फटका बसलेला असतानाच रब्बी हंगामावरही दुष्काळाचे सावट पसरले आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारने खर्चाच्या प्राधान्यक्रमाची कठोरपणे पुनर्रचना करणे गरजेचे आहे. दुष्काळ निवारणासाठी कर्ज घ्यावे लागले तर ते अपरिहार्य ठरू शकते. मात्र, अनावश्यक खर्चावर राज्य सरकारला तातडीने नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे. संकटाच्या काळात राज्य सरकारच्या प्रत्येक रुपयाला प्राधान्यक्रमाचा निकष असायला पाहिजे. दुष्काळ ही केवळ मदत वाटपाची परीक्षा नाही तर ती राज्य सरकारच्या आर्थिक शिस्तीचीही मोठी कसोटी आहे. राजकीय सोयीपेक्षा शेतकरी, पाणी आणि रोजगाराला अधिक प्राधान्य देणे हीच खरी कसोटी ठरणार आहे. लोकप्रियतेसाठी घेण्यात आलेला राजकीय निर्णय राज्याला कर्जाच्या खाईत लोटणारा ठरू नये, इतकी काळजी घेण्याची आज गरज आहे. केवळ जनतेला लग्न समारंभ आणि इतर कार्यक्रमात आर्थिक उधळपट्टी न करण्याचे आवाहन करून चालणार नाही. तर मंत्रिमंडळातील तसेच प्रशासनातील प्रत्येकालाच काटकसरीची सवय लावण्याची आता वेळ आली आहे. राजकीय सत्तेसाठी तसेच लोकांना आकर्षित करण्यासाठी मोठ्या घोषणा करणे वेगळे आणि राज्याचा आर्थिक डोलारा सांभाळणे पूर्णतः वेगळे आहे.

प्रा. मधुकर चुटे
नागपूर

सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

ऐन दिवाळीत स्वस्त धान्य दुकानातील आनंदाचा शिधा झाला गायब..!

दुष्काळात विधवा व शेतमजुरांवर आर्थिक संकट.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. १ : गेल्या तीन-चार वर्षांपासून अन्नपुरवठा विभाग मंत्रालयाकडून रोजमजूर, विधवा, अंतोदय व प्राधान्य कुटुंबातील नागरिकांना धान्य मिळत होते. परंतु दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतांना यंदा राज्य सरकारकडून गरीब कुटुंबांना दिल्या जाणाऱ्या आनंदाचा शिधा' अर्थात दिवाळी किराणा किटबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नसल्याने पुसद तालुक्यातील रेशन कार्डधारकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. यामध्ये प्राधान्य योजनेचे व अंत्योदय योजनेचे कार्डधारक आहेत.



अशा हजारो गरीब कुटुंबांना यावर्षी दिवाळीत आनंदाचा शिधा मिळणार की नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. माहे ऑक्टोबर २०२२ रोजी तत्कालीन सरकारने दिवाळीनिमित्त आनंदाचा शिधा' योजना सुरू केली होती. या योजनेत अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थींना साखर, खाद्यतेल, रवा, चणाडाळ, मैदा आणि पोहे अशा सहा वस्तूंची किट दिली जात होती. यापूर्वी केशरी रेशन कार्डधारक शेतकरी कुटुंबांनाही याचा लाभ मिळाला होता. मात्र यंदा एवढा मोठा दुष्काळ पडला असूनही या किटचे वाटप होणार नसल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे, पुरवठा विभागाकडून या बाबत अधिकृत निर्णयाबाबत अद्याप स्पष्टता नाही. दरम्यान, तालुक्यातील सर्व पात्र रेशन कार्डधारकांसाठी नियमित धान्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मात्र नियमित धान्य मिळणे आणि दिवाळीचा आनंदाचा शिधा मिळणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीचा, उत्पादन खर्चाचा आणि शेतमालाला अपेक्षित भाव न मिळण्याचा फटका बसत आहे. शेतमजुरांना नियमित रोजगार मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. वाढत्या महागाईमुळे साखर, तेल, डाळी आणि किराणा साहित्य खरेदी करणेही कठीण झाले आहे. आता संकटाच्या काळात दिवाळीनिमित्त अशाच प्रकारची मदत मिळणार का, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शासनाने आनंदाचा शिधा किंवा पर्यायी मदत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा शेतकरी, शेतमजूर आणि विधवा,गरीब कुटुंबांकडून व्यक्त केली जात आहे. नुकतेच पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील निवडणूक पार पडली असून या निवडणुकीमध्ये उभे असलेले सर्व पक्षांच्या उमेदवारांनी मतदार पुरुष शिक्षक व महिला शिक्षकांना पैठणी साडी तसेच पाच हजार व तीन हजाराचे पाकीट वाटप करण्यात आल्याचे पुसद तालुक्यात सर्वत्र चर्चा ऐकायला मिळत आहे, मात्र दुष्काळ असलेल्या परिस्थितीत दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी पैसा उरत नाही.परंतु आनंदाचा शिधा मिळाला असता तर या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असता. शासनाने रोज मजुरी करणारे व विधवा महिला तसेच शेतकऱ्यांच्या परिस्थिती व अडचणीकडे लक्ष देऊन त्यांना अशा परिस्थितीत जगण्यासाठी धीर देणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे.

मुडाना येथे आरोग्य शिबीर संपन्न, फिरते इंडॉस्कॉपी कॅम्प यशस्वी



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. १ : तालुक्यातील मुडाना येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड येथील सुप्रसिद्ध पोट विकार तज्ञ डॉ. नितीन जोशी यांचे गॅलेक्सी हेल्थकेअर फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित फिरते इंडॉस्कॉपी चा कॅम्प निजधाम आश्रम मुडाना येथे यशस्वीरित्या पार पडले असून या कॅम्पचा बहुतांश रुग्णांनी लाभ घेतला आहे. यामध्ये जवळपास २२ रुग्णांची इंडॉस्कॉपी करण्यात आलेली आहे.

हा कॅम्प यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता मुडाणा येथील डॉ. सचिन पाटील, डॉ. सुरज वानखेडे, महागाव येथील समाजसेवक संजय शेषराव नरवाडे (सेवानिवृत्त नायब तहसीलदार), जयश्री संजय नरवाडे नगरसेविका नगरपंचायत महागाव यांचे सहकार्य आणि मोलाचे योगदान लाभले असून प्रथमच मुडाण्यासारख्या छोट्याशा गावामध्ये फिरते इंडॉस्कॉपी कॅम्प यशस्वीरीत्या संपन्न झाले आहे.

थोडक्यात



मुकुटबनमध्ये गोठ्यात अजगर नागरिकांमध्ये खळबळ!

सर्पमित्र व वनविभागाची तत्काळ धाव

मुकुटबन : झरी-जामणी तालुक्यातील मुकुटबन येथे किशोर गोल्लावार यांच्या गोठ्यात भला मोठा अजगर आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. गोठ्यात अचानक अजगर दिसल्याने नागरिकांमध्ये भीती आणि उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच सर्पमित्रांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कार्तिक गोल्लावार, जगदीश कुडलवार, कार्तिक नाईनवार, तुषार ध्यागलवार, सोहेल सय्यद आणि संकेत परचाके यांनी परिस्थिती हाताळण्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील राठोड, वनपाल मोहन टोंगे तसेच वनकर्मचारी संदीप धानोरेकर व सुनील पवार उपस्थित होते. वाढत्या मानवी वस्तीमुळे वन्यजीवांचा मानवी वस्त्यांमधील वावर हा चिंतेचा विषय ठरत आहे. अशा घटनांमध्ये नागरिकांनी घाबरून जाऊन अजगराला मारण्याचा किंवा स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. वन्यजीवांचे संरक्षण करतानाच मानवी सुरक्षिततेलाही प्राधान्य देणे आवश्यक आहे. सर्प अथवा वन्यजीव आढळल्यास तातडीने वनविभाग किंवा प्रशिक्षित सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.



पांढरकवडा आगाराला पाच नवीन एसटी बसेसची भेट..!

आमदार राजू तोडसाम यांच्या हस्ते लोकार्पण.

पांढरकवडा : पांढरकवडा आगाराच्या सेवेत पाच नवीन एसटी बसेस दाखल झाल्या असून, रविवार, १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता या बसेसचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. आमदार प्रा.राजू तोडसाम यांच्या हस्ते नवीन बसेसचे लोकार्पण करण्यात आले. यामुळे पांढरकवडा आगाराच्या परिवहन सेवेला नवी चालना मिळणार आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला नगराध्यक्ष आतिशजी बोरेले, भाजप जिल्हा सरचिटणीस मोहन कनाके, जिल्हा सचिव किशोर देशट्टीवार, शहराध्यक्ष बंटी जुवारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नगरसेवक मंगेश वातीले, सूरज जाधव, रुपेश कटलावार, आगार प्रमुख आशिष काकडे, ज्येष्ठ पत्रकार दामोदर बाजोरिया, नारायण भानारकर, काशिनाथ मिलमिले, सय्यद जावेद यांच्यासह नगरसेवक, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाच नवीन बसेस दाखल झाल्यामुळे प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रवाशांना अधिक चांगली, सोयीस्कर आणि नियमित परिवहन सेवा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

शेख जमाल यांची महागाव तालुका काँग्रेस उपाध्यक्षपदी नियुक्ती!



फुलसावंगी : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाशी तब्बल ३० वर्षांपासून एकनिष्ठ राहून कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता पक्ष संघटनेच्या बळकटीसाठी सातत्याने कार्य करणारे फुलसावंगी येथील शेख जमाल यांची महागाव तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तालुका काँग्रेस अध्यक्ष सुनील राठोड यांनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली आहे. शेख जमाल यांनी गेल्या तीन दशकांपासून काँग्रेस पक्षाशी आपली निष्ठा कायम ठेवत पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. पदापेक्षा पक्षकार्याला प्राधान्य देत त्यांनी संघटनात्मक कार्यात सातत्य राखले. त्यांच्या याच दीर्घकालीन योगदानाची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविल्याने फुलसावंगी परिसरातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

धोऱ्यातील येथील १५ मतदारांची नावे चंद्रपूरसह राळेगाव मतदार यादीत!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. १ : , दि. १ : मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर (SIR) प्रक्रियेत गंभीर त्रुटी समोर आल्याचा दावा राळेगाव विधानसभा मतदारसंघातील धोत्रा ग्रामपंचायतीच्या प्रकरणातून करण्यात आला आहे. गेल्या जवळपास ३० वर्षांपासून चंद्रपूर येथे स्थायिक असलेल्या १५ व्यक्तींची नावे चंद्रपूर मतदारसंघासह यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव मतदारसंघातील धोत्रा गावाच्या मतदार यादीतही कायम असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे एकाच व्यक्तीला दोन मतदारसंघांत मतदानाचा अधिकार मिळण्याची शक्यता निर्माण झाल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. या प्रकरणी संविधान जागरच्या वतीने आक्षेप नोंदविण्यात आले असून, तहसीलदार कार्यालयातील मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी ८ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधितांना नोटीस बजावली होती. १६ ऑक्टोबर रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. सादर करण्यात आलेल्या आक्षेपांच्या यादीत दुबार नोंदी, चुकीचे मॅपिंग आणि अनिर्णित त्रुटींचाही उल्लेख आहे. दरम्यान, स्थानिक विश्रामभवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ॲड. सीमा तेलंग यांनी एसआयआर प्रक्रियेतील त्रुटींवर बोट ठेवले. ही प्रक्रिया अत्यंत किचकट असून, मतदारांपासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत अनेकांना पुरेशी स्पष्टता नसल्याचा आरोप त्यांनी केला. सहा व सात क्रमांकाच्या अर्जांबाबतही व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामपंचायत सरपंचांनी जिल्हाधिकारी, निवडणूक विभाग आणि तहसील कार्यालयाकडे यापूर्वीच तक्रारी केल्या; मात्र अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा आरोप सुधाकर साळुंखे यांनी केला. संबंधित प्रकरणात कारवाई न करण्याबाबत राजकीय दबाव असल्याचा दावाही त्यांनी केला. एकाच व्यक्तीची दोन ठिकाणी नोंद असल्यास वस्तुनिष्ठ चौकशी करून एका ठिकाणची नोंद रद्द करावी, चुकीची माहिती देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि संपूर्ण मतदार यादीची तपासणी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पत्रकार परिषदेला प्रा.घनश्याम दरणे, सुधाकर साळुंखे, संजय लोहकरे, नारायण थूल, गोविंद चव्हाण, शोभाताई पारधे, हर्षद ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मतदार यादीतील दुबार नोंदींची जबाबदारी नेमकी कोणाची? प्रशासनाने या आक्षेपांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे आता आवश्यक ठरले आहे.

तेली फैलमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

तिघांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

वणी, दि. १ : शहरातील तेली फैल परिसरात ५२ पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळणाऱ्या तिघांवर वणी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत तिघांना रंगेहात पकडण्यात आले असून, त्यांच्याकडून रोख रकमेसह ५२ पत्त्यांची कॅट असा एकूण ६ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ ऑक्टोबर रोजी पहाटे ऑल आऊट मोहिमेअंतर्गत समन्स वॉरंट तामिलीचे काम सुरू असताना पोलीस कर्मचारी हरिभाऊ दळवे यांना तेली फैल परिसरात काही जण पैशांची बाजी लावून जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.त्यांनी याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतर पोलीस पथकाने पंचांसह घटनास्थळी धाड टाकली. यावेळी वैभव यशवंत निमकर (वय २८, रा.तेली फैल), संदीप अशोक मते (वय ४३, रा. गुरुनगर) आणि अतिक खान अमीर खान पठाण (वय ३२, रा. तेली फैल) हे तिघे ५२ पत्त्यांवर हार-जीतचा जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी केलेल्या अंगझडतीत वैभव निमकर याच्याकडून १ हजार १५० रुपये, संदीप मते याच्याकडून २ हजार १२० रुपये,तर अतिक खान याच्याकडून १ हजार ६२० रुपये मिळाले. याशिवाय जुगाराच्या डावावर लावलेले १ हजार ८०० रुपये आणि ५२ पत्त्यांची कॅट असा एकूण ६ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात आली आहे.ही कारवाई वणी पोलिसांनी केली.

निवृत्ती वेतनधारकाची धावपळ थांबणार

पुसद, दि. १ : निवृत्तीवेतन सुरू ठेवण्यासाठी दरवर्षी हयात प्रमाणपत्र सादर करण्याच्या प्रक्रियेत अनेक ज्येष्ठ नागरिकांना बँका आणि शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. ही धावपळ कमी करून प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया डिजिटल आणि सुलभ करण्यासाठी पुसद येथे विशेष मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान टप्पा-५ अंतर्गत उपकोषागार कार्यालय, पुसद यांच्या वतीने मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सभागृहात हा मेळावा होणार आहे.

हॉटेल पी.आर. ०७'मध्ये देहविक्रीचा अड्डा

एएचटीयूच्या छाप्यात काळ्या धंद्यांचे बिंग फुटले!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. १ : महागाव ते आर्णी मार्गावरील अंबोडा येथील 'हॉटेल पी.आर. ०७ रेस्टॉरंट अँड लॉजिंग'मध्ये राजरोसपणे सुरू असलेल्या देहविक्रीच्या अड्ड्यावर यवतमाळ येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने धडक कारवाई केली आहे. ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी टाकलेल्या या छाप्यात या काळ्या धंद्यांचे बिंग फुटले असून, अक्षय रणमले, नारायण भीमराव पुंडे (रा. वेणी, ता. महागाव) आणि संतोष विश्वनाथ सरकुंडे (रा. कोरटा, ता. उमरखेड) या तिघांवर महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हॉटेलच्या नावाखाली या लॉजमध्ये पैशांचे आमिष दाखवून महिलांकडून देहविक्रीचा व्यवसाय करवून घेतला जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची शहानिशा करण्यासाठी पथकाने एक बनावट ग्राहक लॉजवर पाठवून सापळा रचला. ग्राहकाने आत प्रवेश करून ठरल्याप्रमाणे इशारा करताच, दबा धरून बसलेल्या पोलिसांनी थेट लॉजवर धाड टाकली. यावेळी लॉजवर नारायण पुंडे आणि संतोष सरकुंडे हे संशयित मिळून आले, तर एका खोलीत डमी ग्राहकासोबत ३७ वर्षीय पीडित महिला आढळून आली. या अड्ड्यावर ग्राहकांकडून १,५०० रुपये उकळून त्यातील केवळ ५०० रुपये पीडित महिलेच्या हातावर टेकवले जात असल्याची धक्कादायक माहिती चौकशीतून समोर आली आहे. पोलिसांनी लॉजची कसून झडती घेतली असता संशयितांकडून रोख रक्कम, डमी ग्राहकाने दिलेल्या नोटा, मोबाईल आणि आक्षेपार्ह साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी एएचटीयूच्या महिला पोलीस कर्मचारी आरती मिश्रा यांच्या फिर्यादीवरून महागाव पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा व भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेडकॉन्स्टेबल केशव चव्हाण करत असून, पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे महागाव परिसरातील अवैध व्यावसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

विलासराव गावंडे यांची महागाव तालुका काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीसपदी नियुक्ती !

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. १ : महागाव: काँग्रेस पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार महागाव तालुका काँग्रेस कमेटीच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये महागाव येथील निष्ठावंत कार्यकर्ते विलासराव बापुराव गावंडे यांची तालुका सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विलासराव बापुराव गावंडे हे मागील ३० वर्षांपासून काँग्रेस पक्षात सामान्य कार्यकर्ता म्हणून निष्ठेने कार्यरत आहेत. पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी संघटनात्मक कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर तालुका सरचिटणीस पदाची महत्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक, महागाव तालुकाध्यक्ष सुनील राठोड, शहर अध्यक्ष शैलेष कोपरकर, इम्रान पठाण, जावेद चव्हाण तसेच महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष जयश्री नरवाडे यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात आले. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ पक्षासाठी इमानदारीने कार्य करणारे हाडामासाचे कार्यकर्ते विलासराव गावंडे यांची तालुका सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्याने पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटनेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

काँग्रेस तर्फे 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियान!

महागाव तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या आढावा बैठकीत निर्णय

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. १ : लोकशाहीच्या रक्षणासाठी, सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी तसेच शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी महागाव तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण तालुक्यात 'वोट बचाओ, देश बचाओ' हे अभियान राबविण्यात येणार आहे. दिनांक १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत तालुक्यातील प्रत्येक गावात पदयात्रेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

या बैठकीत अभियानाची रूपरेषा, गावनिहाय नियोजन, पदयात्रेचे आयोजन तसेच नागरिकांशी थेट संवाद साधण्याबाबत चर्चा करण्यात आली. लोकशाही मूल्यांचे जतन करणे, जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविणे आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणे, या उद्देशाने हे अभियान तालुक्यातील गावागावांत पोहोचविण्याचा निर्धार करण्यात आला. या बैठकीला महागाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील राठोड, दत्तराव पवार,संदीप कदम, शेख जमाल, शेख बादशाह, विलास गावंडे, सुनील भरवाडे, शरद चव्हाण, जेवन विकास जाधव, गजानन तायडे, सुनील भुवानकर, कुंडलीक भुरके, पवन मोरे, नितीन पाचकोरे, केदार पानपट्टे,मनोज गावंडे, व महागाव शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शैलेश कोपरकर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

रस्ता अर्धवट,बिल मात्र पूर्ण,प्रभाग १५ मध्ये निधीच्या वापरावर प्रश्नचिन्ह!

ठेकेदार व नगर अभियंत्याच्या भूमिकेवर नागरिकांचा संशय..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. १ : पुसद नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक १५ मध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम अर्धवट असतानाही पूर्ण कामाचे देयक काढण्यात आल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित ठेकेदार आणि नगर अभियंत्याच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

जुन्या प्रभाग क्रमांक १४ व नवीन प्रभाग १५ मध्ये रेवण जागृत सर यांच्या घरापासून राजेश्वर बोरळ यांच्या घरापर्यंत नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेंतर्गत ७ लाख ४२ हजार २२५ रुपयांचे रस्त्याचे काम मंजूर करण्यात आले. ६ मे २०२६ रोजी मान्यता मिळाल्यानंतर १४ मे रोजी ठेकेदार विशाल बालाजी इन्नाणी यांना कार्यादेश देण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात रस्ता अर्धवट असूनही काम पूर्ण झाल्याचे दाखवून बिल काढल्याचा नागरिकांचा आरोप आहे. कामाची देखरेख करण्याची जबाबदारी असलेल्या नगर अभियंता शुभम आचमारे यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. कामाचे मोजमाप, मोजमाप पुस्तिका (एमबी), गुणवत्ता तपासणी अहवाल आणि देयकांची पडताळणी मुख्याधिकाऱ्यांनी करावी. प्रत्यक्ष काम आणि मंजूर अंदाजपत्रकातील तफावत आढळल्यास नियमानुसार वसुली व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. कागदोपत्री विकास दाखवून सार्वजनिक निधी खर्च झाल्याचा नागरिकांचा आरोप असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

१,६६९ जि. प.शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी १ कोटी ८२ लाख रुपयांचा निधी मंजूर

अमरावती/का.प्र.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी, 'समग्र शिक्षा' आणि राज्य गणवेश योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बूट आणि मोजे मिळतील. शिक्षण अधिकारी सिद्धेश्वर कळुसे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १,६६९ जिल्हा परिषद शाळांमधील १,०७,४३१ विद्यार्थ्यांसाठी १ कोटी ८२ लाख ६३ हजार २७० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद प्राथमिक शाळेच्या निर्देशानुसार, या योजनेचा लाभ एचपीएम श्रीक आणि राज्य प्राणवेश योजनेअंतर्गत उपलब्ध आहे.विद्यार्थ्यांना ते मिळेल. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १२० रुपयांचे बजेट तयार करण्यात आले आहे.निधीचे वाटप केवळ योग्य पद्धतीनेच केले जावे - प्रणालीद्वारे शाळेच्या खात्यात निधी हस्तांतरित केला जावा. मिळालेल्या निधीचा वापर केवळ बूट आणि मोजे खरेदी करण्यासाठीच केला जावा. निधीचा इतर कोणत्याही कारणासाठी वापर केल्यास कारवाई केली जाईल. प्रशासनानेही हा इशारा दिला आहे.पात्र विद्यार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवू नये. एकाही पात्र विद्यार्थ्याला या लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही. मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुखांनी या बाबतीत काळजी घ्यावी. खरेदीनंतर, शिक्षक संघटना आणि पोटको ज्यूट-सॉक्स यांनी मूळ बिल आणि स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवून वापराचे प्रमाणपत्र तात्काळ सादर करावे, अशी मागणी शिक्षण विभागाकडे केली आहे. ही मागणी विद्यार्थी आणि शिक्षण संचालकांना विनंती करून करण्यात आली.

तहसील स्तरावरील पात्र विद्यार्थ्यांची संख्या

तहसील	शाळा	लाभार्थी क्रमांक
अचलपूर	१५६	११८५६
अमरावती	१०८	६८२५
अंजनगाव	९८	५८८२
भातकुली	१०९	४६६४
चांदूर बाजार	१२७	८२६३
चिखलदरा	१६६	९५२९
चांदूर रेल्वे	७४	४९७३
दर्यापूर	१४२	६१३५
धारणी	१६९	१८९०८
धामणगांव	९०	४२२०
मोर्शी	११२	८५०९
नांदगांव खंडे.	१२४	५६२४
तिवसा	७६	४५१८


संक्षिप्त

राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवात योग-प्राणायामाचा जागर



तिवसा-राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त योग प्रशिक्षक तथा प्राकृतिक चिकित्सक डॉ. मनीषा संदीप अमृतकर यांच्या योग व प्राणायाम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी त्यांनी विविध योगासने व प्राणायामांची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांना निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना निरोगी, सुदृढ आणि सुसंस्कृत समाज अपेक्षित होता. निरोगी समाजाची निर्मिती निरोगी व्यक्तीपासून होते. त्यामुळे प्रत्येकाने दररोज किमान एक तास स्वतःच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी द्यावा, असे आवाहन डॉ. मनीषा अमृतकर यांनी केले.

विद्यापीठात पुण्यतिथी कार्यक्रम



अमरावती-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे प्रथम गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून, तर भारताच्या प्रथम महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी 'राष्ट्रीय संकल्प दिवस' म्हणून संपन्न झाली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी उपस्थितांना 'राष्ट्रीय एकता दिवस' व 'राष्ट्रीय संकल्प दिवसाची' प्रतिज्ञा दिली. तसेच सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सहा. कुलसचिव श्री विलास काकडे, अधीक्षक डॉ. श्रीकांत तायडे, तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. संचालन तसेच वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्याबद्दल माहिती प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.

राजर्षी शाहू महाराज वाचनालयात पुण्यतिथी साजरी



तिवसा-श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय, तिवसा येथे भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती (राष्ट्रीय एकता दिवस) आणि भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी (राष्ट्रीय संकल्प दिवस) निमित्त संयुक्तपणे फोटो पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दोन्ही थोर नेत्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या अखंडतेसाठी दिलेले योगदान आणि इंदिरा गांधी यांनी देशाच्या प्रगतीसाठी व सुरक्षेसाठी घेतलेले धाडसी निर्णय यावर प्रकाश टाकण्यात आला. देशाच्या उभारणीत या दोन्ही महान नेत्यांचे योगदान सदैव प्रेरणादायी राहील, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.या अभिवादन कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून दीपक धानोरकर, कृणाल गौरखेडे, विशाल गडलिंग आणि यश देशमुख प्रामुख्याने हजर होते. यासोबतच वाचनालयातील बहुसंख्य विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माध्यमिक विद्यालयात जयंती कार्यक्रम



अंजनगाव बारी-जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचे लोहपुरुष, देशाचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक गजेंद्र अवघड होते, तर प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर उपस्थित होत्या. प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापक गजेंद्र अवघड यांनी सरदार पटेल यांच्या कणखर नेतृत्वाचा, राष्ट्रनिष्ठेचा आणि दृढ इच्छाशक्तीचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात जोपासावा, असे आवाहन केले. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन धनंजय चांदोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन अर्चना पोकळे यांनी केले.

उपराई येथे 'मूल्यवर्धन' शिक्षण परिषद



खल्लार-नजिकच्या उपराई येथिल जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत चंडिकापूर केंद्रातर्गतची 'मूल्यवर्धन' या महत्त्वपूर्ण विषयावर आधारित शिक्षण परिषद उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात आणि नैतिक मूल्यांच्या रुजवणीमध्ये मूल्यवर्धन उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.या शिक्षण परिषदेस केंद्राच्या केंद्रप्रमुख शितल लहाने , ग्रामपंचायतचे प्रशासक निरज प्रभाकर नागे आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सय्यद नुसरत अली हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.मुख्याध्यापक आफाक अहमद, तसेच शाजिया अंजुम,शेख राजू यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल ग्रामपंचायत प्रशासक निरज नागे यांच्यातर्फे विशेष सत्कार करण्यात आला.परिषदेदरम्यान मूल्यवर्धन अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी कशी करावी, विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्ये, शिस्त आणि सामाजिक उत्तरदायित्व कसे रुजवावे यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले . शिक्षकांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.

सोशल क्लबच्या मैदानावर फटाका मार्केटला विरोध

मोर्शी/वार्ताहर

शहराच्या मध्यवस्तीत रेणुका नगरला लागून असलेल्या सोशल क्लबच्या मैदानावर गेल्या अनेक वर्षापासून दिवाळी या सणाच्या निमित्ताने फटाका मार्केट उभारण्यात येऊन त्या ठिकाणावरून फटाक्याचे परवानाधारक दुकानदार विविध फटाकेची विक्री करतात. वास्तविक सोशल क्लबच्या पदाधिकाऱ्यांना ही जागा हंगामी खाजगी दुकाने लावण्यास मनाई केली असून परवानगी दिल्यास उपोषणाचा इशारा दिला आहे.

सोशल क्लबला लागून रेणुकानगर मध्ये मध्यमवर्गीय व मजूरांचे घरे आहेत. अनेक मजुरांचे घरे हे कमकुवत आहे. फटाका मार्केटमध्ये एखादी दुर्घटना घडल्यास अनेक मजुरांचे घरे जळून राख रांगोळी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सोशल क्लब च्या आवारात व बाजूला असलेली दुकाने सुद्धा जळून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सोशल क्लब मैदानावर प्रशासनाने फटाका मार्केटला परवानगी देण्यात येऊ नये यासाठी रेणुका नगर परिसरात राहणाऱ्या अनेक नागरिकांनी सह्याचे निवेदन जिल्हा अधिकारी अमरावती, महसूल उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना दिले आहे. प्रशासनाच्या वतीने जर सोशल क्लबच्या मैदानावर फटाका मार्केटला परवानगी दिल्यास तहसील कार्यालयासमोर दिनांक २ नोव्हेंबर पासून उपोषणाला बसण्याचा इशारा सुद्धा रेणुका नगरवासीयांनी दिला आहे. उपविभागीय अधिकारी प्रदीप कुमार पवार यांच्याकडून सोशल क्लब मैदानाची पाहणी रेणुका नगर येथील नागरिकांनी सोशल क्लब मैदानावर फटाका मार्केटला परवानगी देण्यात येऊ नये या विषयाचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना मिळताच त्यांनी आपल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यासह महात्मा गांधी यांच्या पुतळ्याच्या परिसर तस्य सोशल क्लब मैदानाची पाहणी केली.

मुंबई-अमरावती-मुंबई विमानप्रवास महागला!

ऐन दिवाळीच्या सुट्ट्यांत प्रवाशांच्या खिशाला झळ

अमरावती/का.प्र.

दिवाळीच्या तोंडावर मुंबई-अमरावती-मुंबई या मार्गावरील विमान तिकीट दरांत वाढ झाली आहे. लक्ष्मीपूजनानंतर येणाऱ्या आणि जाणाऱ्या मार्गावरील विमान तिकीट दरांत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. अमरावती ते मुंबई रेल्वे प्रवासाला १२ तासांचा अवधी लागतो. विमानाद्वारे १ तास ४५ मिनिटांत पोहचता येते. त्यामुळे विमान सेवेला उत्तम प्रतिसाद मिळत असताना दिवाळी सणादरम्यान प्रवास महागल्याने प्रवाशांची निराशा झाली आहे.

२३०० रुपयांवरून थेट ८ हजारांवर

अमरावती ते मुंबई विमान प्रवासाचे किमान भाडे हे २३१० रूपये इतके आहे. लक्ष्मीपूजन ८ नोव्हेंबरला आहे. ९ नोव्हेंबरपासून तिकीट दरांत वाढ झाल्याचे दिसून येते. ९ तारखेला मुंबईहून अमरावतीला येण्यासाठी ८ हजार ६१० रुपये सुपर सेव्हर या श्रेणीतील तिकिटासाठी मोजावे लागत आहेत. व्हॅल्यू या श्रेणीतील भाडे १०५०० तर फ्लेक्झिबल श्रेणीचे भाडे १७८५० रुपये आहे. ११ नोव्हेंबरला देखील हेच दर



आहेत. १३ नोव्हेंबरपासून तिकिटांचे दर ४ हजार ८२ रुपयांपर्यंत खाली आले असले, तरी मागणी वाढल्यास या तिकीट दरांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

अमरावती ते मुंबई प्रवासही ८ हजारांवर

दिवाळी सुट्ट्यांनंतर परत मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांना जादा पैसे मोजावे लागत आहे. ११ नोव्हेंबरला तिकिटाचे किमान दर ८ हजार ६१० रुपये आहेत. १३ नोव्हेंबरपासून तर सुपर सेव्हर श्रेणीतील तिकीटच उपलब्ध नाही. त्यामुळे व्हॅल्यू आणि फ्लेक्झिबल श्रेणीतील तिकिटांसाठी १० हजार ५०० ते १७ हजार ८५० रुपये मोजावे लागत आहेत.

कंपन्या दर का वाढवतात?

विमान कंपन्यांच्या नियमानुसार तिकिटाचे दर मागणी व उरलेल्या जागांनुसार ठरतात. कमी भाड्याच्या श्रेणीतील जागा आधी संपतात आणि नंतर उरलेल्या जागांचे दर वाढत जातात. दिवाळीच्या काळात मागणी प्रचंड असल्याने सुपर सेव्हर श्रेणीतील तिकिटे संपली आहेत. त्यामुळे प्रवाशांना महाग तिकिटे खरेदी करावी लागत आहेत.

आठवड्यातून चार दिवस सेवा

मुंबई-अमरावती-मुंबई ही अलायन्स एअर कंपनीची विमानसेवा दर रविवार, सोमवारी, बुधवार आणि शुक्रवार असे चार दिवस आहे. अमरावती विमानतळावर 'डीव्हीओआर-डीएमई'ही अत्याधुनिक प्रणाली बसविण्यात आली आहे. याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. त्यामुळे अनेक तांत्रिक अडथळे दूर झाले आहेत. त्यामुळे अमरावती-मुंबई ही विमानसेवा दररोज सुरू करावी आणि पुणे-अमरावती-पुणे नियमित विमानसेवा सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

तपोवन परिसरात बिबट्याची दहशत

भाकप उपवनसंरक्षक यांना निवेदन

अमरावती/का.प्र.

तपोवन परिसरातील माधवी विहार,संकेत कॉलनी भागात मागिल १० ते १५ दिवसापासुन बिबट वाघाचा वावर निदर्शनास येत असुन बिबट्याने कुञ्याची शिकार केल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसले. सदर बिबट्या मागिल काही दिवसापासून सायंकाळी ६-७ वाजता वावर आहे. सदर रहिवाश्यांमध्ये या मुळे दहशतीचे वातावरण पसरले आहे. सायंकाळी लहान मुलांना खेळणे,वृध्द व महिलांना घराबाहेर पडणे धोक्याचे झाले असुन रहिवाशांनी सायंकाळचे घराचे बाहेर पडणे कमी केले आहे.

सायंकाळी लहान मुले कॉलनी मध्ये खेळत असतात तसेच वृध्द व नागरिक शतपावली करीता रपेट करण्याकरीता फेरफटका मारतात, बिबट्याचा नियमित येण्याने लहानमुले,वृध्द



व नागरिकांच्या जिवीतास हानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.सदर कॉलनी मध्ये वाहणारा नाला हा झाडा झुडपाने वेढलेला व अस्वच्छ आहे व तेथे अंधार पसरलेला असतो. रस्त्यावर पण पुरेसे व जास्त पॉवर चे स्ट्रिट लाईट नसल्यामुळे रस्त्यावर पण अंधार असतो.याबाबत ठोस उपाययोजना करुन पिंजरा लावुन बिबट्यास जेरबंद करणे करीता परिसरातील महिला व भाकप तपोवन शाखा यांनी उप वनसंरक्षक, अमरावती परिक्षेत्र वनविभाग अमरावती यांचे कार्यालयास निवेदन देण्यात आले. त्या वेळेस उपस्थित धंदर यांचे सोबत चर्चा करुन परिस्थिती बाबत अवगत केले त्यामध्ये उपाय योजना करणे बाबत चर्चा झाली.या प्रतिनीधी मंडळात कॉ अशोक सोनारकर सरचिटणीस अ.भा. किसान सभा,कॉ सुशील ढोले सचिव तपोवन विद्यापीठ शाखा,कॉ लता सोनारकर, संघटक महिला फेडरेशन, रुपाली गवई, नीता रताळे, शिल्पा खिल्लारे, सोनाली भोयर, तृप्ती नांदुरकर, अर्चना डोंगरे, माधुरी हजारे, अपर्णा सरे, उज्वला हंबड उपस्थित होते.

राष्ट्रसंतांच्या पालखी सोहळ्यात आमदार राजेश वानखडे यांचा सहभाग

अमरावती/का.प्र.

मोझरी गावाला प्रदक्षिणा घालून परतणाऱ्या पालख्यांचे आमदार राजेश वानखडे व सौ. आरती वानखडे यांच्या हस्ते स्वागत; पालखी वाहक भक्तांना दुपट्टे देऊन सन्मान वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम, मोझरी येथे आयोजित पालखी सोहळ्यात आमदार राजेश वानखडे यांनी सहभाग घेतला. यावेळी त्यांनी गुरुदेव भक्तांसमवेत पालखीचे स्वागत करून दर्शन घेतले आणि राष्ट्रसंतांच्या चरणी नतमस्तक होत श्रद्धापूर्वक अभिवादन केले.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी विविध गावांतून लाखो गुरुदेव भक्त पालख्यांसह गुरुकुंज मोझरी येथे दाखल होतात. पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने आलेल्या या पालख्यांनी मोझरी गावाला प्रदक्षिणा घातल्यानंतर आपापल्या गावांकडे प्रस्थान केले.यावेळी मोझरी गावातून प्रदक्षिणा पूर्ण करून परतणाऱ्या पालख्यांचे आमदार राजेश वानखडे व त्यांच्या पत्नी आरती वानखडे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

पालखी वाहून आणणाऱ्या पुरुष भक्तांना दुपट्टे, तर महिला भक्तांना ब्लाऊज पीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.राष्ट्रसंतांच्या विचारांप्रती असलेली श्रद्धा, भक्ती आणि पालखी वाहणाऱ्या भक्तांचा सेवाभाव यांचा गौरव यावेळी करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत भक्तिभावाने पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या गुरुदेव भक्तांप्रती आमदार वानखडे यांनी आदरभाव व्यक्त केला. या सोहळ्याच्या माध्यमातून भक्ती, श्रद्धा आणि सेवाभावाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. यावेळी मोझरी येथील नागरिक, गुरुदेव भक्त आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्या नोंदणी शिबिर

अमरावती/का.प्र.

महानगरपालिका, अमरावती व भारतीय कृत्रिम अवयव निर्माण महामंडळ , कानपूर, उत्तर प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांकरिता नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.हे शिबिर म.न.पा. उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १९, रुक्मिणी नगर, अमरावती येथे होणार आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.दिव्यांग व्यक्तींची नोंदणी करताना विविध प्रकारच्या दिव्यांगत्वानुसार तपासणी करण्यात येणार आहे. अस्थिव्यंग (किमान ४० टक्के दिव्यांगत्व प्रमाण): व्हीलचेअर, काठी, कुबडी, सी.पी. चेअर तसेच टिप-बॅटरी ऑपरेटेड तीन चाकी सायकलसाठी किमान ८० टक्के दिव्यांग प्रमाणपत्र आवश्यक राहील. (बहिरा, अंध, मूकबधिर तसेच दोन्ही हात सुस्थितीत असणे आवश्यक आहे.) अंध प्रवर्ग (१०० टक्के): प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी ब्रेल किट व अंध काठी देण्यात येणार आहे. इयत्ता १० वीपासून पुढे शिक्षण घेत असल्यास स्मार्टफोन आणि सामान्य काठी (सेन्सर अंध काठी) देण्यात येईल. शाळेत शिकत असल्याचा पुरावा म्हणून शाळेचे किंवा महाविद्यालयाचे ओळखपत्र अथवा बोनाफाईड आवश्यक आहे.

दहिगाव रेचा येथील पतसंस्थेतील ठेवीदारांच्या पैशांचा गैरव्यवहार

प्रहार जनशक्ती पक्षाचे आजपासून तीव्र आंदोलन

अंजनगाव सुजी/वार्ताहर

तालुक्यातील दहिगाव रेचा येथील वं. नित्यानंद बिगर शेती सहकारी पतसंस्थेमध्ये नागरिकांनी भविष्याच्या दृष्टीने ठेवी स्वरुपात ठेवलेल्या रकमेबाबत मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रहार जनशक्ती पक्षाचे उपजिल्हा प्रमुख शंभू मालठाणे यांनी सहायक निबंधक, निबंधक कार्यालय अंजनगाव सुर्जी यांच्याकडे निवेदनाद्वारे तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मालठाणे यांनी ३सप्टेंबर२०२६ रोजी या गैरव्यवहाराबाबत आपल्याकडे तक्रार केली होती. मात्र, त्या तक्रारीवर अद्यापपर्यंत कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे ठेवीदारांमध्ये संतापाचे वातावरण आहे.या निवेदनात म्हटले आहे की, १२ऑक्टोबर २०२६ पासून या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. जोपर्यंत पतसंस्थेचे अध्यक्ष व संचालक यांच्या प्रॉपर्ट्या जप्त करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करून नागरिकांचे (ठेवीदारांचे) पैसे परत केले जात नाहीत व त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन ठेवीदारांच्या मागणीनुसार अध्यक्ष व संचालक यांच्यावर कायदेशीर कारवाई करून ठेवीदारांचे पैसे परत करण्याचा मार्ग काढावा, अन्यथा आपल्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल. यातून होणाऱ्या कोणत्याही गैरप्रकारास संबंधित अधिकारी व पतसंस्थेचे अध्यक्ष व संचालक जबाबदार राहतील, असा इशारा देण्यात आला आहे.या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, मा. सहकार मंत्री, पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, माजी राज्यमंत्री बच्चू कडू, जिल्हाधिकारी अमरावती, जिल्हा उपनिबंधक, तहसीलदार अंजनगाव सुर्जी व ठाणेदार पो. स्टेशन अंजनगाव सुर्जी यांना पाठविण्यात आल्या आहेत.दरम्यान, या निवेदनावर सहायक निबंधक कार्यालय रोजी प्राप्त शिक्का मारण्यात आला असून, आता प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्व ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

पाणी, दुष्काळ आणि योगायोग



एखाद्या प्रदेशात सरासरी वार्षिक पर्जन्यमान पुरेसे असू शकते; पण तो पाऊस काही मोजक्या दिवसांत अत्यंत मोठ्या प्रमाणावर पडला, तर पूर निर्माण होऊ शकतो आणि उर्वरित काळात पाणीटंचाई भासू शकते. त्यामुळे केवळ 'किती पाऊस पडतो?' हा प्रश्न पुरेसा नाही. 'तो कधी पडतो', 'कुठे पडतो', 'किती तीव्रतेने पडतो', 'त्यातील किती पाणी जमिनीत मुरते' आणि 'किती पाणी वाहून जाते' हे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत.

मानवी जीवनाकडे पाहताना एक प्रश्न वारंवार आपल्या समोर उभा राहतो. आपल्या आयुष्यात जे काही घडते ते किती प्रमाणात अपरिहार्य असते आणि किती प्रमाणात आपल्या निवडींचे फलित असते? काही घटना आपल्या नियंत्रणाबाहेर असतात, तर काही घटना आपल्या कृतींमधून निर्माण होतात. काही वेळा परिस्थिती योगायोगाने घडल्यासारखी वाटते, तर काही वेळा तिच्यामागे स्पष्ट कारणपरंपरा दिसते. पाऊस कधी पडेल, किती पडेल, कोणत्या प्रदेशात पडेल, त्याचे वितरण कसे होईल, एखाद्या वर्षी दुष्काळ पडेल की अतिवृष्टी होईल, नदीला पूर येईल की प्रवाह कमी होईल, भूजलाची पातळी किती खाली जाईल, अशा अनेक गोष्टींमध्ये निसर्गाची अनिश्चितता असते; परंतु या अनिश्चिततेसमोर मानवी समाजाचे वर्तन कसे असावे, उपलब्ध पाण्याचा वापर कसा करावा, पाण्याचे संवर्धन कसे करावे, भविष्यातील संकटांची तयारी कशी करावी आणि पाण्याशी असलेले आपले नाते कसे असावे, हे प्रश्न मात्र मानवी विवेक आणि पुरुषार्थाशी संबंधित आहेत.

निसर्गाच्या अपरिहार्यतेचा स्वीकार आणि मानवी पुरुषार्थाचा जागर यांचा समतोल म्हणजे जलविवेक. या संकल्पनेचा तात्त्विक संदर्भ पाहिला, तर इमॅन्युएल कांटच्या ज्ञानमीमांसेची आठवण येते. कांटच्या मते, जे ज्ञान सार्वत्रिक (Universal) आणि आवश्यक (Necessary) असते, तेच वस्तुनिष्ठ ज्ञान (Objective Knowledge) मानले जाते. निसर्गाच्या व्यवस्थेत काही प्रक्रिया आपल्या इच्छेवर अवलंबून नसतात. सूर्य उगवणे, ऋतूंचे चक्र, बाष्पीभवन, ढगांची निर्मिती, पर्जन्य, नदीचा प्रवाह, जमिनीत पाण्याचे झिरपणे आणि भूजलाची पुनर्भरण प्रक्रिया या सर्व प्रक्रिया विशिष्ट नैसर्गिक नियमांनी चालतात. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या प्रक्रियांचे ज्ञान मिळवले आहे; परंतु त्यांना पूर्णपणे आपल्या इच्छेप्रमाणे चालविण्याची क्षमता त्याच्याकडे नाही. पाऊस पाडण्याची इच्छा असणे आणि पाऊस पाडता येणे यात मोठा फरक आहे.

ही मर्यादा स्वीकारणे म्हणजे पराभव नव्हे. उलट, शाश्वत जलव्यवस्थापनाची ती पहिली अट आहे. जलव्यवस्थापनाचे मूलभूत शहाणपण याच जाणिवेत आहे की, आपण निसर्गावर संपूर्ण नियंत्रण मिळवू शकत नाही. आपण निसर्गाच्या प्रक्रियांना समजून घेऊ शकतो, त्यांच्याशी जुळवून घेऊ शकतो आणि उपलब्ध संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करू शकतो. नदीला आपण आदेश देऊ शकत नाही; परंतु तिच्या प्रवाहाचा अभ्यास करू शकतो. पावसाला आपण 'ये रे ये रे पावसा' असे म्हणून बोलावू शकत नाही किंवा त्याला आदेश देऊ शकत नाही; परंतु पाऊस आला की, त्याचे पाणी जमिनीत मुरवू शकतो. दुष्काळ टाळण्याची पूर्ण हमी देऊ शकत नाही; परंतु दुष्काळाची तीव्रता आणि त्यातून निर्माण होणारी असुरक्षितता कमी करू शकतो. यातून एक महत्त्वाचा फरक स्पष्ट होतो. निसर्गाची मर्यादा आणि मानवी असहाय्यता या एकच गोष्टी नाहीत.

जलव्यवस्थापनात 'Chance' या संकल्पनेचा अर्थ अधिक काळजीपूर्वक समजून घ्यावा लागतो. पाऊस कमी पडणे म्हणजे केवळ योगायोग नाही. पर्जन्याच्या मागे हवामानशास्त्रीय, भौगोलिक आणि वातावरणीय प्रक्रिया असतात; परंतु एखाद्या विशिष्ट ठिकाणी विशिष्ट दिवशी किती पाऊस पडेल, त्याचे अचूक भाकीत करणे अनेकदा शक्य नसते. म्हणून आधुनिक विज्ञान 'अनिश्चितता' या संकल्पनेचा वापर करते. एखाद्या प्रदेशात सरासरी वार्षिक पर्जन्यमान पुरेसे असू शकते; पण तो पाऊस काही मोजक्या दिवसांत अत्यंत मोठ्या प्रमाणावर पडला, तर पूर निर्माण होऊ शकतो आणि उर्वरित काळात पाणीटंचाई भासू शकते. त्यामुळे केवळ 'किती पाऊस पडतो' हा प्रश्न पुरेसा नाही. 'तो कधी पडतो', 'कुठे पडतो', 'किती तीव्रतेने पडतो', 'त्यातील किती पाणी जमिनीत मुरते' आणि 'किती पाणी वाहून जाते' हे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत.

यातून जलव्यवस्थापनाचे एक नवे तत्त्व पुढे येते. ते म्हणजे, अनिश्चितता संपवणे शक्य नसते; परंतु अनिश्चिततेपासून निर्माण होणारा धोका कमी करणे शक्य असते. आधुनिक जलव्यवस्थापनाच्या संदर्भात विचार केला, तर त्याचे एक महत्त्वाचे रूप दिसते. प्रत्येक परिणामामागे काही कारणपरंपरा असते. मानवी कृती आणि त्यांचे परिणाम यांचा संबंध समजून घेणे आवश्यक आहे.आज एखाद्या शहरात पाणीटंचाई निर्माण झाली, तर ती केवळ 'नियती' म्हणून स्वीकारणे योग्य ठरेल का?

भूजलाचा वर्षानुवर्षे अतिउपसा झाला असेल, जलस्रोतांवर अतिक्रमण झाले असेल, पाण्याची गळती वाढली असेल, जलप्रदूषण झाले असेल, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण केले गेले नसेल किंवा उपलब्ध पाण्यापेक्षा मागणी सातत्याने वाढत गेली असेल, तर त्या संकटाला केवळ दैव म्हणता येणार नाही. तिथे मानवी कृतींची स्पष्ट भूमिका आहे.

यामुळेच 'नियती' ही संकल्पना चुकीच्या अर्थाने वापरण्याचा धोका निर्माण होतो. मानवी चुकीच्या निर्णयांचे परिणाम निसर्गावर ढकलणे म्हणजे जबाबदारीपासून पळणे होय. पाण्याची कमतरता काही वेळा नैसर्गिक असू शकते; पण पाणीटंचाईची तीव्रता अनेकदा सामाजिक आणि व्यवस्थापनात्मक निर्णयांवर अवलंबून असते.

डॉ. मंगेश कश्यप

विरोधकांबरोबरच सत्तेतल्या लोकांचेही कान हरवले...!



'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये दिल्लीत असताना मी एके दिवशी समाजवादी नेते मधु लिमये यांना इंदिरा गांधींबद्दल बोलते करण्याचा प्रयत्न केला. १९९२-९३ असावं. मधु लिमये यांनी राजकारण सोडल्याला दहा वर्षं होऊन गेली होती. इंदिराजींचे प्रखर विरोधक म्हणून लिमये यांची ख्याती होती. पण राजकीय विरोधक असले तरी दोघांना परस्परांबद्दल आदरही होता.

लिमये म्हणाले, 'Mrs. Gandhi had big ears... बाईचे कान खूप मोठे होते...!'

म्हणजे नेमकं काय?

त्यावर लिमये यांचं उत्तर फारच मार्मिक होतं :

'देशभरातून लोक दिल्लीत येत... इंदिरा गांधी त्यातल्या शंभर लोकांना रोज़ सकाळी भेटत... त्यांचे म्हणणे कान देऊन ऐकत... बाईंनी आपलं ऐकलं, या समाधानात लोक परत जात आणि इंदिराजी सत्तेत येत...

आम्हालाही रोज़ शंभर लोक भेटत... ते आमचं म्हणणं ऐकत आणि आम्हाला विरोधी बाकांवर बसवत...!'

तर, बाईंना मोठ्ठे कान होते...!

काळाच्या ओघात विरोधकांबरोबरच सत्तेतल्या लोकांचेही कान हरवले...!

जनतेचे ऐकणारे कान भारताला कधी परत मिळणार...?

इंदिरा गांधी यांना विनम्र अभिवादन.

-नितीन वैद्य

अंतर्गत बंडखोरी अन् चुकीच्या रणनीतीचा फटका

विधान परिषदेच्या विदर्भातील दोन जागांसाठी झालेल्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीत चुरस पाहायला मिळाली. यामध्ये नागपूर पदवीधर मतदारसंघ भाजपने गमावला असून, ही जागा पुन्हा एकदा काँग्रेसने जिंकली आहे. या निकालांमुळे महायुतीमधील समन्वयाचा अभाव आणि भाजपच्या नियोजनशून्यतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विधान परिषदेच्या दोन जागांसाठी विदर्भात गेल्या आठवड्यात मतदान झाले, तर मंगळवारी मतमोजणीदेखील पूर्ण झाली. त्यातील एक जागा महायुतीला मिळाली आहे, तर एक जागा महाविकास आघाडीकडे गेलेली आहे. त्यातही महायुतीकरिता विशेषतः भारतीय जनता पक्षासाठी प्रतिष्ठेची मानली गेलेली नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची जागा पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाकडून काँग्रेसने हिसकावून घेतली आहे.



विधान परिषदेसाठी नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ आणि अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ येथे ही निवडणूक झाली. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ हा भारतीय जनता पक्षाच्या वाट्याला आला होता, तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे गेला होता. शिंदे सेनेने आपली जागा राखली, मात्र भाजपने पुन्हा एकदा जागा गमावलेली आहे.

या वेळी या दोन्ही मतदारसंघातील निवडणूक ही चांगलीच चर्चेचा विषय ठरली होती. याला कारण दोन्ही मतदारसंघांमध्ये जोरदार बंडखोरी झाली होती. परिणामी, पक्षांतर्गत नाराजी आणि त्याचबरोबर महायुतीतील नाराजी मोठ्या प्रमाणात होती. नागपूर पदवीधर मतदारसंघात २०२० मध्ये काँग्रेसचे अभिजित वंजारी निवडून आले होते. त्यांनी भाजपच्या संदीप जोशी यांचा पराभव केला होता. तो पराभव भाजपश्रेष्ठींना प्रचंड लागला होता. त्यामुळे या वेळी जागा तसेही करून मिळवायचीच, या जिद्दीने भाजपचे नेते मैदानात उतरले होते.

या वेळी काँग्रेसने पुन्हा एकदा अभिजित वंजारींनाच उमेदवारी दिली होती, तर भाजपने संदीप जोशी यांना बदलून त्यांच्या जागी सुधाकर कोहळे यांना उमेदवारी दिली होती. महाराष्ट्राचे गठन झाल्यापासून २०२० पर्यंत हा मतदारसंघ आधी जुना जनसंघ आणि मग भारतीय जनता पक्षाकडे राहिलेला होता. इथे जुन्या जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बच्छराज व्यास, भारतीय मजदूर संघाचे नेते गोविंदराव आठवले, भाजपचे ज्येष्ठ नेते गंगाधरराव फडणवीस नंतर नितीन गडकरी आणि सगळ्यात शेवटी २०१४ मध्ये भाजपचे अनिल सोले विजयी झाले होते. मात्र, २०२० मध्ये अनिल सोले यांना बदलून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती असलेले संदीप जोशी यांना उमेदवारी देण्यात आली. या वेळी संदीप जोशी यांचा पराभव झाला. आणि इतिहासात प्रथमच ही जागा काँग्रेसने हिसकावून घेतली. त्यामुळे या वेळी कसेही करून ही जागा मिळवायचीच, असा भाजपचा प्रयत्न होता.

मात्र इथे भाजपश्रेष्ठींनी उमेदवार निवडताना पुन्हा एकदा चूक केली. सुधाकर कोहळे हे पदवीधर मतदारसंघासाठी योग्य उमेदवार नव्हते हे यापूर्वीदेखील अनेकांनी सांगून झाले होते. मात्र, पालकमंत्री बावनकुळे यांच्या आग्रहाखातर त्यांना उमेदवारी देण्यात आली. पदवीधर मतदारसंघात ज्या पद्धतीने संघटनात्मक बांधणी करायला हवी होती आणि ज्या विविध पदवीधर संघटनांशी संधान बांधून मतांची बेगमी करायला हवी होती ती करण्यात कोहळे अपयशी झाले. त्यातच नाराज अनिल सोले यांनी बंडाचे निशाण उभारले. त्यांच्या साथीला बच्छराज व्यास यांचे चिरंजीव माजी आमदार गिरीशदेखील मैदानात आले.

शेवटी मुख्यमंत्र्यांना सोलेंच्या नाकदुऱ्या काढून उमेदवारी मागे घ्यायला लावावी लागली. इथे प्रत्येक पदवीधर मतदारापर्यंत भाजपचा कार्यकर्ता पोहोचणे गरजेचे होते. मात्र, कार्यकर्ते फार थोड्या ठिकाणी पोहोचले असे लक्षात आले अनेक मतदारांनी आमच्याकडे कोणीही आले नाही, असे अनेकांनी चर्चेच्या ओघात सांगितले. त्या तुलनेत अभिजित वंजारी यांनी आपले पूर्ण नेटवर्क कामाला लावले होते. त्याचा परिणाम दिसून आला.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नीलेश कराळे यांनीदेखील बंडखोरी केली होती. त्यांचेही नेटवर्क चांगले होते. पहिल्या फेरीत जो विजयी उमेदवारासाठी ठरलेला मतांचा कोटा होता तो एकानेही पूर्ण न केल्यामुळे दुसऱ्या पसंतीची मते मोजली गेली. इथे कराळेंना पहिल्या पसंतीचे मत देणाऱ्या बहुतेक सर्व उमेदवारांनी दुसऱ्या पसंतीचे मत अभिजित वंजारींना दिले होते. त्याचा फायदा घेत दुसऱ्या पसंतीच्या मतमोजणीत अभिजित वंजारी विजयी घोषित केले गेले. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत जे उमेदवार तर्फे मतदारांचे प्रबोधन करायला हवे तिथे भाजपचे कार्यकर्ते कमी पडले. या मतदारसंघात विजय मिळवायचा तर या क्षेत्रातील किमान पक्षाच्या आमदारांचे तरी सहकार्य असावे लागते, ते देखील कोहळींसोबत नव्हते असे बोलले गेले. त्याचाच परिणाम म्हणून कोहळ्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. या वेळी देशभरात २८ जागी विधान परिषदेच्या निवडणुका झाल्या. तिथे काँग्रेसला संधी मिळू शकली नव्हती. फक्त नागपूरच्या एका जागी काँग्रेस निवडून येऊ शकली. त्यालादेखील भाजपचे संघटन कौशल्य ही कमी पडले आणि भाजपचे चाणक्य रणनीती आखण्यातही अपुरे पडले हे स्पष्ट झाले आहे.

नागपूर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय शहर आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचेही हे शहर आहे. सोबतच नितीन गडकरींसारखा दिग्गज नेता येथे सक्रिय आहे. तरीही लागोपाठ दुसऱ्यांदा या सुशिक्षितांच्या मतदारसंघात भाजपला पराभव स्वीकारावा लागला ही नमुष्कीचीच बाब आहे, असे म्हणावे लागते. अमरावती शिक्षक मतदारसंघ हा आळीपाळीने कधी भाजपकडे तर कधी विरोधकांकडे असा राहिला आहे. पूर्वी इथे शिक्षकांच्या दोन संघटना सक्रिय होत्या. त्यात एक महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद आणि दुसरी माध्यमिक शिक्षक संघ. यातील महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद ही भाजपप्रणित संघटना होती. इथून या संघटनेचे वसंतराव मालधुरे, दिवाकर पांडे हे आमदार म्हणून निवडून गेले होते. २०२० मध्ये या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे किरण सरनाईक विजयी झाले होते. मात्र, नंतर बदलत्या हवेचा अंदाज घेत किरण सरनाईक शिंदेंच्या शिवसेनेत डेरेदाखल झाले आणि या वेळी ते शिंदे सेनेचे उमेदवार म्हणून निवडणुकीत उतरले होते. त्यांना शिवसेनेतून तर विरोध होताच; पण भारतीय जनता पक्षानेदेखील विरोध दर्शवला होता. अर्थात महायुतीचे उमेदवार म्हणून त्यांनाच प्रोजेक्ट केले गेले. त्यामुळे शिंदे शिवसेनेतीलच एक माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनीही बंडखोरी केली. त्याचबरोबर भाजपमधूनही दोन उमेदवारांनी व बंडखोरी केली. त्यातील एक खासदाराची बहीण होती, तर दुसरे आमदाराचे नातेवाईक होते. पक्षाच्याच नेत्यांच्या छुप्या आशीर्वादाने ही बंडखोरी झाली होती. त्यामुळे किरण सरनाईक यांनाही विजय मिळवण्यासाठी प्रचंड दमछाक करावी लागली. शिवसेनेतदेखील फक्त पदासाठी बाहेरून आलेल्या उपऱ्याला अशी अचानक उमेदवारी द्यावी याची प्रचंड नाराजी होती. भाजपचे तर फक्त नेतेच व्यासपीठावर दिसायचे, बाकी कार्यकर्ते कुठेही कामाला लागलेले दिसत नव्हते.

अविनाश पाठक

फटाके बंदीची अंमलबजावणी होणार?

एकीकडे वायू आणि ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रात सर्व उत्सवांमध्ये वर्षभर सार्वजनिक ठिकाणी आणि रस्त्यांवर फटाके वाजवण्यास पूर्णपणे बंदी घातली असताना दुर्दैवाने दरवर्षीप्रमाणे यंदाही ही बंदी केवळ कागदावरच राहिल्याचे पाहायला मिळत आहे. गणेशोत्सव आणि नवरात्रीनंतर आता उत्साहाचा आणि आनंदाचा दिवाळीचा सण तोंडावर आला आहे. आता या दिवसातही रात्री उशीरापर्यंत कानठळ्या बसवणारे, १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाचे फटाके फोडण्याचे प्रमाण टिपेला पोहोचेल. १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाचे फटाके फोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनि प्रदूषण, वायू प्रदूषण होतेच, परंतु रुग्णांना, लहान बालकांना तसेच ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड त्रास होतो. कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांमुळे कान बधीर होतात. कायमचा बहिरेपणा येण्याचीही शक्यता असते. तसेच डोकेदुखी, रक्तदाब, हृदयविकार, दमा आणि फुफ्फुसाचे विकार यांसारखे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. पशुपक्षीही या आवाजाने घाबरून सैरावैरा पळत सुटतात व अपघातग्रस्त होऊन मृत्यूमुखी पडतात. फटाक्यांमुळे सर्वत्र कचरा, धूळ साठून पर्यावरणाचीही मोठ्या प्रमाणात हानी होते. कधी कधी आगीही लागतात. अशावेळी प्रशासनाने केवळ आदेश देऊन चालणार नाही, तर त्याची कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. प्रशासकीय उदासीनता आणि लोकांची बेफिकिरी यामुळे ही बंदी केवळ कागदावर राहू नये एवढीच अपेक्षा आहे.

-

प्रदीप मोरे



दिवा पुन्हा थरथरला..

दिवा आता म्हातारा झाला होता आणि उद्या त्याच्या निवृत्तीचा दिवस होता..म्हणजे असं इतरांनीच ठरवलं होतं. आपण म्हातारे झालो आहोत, असं दिव्याला अजिबातच वाटत नव्हतं. जो काळानुसार बदलत नाही, तो म्हातारा होतो, असं त्याचं स्वच्छ मत होतं. दिवा तर काळानुसार बदलत गेला होता. त्याचा काळा कुळकुळीत, सुरेख डिझाइनचा खांब आणि षटकोनी आकाराची, काचेची पेटी सोडल्यास सगळं काही बदलत गेलं होतं.

तो त्या गावातला पहिला दिवा होता, मुख्य चौकात लागलेला. तेव्हा तो गॅसचा होता. नंतर विजेचा झाला. आता तर त्याच्यात झगझगीत प्रकाशाचे नवे बल्ब लागले होते. दिवसेंदिवस आपण तरूणच होत असताना ही म्हातारपणाची टूम कोणी काढली असावी, त्याला कळेना.

त्याच्याखालीच रंगलेल्या चर्चांमधून त्याला काही कारणं कळली होती. कोणी म्हणे तो ब्रिटिशांच्या काळातला होता, म्हणून ती पारतंत्र्याची खूण आधुनिक शासकांना नष्ट करायची होती. दिवा मनाशी हसला. स्वातंत्र्याचा उजेड त्याच्याइतका कोणाला ठाऊक होता? कोणी म्हणे, सगळ्या गावातले दिवे वारंवार दुरुस्त करत राहिल्याने, बदलत राहिल्याने कंत्राटदार,लोकसेवक, त्यांचे मालक वगैरे गोरगरीबांच्या घरांमध्ये समृद्धीचा उजेड पडतो, म्हणून ही टूम निघाली आहे.कारण काहीही असो, उद्याचा दिवस दिव्याच्या आयुष्यातला शेवटचा दिवस होता.

नेहमीप्रमाणे दिवसभर डोळे मिटून स्वस्थ बसलेला असताना त्याच्या डोळ्यांसमोरून आठवणींचा पट सरकत होता. काय काय पाहिलं होतं त्याने? तो पहिल्यांदा गावात आला, तेव्हा एखाद्या नेत्याला किंवा नटाला पाहायला व्हावी, तशी गर्दी झाली होती त्याला पाहायला. त्याच्या तेव्हाच्या अंधुक प्रकाशात कधी चोरांचे बेत शिजले होते, कधी क्रांतिकारकांच्या मोहिमांची आखणी झाली होती. त्याच्या प्रकाशात शिकलेली कितीतरी मुलं अंमलदार झाली होती, ती आलिशान गाड्यांमधून जाताना दिव्याकडे कौतुकाने बोटं दाखवत, तेव्हा दिव्याला किती अभिमान वाटायचा! दिवसाच्या वेळी कोणता तरी अक्षरशत्रू गावगणंग हजारांच्या प्रेमिकांच्या चोरट्या भेटी होत आणि काही वर्षांनी संध्याकाळच्या दिवेलागणीला एकीकडे त्या दोघांच्या सुखदुःखाच्या गप्पा चाललेल्या असताना त्यांची मुलं दिव्याभोवती बागडत असत, तेव्हा दिव्याला कौटुंबिक समाधान लाभायचं 'हं' संपणार हे सगळं उद्याष्ट असं म्हणत सुस्कारून त्याने त्या रात्री शेवटचा उजेड पाडला..

...का कोण जाणे आज प्रकाश थरथरत होता की त्यालाच तसा भास होत होता..च्यामारी या लोडशेडिंगच्या..मनातल्या मनात तो कातावला...सकाळी ठरल्या वेळेला मालवल्यानंतर तो निश्चेष्ट पडून राहिला..कोणीतरी त्याला खांबावरून सोडवायला सुरुवात केली, तेव्हा तर त्याच्यात कसलंच त्राण उरलं नव्हतं...त्यामुळेच अचानक खट् असा बटणाचा आवाज झाला तेव्हा त्याच्या अंगभर वीज सळसळून गेली स्वत:च्याच प्रकाशात त्याने नवलाईने आसपास पाहिलं अरेच्चा, हे काय झालं? हा मी कुठे आलो?...

अचानक त्याच्यासमोर एक सुरकुतलेला, पिकलेला चेहरा आला. हा चेहरा ओळखीचा वाटतोय. दुसऱ्या एका सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या बाईने जेव्हा त्याची शेड स्वच्छ करण्यासाठी कापड फिरवलं, तेव्हा सर्रकन् त्याची ट्यूब पेटलीष्ठ अरे, आपण पहिल्यांदा या गावात आलो होतो, तेव्हा आपल्या देखभालीचं काम करणारं हे दाम्पत्य होतं. तेव्हा तो विशीत होता, ती तर पंधरा वर्षांची परकरी पोर असावी. पण, तिचा तो ममताळू हात अजूनही तसाच होता टीचभर शेतीत भागेना, म्हणून कोण कुठल्या गावाहून इथे जगायला आलेल्या या तरुणाला या दिव्याच्या देखभालीचं पहिलंवहिलं काम मिळालं होतं. तो आणि त्याची बायको यांनी ते मनोभावे केलं होतं.

त्यांच्या त्या वृत्तीचं फळ म्हणून की काय, त्यांचा उत्कर्ष झाला आणि आता ते सुखी कुटुंब टुमदार घरात स्थिरावलं होतं पण, ते त्या दिव्याला विसरले नव्हते. त्याला कायमचं हटवलं जाणार हे वाचल्यानंतर दोघेही अस्वस्थ झाले होते. मग नवऱ्याने भंगारात निघालेला दिवा दुप्पट दाम मोजून विकत घेतला होता, प्रेमाने आणि अभिमानाने आपल्या घरात लावला होता..नमस्कार करा नमस्कार, या शब्दांनी दिवा भानावर आला..

वर्धा तालुक्यातील तिगाव येथील सर्व्हे क्रमांक ३५४/१ मधील ०.४८ हेक्टर शेतजमीन कृष्णा जयराम करमकार यांना भूदान अंतर्गत वितरित करण्यात आली होती. ही जमीन वर्ग-२ स्वरूपाची होती. कृष्णा करमकार यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांची नावे संबंधित जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नोंदविण्यात आली. मात्र, त्यानंतर या जमिनीची अरुण नथ्थोबाजी लोहकरे यांना विक्री करण्यात आल्याचे पुढे आले आहे. या व्यवहारासंदर्भात फेरफार क्रमांक



२०९ असल्याची माहिती खात्रीदायक सूत्रांकडून मिळाली आहे. भूदानातून मिळालेली जमीन वारसांच्या नावे आल्यानंतर तिची विक्री नेमकी कोणत्या कायदेशीर आधारावर झाली, हा तपासाचा महत्त्वाचा मुद्दा आहे.

दुसरे प्रकरण कडे यांच्या वारसांचाही जमिनीचा सौदा

तिगावमधील दुसरे प्रकरण याहूनही गंभीर आहे. सर्व्हे क्रमांक २३९ मधील १.४४ हेक्टर जमीन केशव डोमाजी कडे यांना भूदान अंतर्गत वितरित करण्यात आली होती. त्यांच्या निधनानंतर वारसांची नावे सातबारा उताऱ्यावर नोंदविण्यात आली. त्यानंतर या वर्ग-२ च्या जमिनीची नारायण डोमाजी करनाके यांना विक्री झाल्याची नोंद समोर आली आहे. या व्यवहाराशी संबंधित फेरफार क्रमांक २१६ असल्याचे सांगण्यात येते. एकाच गावात भूदानाच्या दोन वेगवेगळ्या जमिनींच्या विक्रीचे व्यवहार समोर येणे हा केवळ योगायोग मानता येणार नाही. या दोन्ही प्रकरणांची एकत्रित चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

या दोन्ही प्रकरणांची नोंद तालुका प्रशासनाने घेतल्याची माहिती आहे. तरीही प्रत्यक्षात पुढील कारवाईबाबत स्पष्टता नाही. संबंधित जमिनींचे फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले? विक्रीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेण्यात आली होती काय? जमिनीचा मूळ भूदान दर्जा तपासण्यात आला होता काय? फेरफार मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कायदेशीर तरतुदींची पडताळणी केली होती काय असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

भूदान जमिनींच्या प्रकरणात केवळ महसुली अटींचा भंग झाला असल्यास त्यावरील कारवाई आणि फसवणूक अथवा बनावट दस्तऐवजांच्या आधारे व्यवहार झाल्यास होणारी फौजदारी कारवाई या दोन स्वतंत्र बाबी आहेत.

मात्र, विक्री व्यवहारात बनावट कागदपत्रे, खोटी माहिती, बेकायदेशीर फेरफार किंवा जमिनीचा वर्ग बदलण्यासाठी फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर लागू कायद्यांनुसार फौजदारी कारवाई होऊ शकते. त्यामुळे महसूल विभागाने केवळ सातबारा आणि फेरफार नोंदींपुरती चौकशी मर्यादित न ठेवता मूळ भूदान वाटप आदेशापासून ते विक्री दस्तऐवजांपर्यंत सर्व कागदपत्रांची तपासणी करणे आवश्यक आहे.

भूदानाचा वारसा वाचविणार कोण

यापूर्वीही भूदानाच्या जमिनींच्या थेट विक्रीचे आणि वर्ग-२च्या जमिनी वर्ग-१ करण्याचे प्रकार समोर आले आहेत. आता तिगावमधील दोन प्रकरणांनी या व्यवहारांची व्याप्ती आणि प्रशासनाच्या देखरेखीचा प्रश्न अधिक गंभीर केला आहे. भूदानातून मिळालेली जमीन ही केवळ मालमत्ता नसून सामाजिक न्यायाच्या एका ऐतिहासिक चळवळीचा वारसा आहे. या जमिनींची बेकायदेशीर विक्री होत असेल, तर तो केवळ महसुली नियमांचा भंग नसून भूदान चळवळीच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणारा प्रकार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून तिगावमधील दोन्ही फेरफारांची वैधता तपासावी, विक्री व्यवहारांना परवानगी देण्यात आली होती काय याची खातरजमा करावी आणि दोष आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा भूदानाच्या जमिनींचा हा खेळ सुरूच राहणार आणि भूमिहीनांच्या हक्कासाठी दिलेल्या जमिनी कागदोपत्री व्यवहारांचे साधन बनत राहतील.

दुचाकी चोरीप्रकरणी आरोपीला एक वर्षाचा सश्रम कारावास

मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांचा निकाल रामनगर पोलिसांच्या तपासाला यश

वर्धा/जनमाध्यम



मित्राकडे कामानिमित्त गेलेल्या व्यक्तीची दुचाकी चोरून नेणाऱ्या आरोपीला न्यायालयाने एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. विशाल चंदू कुराडे (वय २५, रा. वडार झोपडपट्टी, आर्वी नाका, वर्धा) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती डोईफोडे यांनी ३१ ऑक्टोबर रोजी हा निकाल दिला.

प्राप्त माहितीनुसार, सदानंद शंकरराव किनगावकर (रा. प्रतापनगर, वर्धा) हे कामानिमित्त मित्राकडे दुचाकीने गेले होते. काम आटोपून घराबाहेर आल्यानंतर त्यांना आपली दुचाकी दिसून आली नाही. अज्ञात व्यक्तीने दुचाकी चोरून नेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून सेवाग्राम पोलीस ठाण्यात अप.क्र. ५७१/२०२०, कलम ३७९ भादंवि अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार आकाश चुंगडे यांनी केला. तपासाअंती आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता समीर ढुंगे यांनी बाजू मांडली. तर पैरवी अंमलदार सहायक फौजदार संजय चावक यांनी साक्षीदारांना न्यायालयात उपस्थित ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. रामनगर पोलीस ठाण्याच्या तत्कालीन ठाणेदार पोलीस निरीक्षक पोर्णिमा राखुंडे यांनी साक्षीदारांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. अखेर न्यायालयाने आरोपी विशाल कुराडे याला दोषी ठरवत एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. चोरीच्या गुन्ह्यात न्यायालयाने दिलेल्या या निकालामुळे पोलिसांच्या तपासाला यश मिळाले आहे.

मोबाईलच्या दुनियेतून विद्यार्थ्यांची मैदानाकडे धाव

ठाणेदारांच्या पुढाकाराने सायबर सुरक्षेचा संदेश



आष्टी शहीद/जनमाध्यम

सायबर गुन्हेगारीपासून सावध राहा, डिजिटल व्यवहार सुरक्षित करा आणि निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करा, असा दुहेरी संदेश देत आष्टी पोलिसांनी आयोजित केलेल्या मॅरेथॉनमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ठाणेदार देविदास गजरे यांच्या पुढाकारातून ३१ ऑक्टोबर रोजी आयोजित या उपक्रमाने पोलिसांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

'सायबर क्राईम, डिजिटल एकता, सुरक्षित भविष्य' या संकल्पनेतून जनजागृती उपक्रमाचा समारोप मॅरेथॉनने करण्यात आला. सकाळी ७ वाजता आष्टी पोलीस ठाण्यातून तीन किलोमीटरच्या स्पर्धेला सुरुवात झाली. ठाणेदार देविदास गजरे यांनी हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेचा शुभारंभ केला.मुलांच्या गटात राजेंद्र नंदू साखरकर याने प्रथम, प्रणय चरपे याने द्वितीय, तर सुशील दूधकवरे याने तृतीय क्रमांक पटकाविला. मुलींच्या गटात वेदांती धाकुळकर प्रथम, वैष्णवी हरीश मदनकर द्वितीय, तर सोनाली नेहारे तृतीय आली. विजेत्यांना रोख पारितोषिक आणि मेडल देऊन गौरविण्यात आले.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक हर्षल नगरकर आणि ठाणेदार गजरे यांनी ऑनलाइन फसवणूक, अनोळखी लिंक, बनावट फोन कॉल आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कायद्याच्या रक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आणि सुरक्षित भविष्याची काळजी घेणाऱ्या आष्टी पोलिसांच्या या उपक्रमाचे पालक व नागरिकांकडून कौतुक होत आहे. मोबाइलच्या आभासी जगातून विद्यार्थ्यांना मैदानाकडे वळविणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

लाकडी काठीने डोक्यावर प्रहार

वर्धा- मित्रासोबत बोलत उभ्या असलेल्या तरुणाच्या डोक्यावर मागून येत लाकडी काठीने प्रहार करून जखमी केल्याची घटना सेवाग्राम परिसरातील वरुड रेल्वेस्थानकासमोर घडली. कमलेश सुरेशराव डोळसकर (३१, रा. वरुड) असे जखमीचे नाव असून अवधूत जांभुळकर असे आरोपीचे नाव आहे.३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास कमलेश प्रेसच्या कपड्यांचे गठ्ठे घेऊन जात होता. यावेळी त्याला त्याचा बिहारी मित्र भेटल्याने तो त्याच्याशी बोलत उभा होता. दरम्यान, मागून आलेल्या अवधूतने तू माझ्याकडे पाहून का बोलत आहेस, असे म्हणत लाकडी काठीने कमलेशच्या डोक्यावर मारले.

आयटकच्या स्थापना दिनी कामगारांचा रणसंग्रामाचा निर्धार

घामाला दाम अन् श्रमाला सन्मान मिळेपर्यंत लढा

वर्धा/जनमाध्यम



वर्षानुवर्षे शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविणारे, मात्र स्वतःच्या हक्कांसाठी संघर्ष करणारे अंगणवाडी सेविका, आशा व गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कर्मचारी, स्त्री परिचर आणि कंत्राटी नर्सेस आता निर्णायक लढ्याच्या तयारीत आहेत. आयटकच्या १०६ व्या स्थापना दिनानिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी वर्ध्यात आयोजित निर्धार मेळाव्यात डिसेंबर महिन्यात सेवाग्राम ते नागपूर पायी मोर्चा काढण्याचा आणि मागण्या मान्य होईपर्यंत नागपुरात मुक्कामी आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला.

बच्छराज सभागृह, शास्त्री चौक येथे झालेल्या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगार नेते कॉम्रेड मनोहर पचारे होते. आयटकचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉम्रेड दिलीप उटाणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.आयटकचा १०६ वर्षांचा इतिहास हा त्याग, बलिदान आणि संघर्षाचा इतिहास आहे, असे सांगत उटाणे यांनी कामगार चळवळीच्या योगदानाचा आढावा घेतला. शासनाच्या योजना राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, किमान वेतन, पेन्शन, ग्रॅज्युटी आणि सामाजिक सुरक्षा मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युटी, पेन्शन, आशा कर्मचाऱ्यांना किमान वेतन, पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ आणि कंत्राटी नर्सेसच्या सेवा नियमित करण्याच्या मागण्या मांडण्यात आल्या.मेळाव्यात वैशाली टिपले यांनी सहकाऱ्यांसह आयटकमध्ये प्रवेश केला. क्रांतिकारी गीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण झाले. मोठ्या संख्येने उपस्थित कामगारांनी एकजुटीचा निर्धार व्यक्त केला. डिसेंबरमधील सेवाग्राम ते नागपूर मोर्चा हा शासनाला जागे करण्यासाठीचा संघर्षाचा इशारा ठरणार आहे.



जिल्हा युवा महोत्सवात देवळीच्या एनसीसी छात्र सैनिकांनी पटकविला दुसरा क्रमांक

वर्धा/जनमाध्यम

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित शासकीय जिल्हा युवा महोत्सवाचे ३० व ३१ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले होते. यावर्षीच्या युवा महोत्सवाचा थीम होता 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' . या विषयावर आधारित पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत एस एस एन जे महाविद्यालयातील एनसीसी युनिटने सहभागी होऊन द्वितीय क्रमांकाचे चषक पटकावले. कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सार्जंट सोमेश्वर पोराटे, तेजस वाघाडे, राम देशमुख, वंशिका एकूणकर, अंजली गढवेकर, आर्यन शिवरकर, राज पाटील, मयुरी वानखेडे, आकांक्षा थुल, कोमल शिवरकर व यामिनी पारधी यांनी 'नशा मुक्त युवा ' ही बोलकी नाटिका प्रस्तुत करून प्रेक्षकांची दाद मिळवली. सदर एनसीसी कलाकारांना जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, जिल्हा गाईड संघटक मंजुषा जाधव व क्रीडा अधिकाऱ्यांनी यावर्षीचा द्वितीय चषक प्रदान करून त्यांचे अभिनंदन केले.

चांदीचा ऐवज लंपास

वर्धा- दुकानाचे शटर वाकवून आत प्रवेश करीत अज्ञात चोरट्यांनी चांदीच्या वस्तूंसह एकूण १६ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना आंजी (मोठी) येथील बाजार चौकातील प्रज्वल ज्वेलर्समध्ये घडली. दुकानमालक राजेश मधुकरराव यांनी खरांगणा पोलिसांत तक्रार दाखल केली.राजेश यांनी ३० ऑक्टोबर रोजी रात्री ७.३० वाजता दुकान बंद केले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता दुकानाचे शटर वाकविल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी दुकानातील ड्रॉवरमधील ७० ग्रॅम चांदी, चांदी पॉलिशचे ४० पत्रे तसेच अन्य साहित्य असा एकूण १६ हजार ५०० रुपयांचा माल चोरला. विशेष म्हणजे दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या वायरही तोडण्यात आल्या. याप्रकरणी खरांगणा पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.



ग्राहक हितांच्या लढ्याला आर्वीत नवे नेतृत्व

अ.भा. ग्राहक पंचायतच्या अध्यक्षपदी सुनील पारसे, सचिवपदी प्रवीण सरोदे

आर्वी/जनमाध्यम

ग्राहकांचे हक्क, हित आणि संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या आर्वी तालुका शाखेची नवीन कार्यकारिणी नुकतीच घोषित करण्यात आली. आर्वी येथील पारसे भवन येथे पार पडलेल्या जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत अध्यक्षपदी सुनील पारसे, तर सचिवपदी प्रवीण सरोदे यांची निवड करण्यात आली. रोजगार आयाम प्रांतप्रमुख अनिल मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष सतीश देशमुख यांनी ही निवड जाहीर केली. यावेळी जिल्हा सहसचिव आकाश दाते, मार्गदर्शक अनिल जोशी, विनायक पोतदार, डॉ. प्रसन्न बंब आणि सुरेंद्र पारसे उपस्थित होते.नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सुरेश काकडे व राम मोहदेकर, सहसचिवपदी सतीश शिरभाते, कोषाध्यक्षपदी सुनील भस्मे, विधी सल्लागारपदी सनी मूलचंदानी यांची निवड करण्यात आली. तसेच विविध आयामांच्या प्रमुखांसह महिला आघाडीची जबाबदारीही निश्चित करण्यात आली.ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सर्व पदाधिकारी एकजुटीने कार्य करतील, असा विश्वास नवनियुक्त अध्यक्ष सुनील पारसे यांनी व्यक्त केला. आभार डॉ. प्रसन्न बंब यांनी मानले.

भरधाव दुचाकीची सात वर्षीय चिमुरडीला धडक

वर्धा- घरासमोर खेळणाऱ्या सात वर्षीय चिमुरडीला भरधाव दुचाकीने धडक दिल्याने ती गंभीर जखमी झाली. अपघातानंतर दुचाकीचालकाने काही वेळ थांबून पाहणी केली आणि तेथून पळ काढला. ही घटना ३० ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास सेलू तालुक्यातील पळसगाव येथे घडली. नायरा राऊत असे जखमी चिमुरडीचे नाव आहे. नायरा घरासमोर खेळत असताना भरधाव आलेल्या दुचाकीने तिला धडक दिली.

नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर S2871848 kejer} ceePes MINHAZ MOHAMMAD YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील MINHAZ YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता:वॉर्ड नं ४ शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ४४५१०३

नावात बदल

माझे पूर्वी SAIRU BANU MOHAMMAD YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील SAYARABANO YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता : वॉर्ड नं ४ शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३

नावात बदल

माझे पूर्वी MOHAMMAD YUSUF NOOR MOHAMMAD NAGANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील YUSUF NOORMOHAMMAD NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता:- शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३

पोलीस मुख्यालय ठरले जिल्ह्याचे 'जनरल चॅम्पियन'

चंद्रकांत वाघ आणि प्रतीक्षा वरडोले सर्वोत्कृष्ट खेळाडू, तीन दिवस रंगला पोलीस दलाचा क्रीडा महोत्सव

वर्धा/जनमाध्यम

वर्धा जिल्हा पोलीस दलाच्या वार्षिक जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये पोलीस मुख्यालय वर्धा संघाने सर्वच आघाड्यांवर दमदार कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद अर्थात 'जनरल चॅम्पियनशिप' पटकावली. २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान पार पडलेल्या या तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. स्पर्धेत वर्धा विभागाचे पोलीस अंमलदार चंद्रकांत वाघ यांनी पुरुष गटातून, तर पोलीस मुख्यालयातील प्रतीक्षा वरडोले यांनी महिला गटातून सर्वोत्कृष्ट खेळाडूचा बहुमान मिळवला.

पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदारांच्या अंगी असलेल्या क्रीडागुणांना वाव मिळावा, शारीरिक क्षमता आणि सांघिक भावना वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील विविध पोलीस विभागांतील एकूण १६० खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवत आपले क्रीडा कौशल्य पणाला लावले. तीन दिवस विविध क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेत चुरशीच्या लढती रंगवल्या.

स्पर्धेतील सातत्यपूर्ण आणि



पोलीस मुख्यालय वर्धा संघाने सर्वसाधारण विजेतेपदावर आपले नाव कोरले. वैयक्तिक कामगिरीत चंद्रकांत वाघ आणि प्रतीक्षा वरडोले यांनी सर्वोत्तम खेळाडूचा सन्मान मळिवत स्पर्धेचे आकर्षण ठरले.समारोप व बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त एनआयएस क्रीडा मार्गदर्शक इंद्रदेव शर्मा उपस्थित जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल होते.

अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलीस दलातील सुमारे ५० वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणारे खेळाडू, पंच आणि आयोजन समितीचे पोलीस आपले कौशल्य दाखविण्यासोबतच एकत्रित येण्याची संधी मिळाली.

आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकलेल्या गुणवंतांचा सन्मान क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर वर्धा जिल्ह्याचा तसेच देशाचा गौरव वाढविणाऱ्या गुणवंत खेळाडूंचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डर सुनैना डोंगरे आणि आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल प्रशिक्षक पंकज टकोने यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

विदर्भात सहा दिवसांत दहा शेतकऱ्यांच्या आत्महत्या

मृत्यूचे तांडव थांबवण्यासाठी आता समाजानेच पुढे यावे-किशोर तिवारी

यवतमाळ-विदर्भातील दुष्काळ, नापिकी, वाढता कर्जबोजा, शेतमालाच्या कोसळणाऱ्या किमती आणि शेतकरी आत्महत्यांच्या गंभीर पार्श्वभूमीवर विदर्भ जनआंदोलन समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे माजी अध्यक्ष किशोर तिवारी यांनी आज महाराष्ट्रातील सरकार, विरोधी पक्ष, प्रशासन, उद्योगविश्व आणि संपूर्ण नागरी समाजाला अंतर्मुख करणारे आवाहन केले आहे.'आता शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर श्रद्धांजली वाहण्यापेक्षा जिवंत शेतकऱ्यांना जगण्यासाठी आधार देणे महत्त्वाचे आहे. सरकारवर टीका करून, विरोधकांवर आरोप करून किंवा आणखी समित्या स्थापन करून हे संकट संपणार नाही. शेतकऱ्यांच्या दारात प्रत्यक्ष मदत पोहोचविण्याची वेळ आली आहे,' असे तिवारी यांनी म्हटले आहे.

मागील सहा दिवसांत विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये दहा शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती स्थानिक कार्यकर्त्यांकडून प्राप्त झाली आहे.१. सदानंद रामटेके — रा. कोठा, जिल्हा यवतमाळ.२. सचिन रामटेके — रा. तळेगाव, जिल्हा अमरावती.३. जगजीवन डोंगरे — रा. फुलसावंगी, जिल्हा यवतमाळ.४. अजय शेंडे — रा. भाडुंब्री, जिल्हा यवतमाळ.५. अशोक खरुले — रा. शिंदोला, जिल्हा अमरावती.६. प्रशांत खामनकर — रा. नवेगाव, जिल्हा चंद्रपूर.७. संदीप गव्हाणे — रा. निलत, जिल्हा भंडारा.८. आनंद माळी — रा. उरळ, जिल्हा अकोला.९. मनोज तोडसाम — रा. महाडोळी, जिल्हा यवतमाळ.१०. प्रल्हाद गारुळे — रा. सावरगाव, जिल्हा यवतमाळ./यांचा समावेश आहे. या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील पाच, अमरावतीतील दोन आणि चंद्रपूर, भंडारा व अकोला जिल्ह्यांतील प्रत्येकी एका शेतकऱ्याचा समावेश आहे. यांपैकी काही मृत्यूंचे वृत्त प्रकाशित झाले असून सर्व दहा प्रकरणांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी, मृत्यूच्या परिस्थितीची चौकशी आणि संबंधित कुटुंबांच्या आर्थिक स्थितीचे मूल्यांकन तातडीने करण्यात यावे.'ही दहा नावे म्हणजे केवळ दहा मृत्यू नाहीत. दहा कुटुंबांची उद्ध्वस्त झालेली स्वप्ने, दहा घरांतील हरवलेला आधार आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक व्यवस्थेला पडलेले दहा गंभीर प्रश्न आहेत.'

महाराष्ट्रातील ३०५ तालुके दुष्काळाच्या विळख्यात

महाराष्ट्र शासनाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी खरीप हंगामासाठी ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला. हे राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी सुमारे ८५ टक्के तालुके आहेत.यानंतर २७ ऑक्टोबरच्या मंत्रिमंडळ निर्णयानुसार ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पीकनुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम मदत देण्यासाठी ७,५०० कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली.

या मदतीचा लाभ सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना अपेक्षित असल्याचे शासनाने सांगितले आहे. विदर्भातील १०८ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश आहे.कापूस, सोयाबीन, तूर आणि इतर खरीप पिकांवर दुष्काळाचा गंभीर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी दुबार-तिबार पेरणी, वाढता



उत्पादनखर्च, घटलेले उत्पन्न, बँकांचे कर्ज, खासगी सावकारी आणि सूक्ष्मवित्त कंपन्यांच्या वसुलीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात आहे.राज्यातील प्रत्यक्ष पीकनुकसान, बाधित क्षेत्र आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान यांचा अंतिम संपूर्ण हिशेब जनतेसमोर यायला हवा.'सरकारने पाच हजार रुपये मंजूर केले, ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र पाच हजार रुपयांत उद्ध्वस्त शेती उभी राहत नाही. घोषणा आणि प्रत्यक्ष मदत यात अंतर राहता कामा नये,' असे तिवारी म्हणाले.

साडेचार वर्षांत १३ हजारांहून अधिक शेतकरी आत्महत्या; आता तरी व्यवस्था जागी होणार का?

माहिती अधिकारातून उपलब्ध झालेल्या राज्य शासनाच्या आकडेवारीनुसार जानेवारी २०२२ ते जून २०२६ या कालावधीत महाराष्ट्रात १३,१२८ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे.त्यापैकी ८,१४५ प्रकरणे आर्थिक मदतीस पात्र ठरली, ४,०४२ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आणि ९४१ प्रकरणे चौकशीअंतर्गत होती. पात्र ठरलेल्या कुटुंबांपैकीही २९५ कुटुंबांना संबंधित कालावधीपर्यंत मदत मिळालेली नव्हती.'शेतकरी जिवंत असताना कर्जमाफीसाठी वाट पाहतो आणि मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबाला मदतीच्या पात्रतेसाठी वाट पाहावी लागते, ही परिस्थिती बदलली पाहिजे.'शेतकरी आत्महत्या ही केवळ आर्थिक मदतीची बाब नाही. कर्ज, नापिकी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आरोग्य, सामाजिक एकाकीपणा आणि मानसिक ताण यांचा एकत्रित विचार करून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या लागतील.तिवारी यांनी डॉक्टर, अभियंते, वकील, उद्योगपती, व्यापारी, दुकानदार, शिक्षक, शासकीय व खासगी कर्मचारी, निवृत्त अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, तरुण आणि संवेदनशील नागरिकांना गावागावांत प्रत्यक्ष मदतकार्य सुरू करण्याचे आवाहन केले.

१. शेतकरी व शेतमजुरांना जगण्यासाठी थेट आर्थिक मदत-गरजू कुटुंबांना अन्नधान्य, औषधे, मुलांचे शिक्षण, जनावरांचा चारा, घरखर्च आणि पुढील पेरणीसाठी आवश्यक साहित्य यांची मदत द्यावी. मदत देताना कुटुंबाचा सन्मान, गोपनीयता आणि स्वावलंबन जपावे.

२. शेततळी, जलयुक्त शिवार आणि जलसंधारण-लोकसहभागातून शेततळी, पाणलोट क्षेत्र विकास, बंधारे, नाला पुनरुज्जीवन, पाणी अडविणे व जमिनीत मुरविणे अशा कामांना तांत्रिक व आर्थिक मदत करावी. आवश्यक परवानग्या आणि पर्यावरणीय निकष पाळावेत.

३. जमिनीचे संवर्धन आणि सुपीकता वाढविणे-मृदसंधारण, माती परीक्षण, सेंद्रिय कर्बवाढ, बांधबंदिस्ती, जमिनीची धूप रोखणे आणि जमिनीची उत्पादनक्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी कृषितज्ज्ञ व अभियंत्यांनी गावात काम करावे.

४. पीकपद्धती बदलण्यासाठी विशेष मोहीम-कापूस आणि सोयाबीनवरील अवलंबित्व कमी करण्याच्या पर्यायांचा अभ्यास करून मिश्रपीक, आंतरपीक, कडधान्ये, भरडधान्ये, कमी पाण्यात येणारी पिके आणि शेतीपूरक व्यवसाय यांचा प्रसार करावा. स्थानिक पाणी, जमीन, बाजारपेठ आणि शेतकऱ्यांच्या निवडीचा आदर करावा.

५. शिक्षण, आरोग्य आणि समुपदेशन-डॉक्टरांनी ग्रामीण आरोग्य शिबिरे घ्यावीत. शिक्षकांनी गरजू मुलांचे शिक्षण खंडित होणार नाही यासाठी मदत करावी. प्रशिक्षित समुपदेशकांनी आर्थिक तणावाखालील कुटुंबांना गोपनीय मानसिक आधार द्यावा. आवश्यकतेनुसार व्यावसायिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

६. जी.ओ. आणि एन.जी.ओ.च्या मदतकार्याचा पारदर्शक हिशेब-शासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या मदतकार्याचे स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण व्हावे. निधीचा अपव्यय, कमिशनखोरी किंवा लाभार्थ्यांच्या नावाने गैरव्यवहार होऊ नयेत.'जी.ओ. असो किंवा एन.जी.ओ. यांना सोडा - पैसा संस्थेच्या प्रसिद्धीसाठी नव्हे, तर संकटग्रस्त शेतकऱ्याच्या मदतीसाठी खर्च झाला पाहिजे.'लोकसहभागातून थेट मदत, खर्चाची नोंद आणि लाभार्थ्यांच्या संमतीने पडताळणी यांना प्राधान्य द्यावे.



७. ग्रामीण रोजगारनिर्मिती-अन्नप्रक्रिया, कापूस व सोयाबीन मूल्यवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुपालन, शिवणकाम, दुरुस्ती सेवा, संगणक प्रशिक्षण, ग्रामीण लघुउद्योग आणि महिलांसाठी उत्पन्नवाढीच्या संधी निर्माण कराव्यात. उद्योगविश्वाने प्रशिक्षण, रोजगार आणि बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.

८. व्यसनमुक्ती आणि कौटुंबिक आधार-दारू व इतर व्यसनांमुळे निर्माण होणारा आर्थिक आणि कौटुंबिक ताण कमी करण्यासाठी स्वेच्छाधारित व्यसनमुक्ती कार्यक्रम, उपचार आणि कुटुंब समुपदेशन उपलब्ध करून द्यावे.

९. संवादातून समाधान-गावातील शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यात संवाद वाढवावा. आर्थिक संकट, कर्ज, रोजगार, आरोग्य आणि कौटुंबिक अडचणींवर मदत मागण्यासाठी विश्वासाचे वातावरण निर्माण करावे.१०. समित्या नकोत; थेट मदत हवी

चांदूर रेल्वेच्या विकासासाठी केंद्रीय मंत्र्यांना निवेदन



चांदूर रेल्वे/वार्ताहर

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. ना. श्री. नितीनजी गडकरी यांची सदिच्छा भेट घेऊन भाजप विधी आघाडी, चांदूर रेल्वेच्या वतीने परिसरातील विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांकडे त्यांचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी भाजप विधी आघाडीचे अध्यक्ष ॲड. विशाल भोयर यांनी नागरिकांच्या न्यायहक्कांचे संरक्षण, मोफत कायदेविषयक मार्गदर्शन केंद्राची स्थापना तसेच चांदूर रेल्वे परिसरातील रस्ते आणि पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले. सर्वसामान्य नागरिकांना अनेकदा कायदेशीर प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्यामुळे त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेता नागरिकांना मोफत कायदेविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देणारे केंद्र स्थापन करण्याची आवश्यकता निवेदनातून मांडण्यात आली. तसेच संरक्षण व्हावे आणि कायद्याविषयी जनजागृती निर्माण व्हावी, यावरही भर देण्यात आला.यासोबतच चांदूर रेल्वे शहर व परिसरातील रस्त्यांची सुधारणा, आवश्यक पायाभूत सुविधा आणि विकासकामांना गती मिळावी, यासाठीही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे लक्ष वेधण्यात आले.न्याय, जनसेवा आणि विकास या त्रिसूत्रीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासनदरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजप विधी आघाडी, चांदूर रेल्वेच्या वतीने हा पुढाकार घेण्यात आला आहे.याप्रसंगी ॲड. विशाल भोयर यांनी नागरिकांच्या हितासाठी आणि चांदूर रेल्वेच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

रेशनमधून 'आनंदाचा शिधा' गायब

दुष्काळ आणि महागाईच्या दुहेरी संकटात सर्वसामान्यांची आर्थिक कोंडी

अंजनगाव बारी/वार्ताहर

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा आणि गोडधोडाचा सण! मात्र, आर्थिक परिस्थिती हलाखीची असलेल्या गरीब कुटुंबांच्या दिवाळीवर यंदा निराशेचे सावट दिसत आहे. दिवाळीच्या काळात रेशन दुकानांतून मिळणारा 'आनंदाचा शिधा' उपलब्ध नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे दुष्काळामुळे उत्पन्न घटले, तर दुसरीकडे महागाईने घरखर्च वाढवला. अशा दुहेरी संकटात सापडलेल्या सर्वसामान्य कुटुंबांना शासनाकडून



मिळणाऱ्या मदतीची अपेक्षा असताना शिधा मिळत नसल्याने त्यांचा हिरमोड झाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या 'आनंदाचा शिधा' योजनेंतर्गत यापूर्वी दिवाळी व गुढीपाडव्यासारख्या सणांच्या निमित्ताने पात्र शिधापत्रिकाधारकांना केवळ १०० रुपयांत चार जीवनावश्यक वस्तूंचे किट दिले जात होते. यामध्ये १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल किंवा खाद्यतेलाचा समावेश होता. अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब गटातील पात्र लाभार्थी तसेच शासनाने पात्र ठरविलेल्या काही भागांतील शेतकरी कार्डधारकांना रास्त भाव धान्य दुकानांमार्फत या योजनेचा लाभ मिळत होता. मात्र, यंदा दिवाळीच्या काळात हा शिधा उपलब्ध नसल्याने गरजू कुटुंबांना सवलतीच्या दरात मिळणाऱ्या या मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर 'आनंदाचा शिधा' मिळेल, या अपेक्षेने लाभार्थी वाट पाहत असताना रेशन दुकानांत तो उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. ही योजना बंद झाली आहे की यंदा तिची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, याबाबत शासन आणि संबंधित प्रशासनाने स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे. तसेच, गरजू लाभार्थ्यांसाठी पर्यायी मदतीची व्यवस्था असल्यास त्याबाबतही माहिती जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अ.भा.ग्राहक पंचायतीची तालुका शाखा सभा

चांदूर रेल्वे/वार्ताहर

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या तालुका शाखेची सभा जिल्हाध्यक्ष अशोक हांडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. या सभेत ग्राहकांच्या विविध तक्रारी ऐकून घेण्यात आल्या. तसेच संबंधित समस्यांवर कायदेशीर मार्गदर्शन व आवश्यक सूचना करण्यात आल्या.ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी, ग्राहकांची होणारी फसवणूक रोखता यावी आणि त्यांच्या



तक्रारींचे कायदेशीर मार्गाने निराकरण व्हावे, या दृष्टीने सभेत चर्चा करण्यात आली. यावेळी प्राध्यापक डॉ. संतोष सदार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सभेला तालुकाध्यक्ष प्रदीप लाकडे, पत्रकार मंगेश बोबडे, ॲड. विशाल भोयर, शेखर पुतळे, ओमकार लादे, जितेंद्र गोरे,दिगंबराव डूबे, प्रल्हाद उमप, दिलीप राऊत यांच्यासह अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते उपस्थित होते. ग्राहकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, तसेच ग्राहकांचे हक्क आणि हितसंबंध जपण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे कार्य करण्याबाबत यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

रंगांमधील वाद सोडा; पहिले बळीराजाला जगवा-प्रबोधनकार सत्यपाल महाराज!

गुरुकुंज मोझरी येथे सप्तखंजेरी प्रबोधनातून एकतेचा जागर



गुरुकुंज मोझरी/वार्ताहर

शेतकऱ्यांच्या कष्टातूनच देशाच्या अन्नव्यवस्थेला बळ मिळते. एका दाण्यापासून हजारो दाणे निर्माण करण्याचे सामर्थ्य शेतकऱ्याच्या कष्टकरी हातात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांचे जीवनमान आणि ग्रामविकास यांना प्राधान्य मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी केले.

गुरुकुंज मोझरी येथील श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुलात राष्ट्रसंत वंदनीय तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या समारोपप्रसंगी सत्यपाल महाराज आणि त्यांच्या पाल मंडळींनी सप्तखंजेरीच्या माध्यमातून प्रभावी प्रबोधनात्मक कीर्तन सादर केले.यावेळी आपल्या कीर्तनातून त्यांनी शेतकरी कल्याण, ग्रामविकास, सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार प्रत्यक्ष ग्रामसभेपर्यंत पोहोचवून गावाच्या विकासात लोकसहभाग वाढविण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.सप्तखंजेरीच्या तालावर सादर झालेल्या विनोदी, वैचारिक आणि प्रबोधनात्मक शैलीतील कार्यक्रमातून उपस्थितांना सामाजिक परिवर्तनाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाला भाविक, गुरुदेवभक्त आणि नागरिकांची उपस्थिती होती.

मेळघाटातील अंगणवाड्यांच्या दुरुस्ती कामांवर देखरेख आवश्यक

मेळघाट/वार्ताहर

निधीच्या वापराचा तपशील स्पष्ट करण्याची मागणी

मेळघाटातील आदिवासी आणि दुर्गम भागांमध्ये अंगणवाडी केंद्रांच्या इमारतींची देखभाल, मूलभूत सुविधांची उपलब्धता आणि शासकीय निधीचा योग्य विनियोग या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. बालकांचे पोषण, पूर्वप्राथमिक शिक्षण आणि माता-बालकांशी संबंधित सेवा पुरविणाऱ्या अंगणवाड्यांची स्थिती सुधारण्यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र, निधी मंजूर झाल्यानंतर त्यातून कोणती कामे केली जातात, त्यांचा दर्जा कसा राखला जातो आणि खर्चाची पडताळणी कोणत्या पद्धतीने होते, याबाबतही स्पष्टता असणे तितकेच गरजेचे आहे.

धारणी आणि चिखलदरा तालुक्यांतील ८० अंगणवाडी केंद्रांच्या दुरुस्तीसाठी सुमारे दोन कोटी रुपयांच्या निधीच्या मंजुरीशी संबंधित विषयामुळे या कामांच्या नियोजनाकडे लक्ष वेधले जात आहे. संबंधित केंद्रांची प्रत्यक्ष अवस्था, दुरुस्तीची आवश्यकता आणि उपलब्ध सुविधांचा विचार करून कामांची आखणी झाली आहे का, याची माहिती समोर येणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक केंद्राच्या गरजा वेगवेगळ्या असू शकतात. त्यामुळे सर्व ठिकाणी एकसारखी कामे निश्चित करण्याऐवजी प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे प्राधान्यक्रम ठरविणे आवश्यक आहे.

अंगणवाडी केंद्रांमधून लहान मुलांना पोषणविषयक सेवा, प्राथमिक शिक्षणाची ओळख आणि देखभालीशी संबंधित सुविधा मिळतात. या सेवांसाठी सुरक्षित इमारत, स्वच्छ परिसर, पिण्याचे पाणी आणि आवश्यक मूलभूत सोयी उपलब्ध असणे गरजेचे आहे. इमारतीची दुरवस्था किंवा सुविधांमधील त्रुटी असल्यास त्यांची नोंद घेऊन वेळेत सुधारणा करणे संबंधित यंत्रणेचे कर्तव्य आहे. विशेषतः दुर्गम गावांमधील केंद्रांकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी नियमित तपासणीची प्रभावी व्यवस्था असणे आवश्यक आहे.

दुरुस्तीच्या कामांसाठी निधी मंजूर करताना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक अंदाजपत्रक आणि कामाच्या स्वरूपाची निश्चिती यांना महत्त्व असते. त्यानंतर निविदा प्रक्रिया, कंत्राटदारांची निवड, कामाचे आदेश आणि देयकांची पूर्तता या टप्प्यांवर नियमानुसार कार्यवाही झाली पाहिजे. सार्वजनिक निधीच्या वापराशी संबंधित कागदपत्रे व्यवस्थित ठेवणे आणि आवश्यक माहिती नियमानुसार उपलब्ध करून देणे यामुळे योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करणे शक्य होते.निविदा प्रक्रियेत पारदर्शकता राखणे हा या संपूर्ण व्यवस्थेतील महत्त्वाचा भाग आहे. ज्या कामांसाठी ई-निविदा प्रक्रिया बंधनकारक आहे, तेथे संबंधित नियमांचे पालन झाले पाहिजे. पात्र कंत्राटदारांना समान संधी मिळाली का, कामासाठी निश्चित केलेले निकष



पाळले गेले का आणि कंत्राट देताना आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाली का, याची पडताळणी होणे गरजेचे आहे. प्रक्रियेत त्रुटी आढळल्यास त्यामागील कारणे तपासली पाहिजेत. मात्र, अधिकृत कागदपत्रांद्वारे खात्री होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीवर किंवा संस्थेवर गैरव्यवहाराचा ठपका ठेवणे योग्य ठरणार नाही.

दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांची गुणवत्ता तपासणेही तितकेच आवश्यक आहे. केवळ काम पूर्ण झाल्याची नोंद किंवा खर्चाची बिले उपलब्ध असणे पुरेसे नाही. प्रत्यक्ष इमारतीची पाहणी करून मंजूर आराखड्यानुसार काम झाले आहे का, वापरलेले साहित्य योग्य आहे का आणि इमारत सुरक्षित वापरासाठी योग्य स्थितीत आहे का, याची खात्री करणे गरजेचे आहे. तांत्रिक तपासणी आणि संरचनात्मक परीक्षणाच्या माध्यमातून इमारतीची स्थिती अधिक स्पष्टपणे समजू शकते.यासोबतच सामाजिक अंकेक्षणालाही महत्त्व दिले पाहिजे. अंगणवाडी कर्मचारी, पालक आणि स्थानिक नागरिकांकडून मिळणारी माहिती केंद्रांच्या प्रत्यक्ष परिस्थितीचे चित्र स्पष्ट करू शकते. कोणत्या सुविधा उपलब्ध नाहीत, कोणत्या कामांची तातडीने गरज आहे आणि दुरुस्तीनंतर अपेक्षित बदल झाले आहेत का, याचा आढावा या प्रक्रियेत घेता येतो. त्यामुळे सामाजिक अंकेक्षण केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष परिस्थितीशी जोडले गेले पाहिजे.

मेळघाटातील भौगोलिक परिस्थिती आणि अनेक गावांपर्यंत पोहोचण्यातील अडचणी लक्षात घेता, तपासणीचे नियोजन विशेष काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. दुर्गम भागातील अंगणवाडी केंद्रांची पाहणी नियमितपणे व्हावी आणि गरजेनुसार दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण केली जावीत. काम सुरू असताना बालकांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे तसेच अंगणवाडीच्या सेवा शक्य तितक्या सुरळीत ठेवणेही महत्त्वाचे आहे.संबंधित विभागाने ८० केंद्रांच्या योजनेबाबत केंद्रनिहाय माहिती उपलब्ध करून देण्याची गरज आहे. मंजूर निधी, प्रस्तावित कामे, निविदा प्रक्रियेची स्थिती, कंत्राटदारांना देण्यात आलेले कार्यादेश, खर्चाचा तपशील आणि गुणवत्ता तपासणीचे निष्कर्ष यांची माहिती नियमानुसार सार्वजनिक झाल्यास नागरिकांना योजनेच्या प्रगतीचे आकलन करता येईल. तसेच तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांची निष्पक्ष चौकशी करण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. या प्रकरणातील प्रश्नांची उत्तरे केवळ चर्चेतून मिळणार नाहीत; त्यासाठी प्रत्यक्ष पाहणी, कागदपत्रांची पडताळणी आणि पारदर्शक प्रशासकीय कार्यवाही आवश्यक आहे. कामांमध्ये नियमभंग, निष्काळजीपणा किंवा निधीच्या अयोग्य वापराचे पुरावे आढळल्यास संबंधित जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई केली पाहिजे. दुसरीकडे, सर्व कामे नियम आणि गुणवत्ता निकषांनुसार झाली असल्यास त्याची माहितीही अधिकृत नोंदींच्या आधारे स्पष्ट झाली पाहिजे.मेळघाटातील बालकांना सुरक्षित आणि सुविधायुक्त अंगणवाडी केंद्रे मिळणे ही बालविकासाशी संबंधित मूलभूत गरज आहे. सुमारे दोन कोटी रुपयांच्या दुरुस्ती योजनेचा अपेक्षित लाभ प्रत्यक्ष केंद्रांपर्यंत पोहोचतो आहे का, हे तपासण्यासाठी नियमित देखरेख, तांत्रिक परीक्षण, सामाजिक अंकेक्षण आणि आर्थिक पारदर्शकता यांची सांगड घालणे आवश्यक आहे. संबंधित प्रशासनाने या बाबींवर लक्ष केंद्रित करून योजनेच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट माहिती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

पीडब्ल्यूडीच्या कंत्राटदारांना आता मनपाच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार

-डीपीसी सदस्य सुनील खराटे यांच्या पाठपुराव्याला यश

-पालकमंत्री बावनकुळे यांच्या निर्देशावरून आयुक्तांनी जारी केले पत्र

अमरावती/प्रतिनिधीः- सार्वजनिक बांधकाम विभागातील (पीडब्लूडी) नोंदणीकृत आणि अनुभवी असलेल्या कंत्राटदारांना अमरावती महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांच्या निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यास अखेर मंजुरी मिळाली आहे. डीपीसी सदस्य सुनील खराटे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, अमरावती मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी यासंदर्भातील अधिकृत पत्र निर्गमित केले आहे. या निर्णयामुळे अमरावतीमधील कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. सद्यस्थितीत अमरावती महानगर☞(पान २ वर)





मोठा दिलासा देणारा निर्णय-

'सार्वजनिक बांधकाम विभागात आधीच नोंदणीकृत आणि अनुभवी असलेल्या आपल्या कंत्राटदारांना मनपाच्या स्वतंत्र नोंदणी प्रक्रियेमुळे विनाकारण नाहक त्रास सहन करावा लागत होता. त्यांची तीच वेळखाऊ आणि अनावश्यक कंत्राट नोंदणी प्रक्रिया रद्द करून त्यांना मनपाच्या निविदा प्रक्रियेत थेट सामावून घेण्यात यावे, यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या सभेत पालकमंत्री बावनकुळे यांच्या समक्ष ही बाब उपस्थित करून त्यांचे लक्ष याकडे वेधले. पालकमंत्र्यांच्या आदेशावरून मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी घेतलेला हा निर्णय अमरावतीमधील सर्व कंत्राटदारांसाठी मोठा दिलासा देणारा ठरला आहे. या निर्णयामुळे आता पीडब्ल्यूडीच्या कंत्राटदारांनाही शहरातील विविध पायाभूत विकासाच्या कामांमध्ये पारदर्शकपणे आणि आत्मविश्वासाने सहभाग घेता येईल. यामुळे शहराच्या विकासाला अधिक गती मिळेल, यात शंका नाही. **-सुनील खराटे,डीपीसी सदस्य**

मोटर सायकलवरील इसमाला भरधाव कारची धडक

जागीच मृत्यू, मोर्शी-वरुड मार्गावरील घटना

मोर्शी/प्रतिनिधीः- मोर्शी ते वरुड रस्त्यावर असलेल्या सावजी बार समोर आपल्या मोटर सायकलवर बसून असलेल्या इसमाला भरधाव येणाऱ्या कारने धडक दिली. या अपघातात त्या व्यक्तीचा रविवारी (दि.१) जागीच मृत्यू झाला. मृतक इसमाचे नाव बाबाराव विठोबाजी पोट पिटे (वय ५९ रा.दापोरी) असे आहे.

मोर्शी येथून जवळच असलेल्या दापोरी येथील बाबाराव विठोबाजी पोटपिटे हे आपली मोटरसायकल वाहन क्र. एम एच ३१ बी एन ३५८५ ने आपली पत्नी व नातीला घेऊन वरुड मार्गे हिवरखेड वरून आपल्या गावी दापोरी येथे येत असतांना हिवरखेड जवळील सावजी बार समोर त्यांची पत्नी व नात लघुशंकेकरिता गाडीवरून उतरून साईडला गेल्या. त्यावेळी बाबाराव हे आपल्या गाडीवर बसून होते.दरम्यान ओझाराम सिरसाम (वय ५१ वर्ष रा. रोहना तालुका मुलताई जिल्हा बैतुल) हा आपल्या कार क्र.एम एच २७ व्हीसी ६४ ०३ ने वरुड मार्गे मोर्शीकडे भरधाव वेगाने येऊन उभ्या असलेल्या मोटर सायकल वाहनाला जबर धडक दिली. त्यामुळे ☞(पान २ वर)





पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज अमरावतीत

अमरावती/प्रतिनिधीः- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, बावनकुळे हे दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अमरावती महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या आधुनिक स्वच्छता यंत्रसामग्री व वाहनांचे लोकार्पण करणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात दुपारी १२.१५ वाजता ग्रामीण व शहरी भागातील पाणी टंचाईबाबत आढावा बैठक घेतील.

दुपारी ४ वाजता महाऊर्जाची आढावा बैठक घेतील. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता निराधार फासेपारधी संस्था व श्री पिंगळादेवी संस्था जागेच्या मागणीसंदर्भात बैठक घेतील.

सायंकाळी ६ वाजता निंभोरा खुर्द येथील स्कुल ऑफ स्कॉलर्स येथे नवीन धनुर्विद्या मैदान व स्विमिंग पूलच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहतील. तसेच सायंकाळी ६.३० वाजता साईनगर येथे आशियाई क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीतील सुवर्णपदक विजेत्या कुमकुम मोहोड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देतील.

दापोरी, वाघोली आणि घोडदेव येथे प्रत्येकी चार हेक्टरवर चारा लागवड

चारा लागवडीमुळे पशुपालकांना दिलासा मिळणार

-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

अमरावती/प्रतिनिधीः- दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांना चारा कमी पडू नये यासाठी गाळपेर जमिनीवर चारा लागवडीचे जिल्ह्यात नियोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी दोन महिन्यात चारा तयार होणार आहे. यामुळे पशुपालकांना दिलासा मिळण्यास मदत मिळणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी आज मोर्शी उपविभागातील दापोरी, वाघोली, घोडदेव येथील



गाळपेर जमिनीवर लागवड करण्यात आलेल्या चाऱ्याची पाहणी केली. यावेळी उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वल्लभ जोशी, गटविकास अधिकारी स्वप्निल मकदुम उपस्थित होते. मोर्शी उपविभागात पहिल्या टप्प्यात अप्पर वर्धा धरणाच्या दापोरी, वाघोली आणि घोडदेव येथे प्रत्येकी चार हेक्टरवर चारा लागवड करण्यात आली आहे. चाराटंचाईच्या अनुषंगाने तलावातून चारा लागवडीसाठी जमीन उपलब्ध करण्यात आली आहे. त्यानुसार☞(पान २ वर)

मंदिरांच्या शेती नुकसानीची भरपाई मिळावी

-महाराष्ट्र देवस्थान समितीची मागणी



अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्रातील मंदिरांच्या आर्थिक स्वावलंबनाचा आणि मंदिरांच्या मालकीच्या शेतीचा प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

महाराष्ट्रात प्रथमच मंदिरांच्या शेतीचा प्रश्न व्यापक स्तरावर शासनदरबारी मांडण्याचा पुढाकार महाराष्ट्र देवस्थान समितीने घेतला आहे. विशेषतः दुष्काळग्रस्त भागातील मंदिरांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, या नुकसानीची योग्य भरपाई संबंधित मंदिरांना मिळावी, अशी मागणी समितीच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात दिनांक ५ जून २०२६ रोजी ☞(पान २ वर)

सात गुन्ह्यांचा आरोपी कालूवर एमपीडीए

-मध्यवर्ती कारागृहात रवानगी

अमरावती/प्रतिनिधीः- खून, कट रचणे, पुरावा नष्ट करणे यांसह विविध गंभीर स्वरूपाचे सात गुन्हे दाखल असलेल्या शहरातील कुख्यात गुन्हेगार शेख नदीम उर्फ कालू शेख नबी (वय २८, रा. सतीनगर, वलगाव) याच्याविरुद्ध पोलिसांनी एमपीडीए अंतर्गत कारवाई केली आहे.



पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी ३१ ऑक्टोबर रोजी स्थानबद्धतेचे आदेश जारी केले. त्यानंतर कालू याला ताब्यात घेऊन स्थानबद्धतेच्या कालावधीसाठी अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख नदीम उर्फ कालू हा २०२४ पासून गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय आहे. त्याच्याविरुद्ध वलगाव, अमरावती शहर तसेच मोर्शी, अमरावती ग्रामीण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत खून, खुनाचा कट रचणे, खुनाचा पुरावा नष्ट करणे, सामाईक इरादा, दुखापत करणे, अश्लील कृत्य करणे, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे, जीवे मारण्याची अथवा गंभीर दुखापत करण्याची धमकी देणे, हल्ला करणे, अवैध शस्त्र बाळगणे तसेच हद्दपार आदेश व अधिसूचनांचे उल्लंघन करणे अशा गंभीर स्वरूपाचे एकूण सात गुन्हे दाखल आहेत. त्याच्याविरुद्ध यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तसेच त्याला हद्दपारही करण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही त्याच्या गुन्हेगारी कारवाया सुरूच असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. वलगाव पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक रिता उईके यांनी सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे व परिमंडळ क्रमांक एकचे पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके यांच्यामार्फत एमपीडीए कारवाईचा प्रस्ताव सादर केला होता. पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे आणि गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक☞(पान २ वर)

रवी नगर येथे पिसाळलेल्या वळूचा धुमाकूळ

अमरावती/प्रतिनिधीः- प्रभाग क्रमांक १७ मधील रवी नगर, छत्रपती मैदान परिसरात एका पिसाळलेल्या वळूमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर वळू नागरिकांच्या अंगावर धावून जात असल्याची तसेच मारण्यासाठी पाठलाग करीत असल्याची तक्रार प्राप्त होताच नगरसेविका प्रियंका भूषण पाटणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नगरसेविका प्रियंका पाटणे यांनी पशुविभागाच्या पथकाशी तात्काळ संपर्क साधून वळूला सुरक्षितपणे पकडण्याची व्यवस्था



केली. त्यांच्या तत्पर पुढाकारामुळे पशुविभागाच्या कर्मचाऱ्यांनी वळूला ताब्यात घेऊन गोरक्षण येथे सुरक्षितपणे बंदिस्त केले. त्यामुळे परिसरातील ☞(पान २ वर)

एटीएममध्ये लोखंडी पट्टी लावून पैसे काढण्याचा प्रयत्न

आठ एटीएम लक्ष्य; पोलिसांची चार पथके चोरट्यांच्या मागावर

अमरावती/प्रतिनिधीः- सणासुदीच्या काळात एटीएममधून होणाऱ्या वाढीव आर्थिक व्यवहारांचा फायदा घेत नागरिकांची रोकड लंपास करण्याचा चोरट्यांचा शक्कलयुक्त डाव शहर पोलिसांनी उधळून लावला. शहरातील तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील तब्बल आठ एटीएममध्ये लोखंडी पट्ट्या लावून रोकड अडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मुंबई येथील बँकेच्या केंद्रीय कार्यालयाकडून मिळालेल्या सतर्कतेच्या संदेशानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत एटीएममधील संशयास्पद पट्ट्या हटविल्या. या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी चार पथके तयार केली आहेत. एटीएममधून पैसे काढण्यासाठी ग्राहकाने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्याच्या खात्यातून रक्कम वजा होते; मात्र मशीनच्या रोकड बाहेर येणाऱ्या स्लॉटमध्ये लोखंडी पट्टी बसविल्यामुळे पैसे बाहेर येत नाहीत. त्यामुळे तांत्रिक बिघाड झाल्याचे समजून ग्राहक रिकाम्या हाताने परत जातो. त्यानंतर संबंधित चोरटे घटनास्थळी येऊन लोखंडी पट्टी काढतात आणि त्यामध्ये अडकलेली रोकड घेऊन पसार होतात. मशीनची तोडफोड न करता आणि कोणताही आवाज न करता पैसे लंपास करण्याची ही शक्कल चोरट्यांनी वापरली होती.

शनिवारी मुंबई येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय कार्यालयाकडून अमरावती शहर पोलिसांना काही☞(पान २ वर)

दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी भव्य सामूहिक विवाह सोहळा

-स्व. सूर्यकांता देवी रामचंद्रजी पोटे पाटील चॅरिटेबल ट्रस्टचा सामाजिक उपक्रम
-नोंदणीची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२७

अमरावती/प्रतिनिधीः- दुष्काळग्रस्त व आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देऊन त्यांच्या मुला-मुलींचे विवाह सन्मानपूर्वक संपन्न व्हावेत, या सामाजिक उद्देशाने स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रविवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२७ रोजी भव्य सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येणार,अशी माहिती आ.प्रविण पोटे यांनी दिली आहे. हा सोहळा पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे संपन्न होणार असून, या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक पात्र वधू-वरांनी २५ जानेवारी २०२७ पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. स्व. सूर्यकांता देवी रामचंद्रजी पोटे पाटील चॅरिटेबल ट्रस्टने सामाजिक बांधिलकी जपत २००५ मध्ये २,१०० जोडप्यांचा, तर २००६ मध्ये तब्बल ३,१०० जोडप्यांचा भव्य सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला होता. या ऐतिहासिक उपक्रमामुळे सामूहिक विवाह चळवळीला मोठी चालना मिळाली. त्यावेळी ट्रस्टच्या वतीने प्रत्येक जोडप्याला १० हजार रुपये अनुदान



स्वरूपात देण्यात आले होते. पुढे या उपक्रमाचे अनुकरण अमरावती जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागांत करण्यात आले.

या ऐतिहासिक सोहळ्याला महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. त्यांनी नवविवाहित वधू-वरांना आशीर्वाद देत ट्रस्टच्या या अभिनव सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले. तसेच, सामूहिक विवाह सोहळ्यात विवाहबद्ध होणाऱ्या जोडप्यांसाठी प्रत्येकी ११ हजार रुपयांचा सहाय्यता निधी जाहीर केला होता. या निर्णयामुळे सामूहिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून नवदांपत्यांना आर्थिक मदत देण्याच्या उपक्रमाला प्रोत्साहन मिळाले. अशा प्रकारे, सामाजिक☞(पान २ वर)

अडगाव बु. येथे जलसंधारणाची कामे तातडीने सुरू करा

ग्रामपंचायत सदस्य कल्याणी दिवटे यांची मागणी

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- अडगाव बु. ग्रामपंचायत अंतर्गत जलतारा, शौचखड्डा, विहीर पुनर्भरण आणि एक एकर चारा लागवड या कामांना तातडीने मंजुरी देऊन काम सुरू करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्या कल्याणी जगदीश दिवटे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांच्याकडे केली आहे. गावातील पाणीटंचाई, भूजल पातळीतील घट, पाणी संवर्धन, स्वच्छता तसेच पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता या समस्या लक्षात घेता सदर कामे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामसभा ठरावानुसार संबंधित कामांचे प्रस्ताव तयार करून पंचायत समितीकडे तातडीने सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जलतारा व विहीर पुनर्भरणाच्या कामांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून, एक एकर चारा लागवडीमुळे पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या कामांना विलंब न करता शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. सदर कामांसाठी ज्ञानेश्वर आनंदराव दिवटे, सुनीता ज्ञानेश्वर दिवटे, जयश्री मोरेश्वर दिवटे, जगदीश ज्ञानेश्वर दिवटे, मोरेश्वर ज्ञानेश्वर दिवटे, सुरेश आनंदराव दिवटे आणि वनिता सुरेश दिवटे या प्रस्तावित लाभार्थ्यांची नावे देण्यात आली आहेत. संबंधितांची शासनाच्या प्रचलित नियमानुसार पात्रता तपासून ग्रामसभा ठरावानुसार लाभार्थी निवड करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रस्तावांची नियमानुसार छाननी करून तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता☞(पान २ वर)

खंडारे परिवाराच्या बुद्ध पूजा व परित्राण पाठ कार्यक्रमाला आमदार खोडके यांची सदिच्छा भेट

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील सर्वोदय कॉलनी, काँग्रेस नगर रोड येथे चंद्रशेखर खंडारे परिवारातर्फे आयोजित बुद्ध पूजा व परित्राण पाठ कार्यक्रमाला आमदार सुलभा खोडके यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेस अभिवादन करून बुद्धांच्या शांती, करुणा, मैत्री आणि मानवतेच्या महान विचारांना त्रिवार वंदन केले. या मंगलमय धार्मिक प्रसंगी त्यांनी खंडारे परिवारातील सदस्यांशी संवाद साधत कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. भगवान गौतम बुद्धांचे विचार समाजात शांतता, बंधुभाव, समानता आणि सद्भावना वृद्धिंगत करणारे आहेत. बुद्धांच्या विचारांचा संदेश सर्वत्र पोहोचो, अशी सदिच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली.



बुद्धांचा शांतीचा मार्ग हाच खरा जीवनमार्ग असून, त्यांच्या विचारांतून समाजाला बंधुभाव, समानता आणि मानवतेची शिकवण मिळते, असे प्रतिपादन आमदार ☞(पान २ वर)

शेतात गेलेल्या बैलास कुऱ्हाडीने मारून जखमी केले

दिघी शेतशिवारातील घटना.

खल्लार/प्रतिनिधीः- खल्लार पोलीस स्टेशन हद्दीतील दिघी शेत शिवारात शेतात गेलेल्या बैलाला कुऱ्हाडीने मारहाण करुन गंभीर जखमी केल्याची घटना (दि.२९) ऑक्टोबरला दुपारी चार वाजता घडली. वाकी (रायपूर)येथील अमोल अरुण कोल्हे हे घटनेच्या दिवशी शेतात बैल घेऊन गेले होते. बैलाला चरण्यासाठी सोयाबीनच्या शेतात बांधून ते आई वडिलांसह शेतात काम करीत होते.शेतात चरत असलेला बैल सुटून दिघी येथील गोपाल वासुदेव अटाळकर याच्या शेतात गेला असता गोपाल अटाळकर याने बैलाला कुऱ्हाडीने मारून जखमी केले.

याबाबतची तक्रार ☞(पान २ वर)



